# माणूस



ऑगस्ट एकोणीसशे त्रेसष्ट : मूल्य एक रुपया

वर्ष तिसरे : अंक तिसरा

*

ऑगस्ट : १९६३

*

: संपादक :

श्री. ग. माजगावकर




## स्वरूपदर्शन


**सामाजिक–राजकीय**

ने मजसी ने परत मातृभूमीला : रा. म. शास्त्री

**साहित्य–विभाग**

कथा : अरविंद दीक्षित, मधु मंगेश कर्णिक, प्रा. श्री. मा. श्रोत्री, नलिनी उगार, वसुधा पाटील.

कविता : राजा मुकुंद, बबन उल्हे, सौ. मुक्ता केणेकर, राम श्री. गोसावी, बन्या साठे, ल. शि. खरात, उदयन, गुलाब गायतोंडे, श्याम कुलकर्णी.

**नाट्य–चित्रपट**

रंगायनकृत तीन एकांकिका : प्रतिनिधी

तू सुखी राहा : चित्रदर्शन, रामचंद्र हिंगणे

नर्तकी : तुकाराम कोकजे, श्रीकांत रानडे


**मुखपृष्ठ**

१९४२मधील स्वातंत्र्यलढ्यात बिहार विधानसभेच्या इमारतीवर निशाण रोवण्याच्या प्रयत्नात मृत्युमुखी पडलेल्या हुतात्म्यांचे बिहार विधानसभेसमोरील स्मारक.

चित्रकार–दत्ता महाबळेश्वरकर

आतील सजावट– वसंत सहस्रबुद्धे

### सूचना

१. कथासाहित्य किंवा लेख पाठविताना सोबत टपालखात्याच्या नवीन नियमानुसार पुरेसे टपाल हशील पाठवावे.

२. कविता पाठविताना, कविता नापसंत ठरून ती परत हवी असल्यास पुरेसे टपाल हशील पाठवावे.

३. नापसंत साहित्य जर परत नको असेल तर केवळ निर्णय कळविण्यास पुरेसे टपाल हशील पाठविल्यास निर्णय कळविण्यात येईल व असे साहित्य निकालात काढले जाईल.

४. प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

५. या मासिकात व्यक्त झालेली मते ' माणूस ' मासिकाच्या चालकांची अधिकृत मते असतातच असे नाही.

*


पत्रव्यवहाराचा पत्ता

' माणूस '

४१९ नारायण पेठ, पुणे २.

वार्षिक वर्गणी : आठ रुपये

किरकोळ अंक : एक रुपया



# ने
# मजसी ने
# परत मातृभूमीला

* *My Land & My People*
  –*Dalai Lama*
* *Out of this world*
  –*Lowell Thomas*
* *Tibet fights for Freedom*
  –*Raja Hutheesing*

या तिन ग्रंथांच्या आधारें

**रा. म. शास्त्री**

यानी ' माणूस ' साठी तयार केलेली
खास लेखमाला

लाखों निरपराध माणसे आणि बायकामुलांची हत्या घडन १९४७ साली भारत खंडित होऊन स्वतंत्र झाला, आणि या आघाताच्या जखमा वाहत असतानाच ३१ जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींचा खून होऊन अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे उभा ठाकणारा, सत्याचा भारतातील एकमेव उपासक, जगाच्या रंगभूमीवरून नाहीसा झाला भारतात हे उल्कापात घडत असताना भारताच्या खांद्यावर बसून, जगाच्या सगळ्या उलाढालींपासून अलग राहून, तिबेटातील लामा विश्वाची चिंता वाहत होते. भौतिक प्रगती अखेर माणसाला दुःखाकडे नेणारी आहे; आत्म्याचा शोध महत्त्वाचा आहे; बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे जपजाप्य आणि ऐहिक सुखाचा त्याग करूनच राष्ट्रे सुखी होतील, अशा स्वानंद साम्राज्यात तिबेट मश्गूल होते. ७ सप्टेंबर १९४९ रोजी त्या वेळचे अमेरिकेचे प्रेसिडेंट ट्रूमन यांना तिबेट सरकारने पाठविलेल्या उपदेशपत्रात लामांनी लिहिले होते —

“ आम्हांला असे कळते, की तूर्त सर्व विश्वात लोकांच्या परस्परांतील वैमनस्यामुळे अशांती व दुःख पसरलेले आहे. याचे आम्हांस आणि आमच्या तिबेटी सरकारला विलक्षण दुःख होते. म्हणूनच आम्ही जगाला हे सांगण्यास उत्सुक आहोत, की इथे तिबेटात आम्ही अत्यंत धर्मपरायणतेने राहत असून आमचे धर्मगुरू आणि सामान्य जनता देवाला सतत अशी प्रार्थना करीत आहेत, की त्याने मानवजातीला सुख व चिरशांती द्यावी. ”

हे पत्र लोवेल थॉमस या अमेरिकन वार्ताहराने जेव्हा अध्यक्ष ट्रूमन यांना दिले असेल, तेव्हा अमेरिकन अध्यक्ष खात्रीने मनातल्या मनात हसले असतील.

शांततापूर्ण सहजीवन आणि विश्वशांती जर लामांच्या प्रार्थनामंदिरातल्या घंटानादांनी आणि ऋचांनी सिद्ध झाली असती, तर हिटलरशी दुसरे महायुद्ध खेळण्याची काय हौस होती ? इतके दिवस हे लामा मग करीत होते काय ? अमेरिकेच्या एक तृतीयांश क्षेत्रफळाच्या या देशाला जगात दोन महायुद्धे भडकली आणि शांत झाली याची गंधवार्ता आताच कळली काय ?

### तिबेट नावाचे बेट

हा लामांचा देश त्या वेळीं अक्षरशः आपल्या हिमालयांतील गुहांतून धर्मोपासनेत गर्क होता. तिथे मोटर कुणी पाहिलेली नव्हती; थिएटर नव्हते, रेडिओ नव्हता; खेळ नव्हते, वृत्तपत्र नव्हते आणि जुन्या भाराभर धर्मग्रंथांची हस्तलिखिते सोडली तर पुस्तकेदेखील नव्हती. १४००० ते १८००० फूट उंचीवर वर्फाच्छादित गिरिशिखरांनी वेढलेल्या या भूप्रदेशात काय घडत आहे याची जगात फारच थोड्यांना माहिती होती.

दलाई लामा हा या देशाचा स्वामी आहे. तेथील लोक बौद्धधर्मीय आहेत. ल्हासा ही तिबेटची राजधानी आहे, सिकीममधून गंगटोक या ठिकाणापासून दऱ्याखोऱ्यांतून याक नावाच्या जनावरांच्या सहाय्याने प्रवास करायला सुरुवात केली, तर पायी अंतर काटायला तब्बल वीस पंचवीस दिवस लागतात; आणि ल्हासाला पोचता येते. याक हे जनावर मोठे उपयुक्त आहे. अमेरिकन बैलाच्या भावासारखे ते दिसते. त्याच्या कातड्याचे जोडे करतात; कपडे करतात; आणि ते कपडे आयुष्यभर टिकतात. त्याची हाडे आणि शिंगे घरकामात लाकडासारखी वापरतात. याकचे दूधदुभते तिबेटी लोक खातात. याकशिवाय तिबेटात प्रवास अशक्य आहे. मुख्य म्हणजे याकचे शेण हे तिबेटात एकमेव जळण आहे. ... ! अशी तुरळक माहिती भूगोलाच्या पुस्तकांतून असंख्य भारतीय विद्यार्थ्यांनी एकदा वाचून यथावकाश स्मरणातून घरंगळू दिलेली होती.



**‘ तिबेटबाबत आमच्या हातून पाप घडले आहे. ’**

**–कै. डॉ. राजेंद्रप्रसाद**

परंतु तिबेटचे महत्त्व आणि इतिहास फार मोठा आहे. तिबेटवरील स्वामित्वासाठी चिन्यांनी आणि इंग्रजांनी जवळजवळ दोन शतके झगडा केलेला आहे. हा इतिहास भारत सरकारने कधी लोकांना नीट सांगितला का ? नाही. जोपर्यंत भारतावर इंग्रजांची पकड होती तोपर्यंत चिन्यांची तिबेटकडे वाकड्या नजरेने पाहण्याची छाती नव्हती. म्हणूनच भारत स्वतंत्र झाला आणि चीन यादवी युद्धातून मुक्त होताच केवळ दहा वर्षांच्या आत दलाई लामा, देश चिन्याच्या हवाली करून परागंदा होऊन भारतात आला, या घटनेत फार जवळचा कार्यकारण भाव आहे.

माझा देश व माझे लोक (My Land and My People) या आपल्या खळबळजनक आत्मवृत्तात दलाई लामांनी सांगितले आहे-"The British Govt. expressed their deepest sympathy for the people of Tibet & regretted that owing to Tibet's geographical position, since India had been granted independence they could not offer help. " [ब्रिटिश सरकारने तिबेटी लोकांबद्दल सपूर्ण सहानुभूती व्यक्त केली. परंतु तिबेटचे भौगोलिक स्थान व भारताला दिलेले स्वातंत्र्य या दोन गोष्टीमुळे ब्रि. सरकार या वेळी काही मदत देऊ शकत नाही, असे दुःखित अंतःकरणाने त्यांनी कळवले.] ·

याचा सरळ अर्थ असा आहे, की जर भारतात ब्रिटिशांचेच राज्य असते तर तिबेटात सैन्य घुसवून त्यांनी तिबेटाकरिता चिनी आक्रमणाशी झगडा केला असता. याचा दुसरा अर्थ असा, की भारताकडे ब्रिटिश सरकारचे उत्तरदायित्व असल्याने असा झगडा करण्याची जबाबदारी भारत सरकारची आहे. अमेरिकन सरकारने हेच उत्तर पाठविले. भारत सरकारने काय केले ? त्यांनी फक्त उपदेश पाठवला–

" The Indian Govt. also made it clear that it would not give military help & advised us not to offer any armed resistance but to open negotiations for a peaceful settlement. "

[भारतसरकाने हे स्पष्ट केले, की लश्करी मदत करणे शक्य नाही आणि तिबेटनेही लश्करी झगडा करू नये. मात्र शांततापूर्ण समझोत्यासाठी वाटाघाटी सुरू कराव्यात.]

## आमचे पाप

या वेळी भारताचे यु.नो.तले म्होरके होते श्री. कृष्ण मेनन आणि राष्ट्रपती होते के. डॉ. राजेंद्र प्रसाद. राष्ट्रपतिपदावरून उतरल्यानंतर कै. डॉ. राजेंद्रबाबूंनी मात्र उद्गार काढले–

" तिबेटाबाबत आमच्या हातून पाप घडले आहे ! "

या पापाचे स्वरूप काय ? घटना कश्या घडत गेल्या......? याचे रोमहर्षक वर्णन दलाई लामांनी आपल्या आत्मचरित्रात केले आहे. तिबेटवर हे जे संकट कोसळले त्याचा उगम जगापासून दूर राहून स्वतःच्या धर्मानंदात गर्क राहण्याच्या तिबेटी आत्मसंतुष्ट वृत्तीत आहे, त्याचप्रमाणे तिबेटच्या भौगोलिक स्थानातही आहे.

तिबेटची व भारताची सरहद्द १८०० मैल एकमेकांना भिडलेली आहे. लोवेल थॉमस (Lowell Thomas) या पत्रकाराने १९५० सालीच लिहिले होते–

"The communists covet Tibet for several reasons. If they gain control of the holy city of Lhasa, they can wield tremendous influence over the Central & Eastern Asian world. But the main reason is stratigic. For possession of Tibet would give them an 1800 mile frontier with India & an ideal jumping off spot–mostly down hill--for an army to invade the vast peninsula of Hindustan and dominate its forty million people. Tibet is *all that stands between Red armies of China* and India. "

[कम्युनिस्टांचा अनेक कारणांकरिता तिबेटवर डोळा आहे. जर ल्हासा त्यांच्या ताब्यात आले तर मध्य आणि पूर्व आशियांतील वृद्ध जगतात त्याचा दरारा वाढेल. परंतु मुख्य कारण आहे ते तिबेटचे भौगोलिक महत्त्व. तिबेट जिंकला की १८०० मैलांची भारताशी भिडलेली सरहद्द त्यांना मिळेल आणि भारताच्या विस्तीर्ण भूमीवर खाली झेप घेण्याकरिता *लाल सैन्याला तिबेट हे अत्यंत मोक्याचे* ठिकाण लाभेल. भारत आणि चिनी लाल फौजा यात आज फक्त तिबेटचाच अडसर आहे.]

## युक्तीने राज्य होतसे

ही भविष्यवाणी तंतोतंत खरी ठरून १९६२ च्या ऑक्टोबरात चिनी सैन्याने धडका द्यावयास सुरवात केली. शक्तीने मिळती राज्ये-युक्तीने राज्य होतसे ! ब्रिटिशांनी भारतावर शक्तीने कबजा मिळविला परंतू राज्य युक्तीने आणि डोळसपणाने केले हे त्यांचा शत्रुही मान्य करील. वॉरन हेस्टिंग्ज् हा भारताचा पहिला गव्हर्नर जनरल-जसे जवाहरलाल हे पहिले पंतप्रधान. परतू तिबेटच्या बाजूने भारताला सतत धोका आहे हे ध्यानात घेऊन, भारतात राज्याची नवी व्यवस्था लावण्याच्या प्रचंड खटाटोपात गुतून पडलेला असताना आणि प्रवासाची साधने उपलब्ध नसताना, १७७४ साली वॉरन हेस्टिंग्ज्ने जॉर्ज बोगल याच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ तिबेटला पाठविले. तिबेटशी त्याने संधान ठेवले. तिबेटवर त्याला स्वामित्व नको होते. परंतु तिबेटवर अन्य कुणाचे स्वामित्व नसावे हे स्वसंरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. डोंगर चढण्यापेक्षा उतरणे सोपे असते म्हणूनच १८००० फूट उंचीवर ब्रिटिश सैन्याला आधीच लश्करी ठिकाणे स्थापन करता आली तर ती करणे हा त्याचा उद्देश होता. पुढे शतकभर ब्रिटिश माणसे तिबेटात निरनिराळ्या कारणांनी जाऊन तेथील रस्त्यांची, माणसाची माहिती जमवून नकाशे तयार करीत होती. ब्रिटिशाना तिबेटमध्ये हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली ती १८९० साली. तिबेटी लोकानी सिकीमवर हल्ला चढविला व तिबेटी खंपा अठरा मैल आत घुसले. त्याना चिन्याचा पाठिंबा होता. ब्रिटिश सरकारने सैन्य पाठवून तिबेट आणि चिन्यांचा हल्ला परतवला आणि १८९० मध्ये चीनशी करार करून घेतला. तिबेटशी व्यापार करण्याकरिता याटुंग या सरहद्दीवरील गावात व्यापारपेठ उघडली. लॉर्ड कर्झन हा ह्या वेळी भारताचा व्हाईसरॉय होता. त्याने तिबेटी सरकारला अनेक पत्रे पाठविली. परंतू ती न फोडता लामांनी परत पाठविली. यानंतर भारतातील ब्रिटिश सत्तेला शह देण्यासाठी रशियाने डॉरजेफ् (Dorjief) या रशियन धर्मगुरूला तिबेटात धाडले.

तेराव्या दलाई लामाला शिकविण्यासाठी हा पूर्वी तिबेटात राहिलेला होता. त्याने तेराव्या दलाई लामावर विलक्षण पगडा बसविला व रशियाशी तिबेटची चुंबाचुंबी सुरू झाली.

*कर्झन साहेबांना हे सहन होणे शक्य नव्हते. त्याने तावडतोब* कर्नल यंगहजबंड याच्या दिमतीला शभर ब्रिटिश आणि बाराशे हिंदी सैनिक देऊन त्याना सरहद्दीकडे रवाना केले. तिबेट-भारत संधानाची चर्चा करण्याचा तिबेटी–सरकारकडे टाकोटाक तगादा लावला. तिबेटी सरकार ऐकेना. त्यानी एकच घोशा लावला.—" चालते व्हा."

कर्नल यंगहजबडने मग ल्हासाच्या दिशेने वाटचाल सुरू केली. ब्रिगेडिअर, जनरल मॅगडोनल्ड याने पचवीसशे सैनिक तोफा आणि बंदुकांसह चुबी खोऱ्याचा कबजा घेतला. तागला नदी ओलांडून १८००० फूट उंचीवर सैन्याने तळ ठोकला. दोन महिने पुन्हा वाटाघाटीत गेले. ३१–३–१९०४ हा अंतिमोत्तराचा अखेरचा दिवस त्याने घोषित केला. दिवस मावळताच मॅक्डोनल्डच्या सैन्याने तिबेटी सैन्यावर हल्ला चढविला. बरेच तिबेटी सैन्य मारले गेले. यंगहजबंडने लिहिले आहे —" It was a terrible & ghastly business ! " ( ही लढाई म्हणजे ऐक भयंकर आणि क्रूर उपद्व्याप होता. )

३ ऑगस्ट १९०४ या दिवशी यंगहजबंड ल्हासाला पोहोचला, दलाई लामा पळाला होता. त्याचा जो रीजट मागे राहिला होता *त्याचे नाव टि-रिमोचे* ( *Ti-Rimoche* ). पोटाला ( Potala ) या दलाई लामाच्या राजवाड्यात तह झाला. या तहान्वये ब्रिटिश सरकारने चुम्बी खोऱ्यात लश्कर ठेवायला तिबेटने मान्यता दिली. दुसरी म्हत्त्वाची गोष्ट तिबेटने मानली ती म्हणजे कोणत्याही परकीय सत्तेला भारताच्या परवागनीखेरीज तिबेटच्या राज्यकारभारात तिबेट हस्तक्षेप करू देणार नाही. हा तह ब्रिटिश सरकार व तिबेटी सरकार याच्यामध्ये असला तरी चीन, नेपाळ, भूतानचे प्रतिनिधी त्या वेळी हजर होते. तारीख होती ७ सप्टेंबर १९०४.

**ब्रिटिशांची घोडचूक**

ल्हासा येथील तह पदरात पाडून ब्रिटिश सैन्य भारतात परतले. १९०९ मध्ये परागदा झालेला दलाई लामा तिबेटात परत आला. परंतु मध्यंतरी १९०६ मध्ये चिनी सरकारने ब्रिटिशांशी वेगळा तह करून तिबेटने चीनशी इमान राखले पाहिजे ( Tibet's integrity should rest with China ) हे मान्य करून घेतले होते. हा करार ब्रिटिश सरकारने करून इतर काही फायदे पदरात पाडून घेतले असले पाहिजेत. परतु त्यामुळे १९०४ च्या करारातील कलमे *लेचीपेची झाली हे कबूल केले पाहिजे.*

१२ फेब्रु. १९१० मध्ये चिनी सैन्ये ल्हासावर चालून आली. कारण तिबेटने चुम्बी खोऱ्यापर्यंत ब्रिटिशाना लश्करी ठाणी दिली हे चीनला डाचत होते. स्वारी झाली की परागंदा होणे हे दलाई लामांच्या पाचवीलाच पुजलेले असावे. चिनी हल्ला होताच दलाई लामा पळाला—पळाला तो भारतात आला.

भारतात त्या वेळी दलाई लामा दोन वर्षे होता. परंतू त्याच्या सुदैवाने तिबेटमध्ये लोकच बड करून उठले आणि त्यानी चिन्यांचे सैन्य पिटाळून लावले. जून १९१२ मध्ये दलाई लामा पुन्हा ल्हासाला गेला. चिनी मागे हटले परंतु तिबेटचा पूर्वेकडील भाग जो चिनी सरहद्दीला लागून होता तो त्यांनी सोडला नाही.

## आमचे पाप

Patna Nov. 18

Dr. Rajendraprasad, former President said today that " In the country's struggle against the invaders the ultimate victory will be ours as truth & justice are on our side. "

The former President argued that Tibet should be liberated. He said, " *We committed a sin when we allowed Tibetan freedom to be annihilated by the Chinese.* We have to atone for that by having been forced to fight the same invaders."

–Times of India, 19 Nov. 1962

भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद हे आज येथे असे म्हणाले की " आक्रमकांबरोबर सुरू झालेला आपल्या देशाच्या झगड्यात अंतिम विजय आपलाच आहे–कारण सत्य व न्याय ही आपल्या बाजूस आहेत. "

भूतपूर्व राष्ट्राध्यक्षानी असेही सागितले की तिबेटची मुक्तता केली पाहिजे. ते म्हणाले—" चिन्याना आपण *तिबेटच्या स्वातंत्र्याचा घास घेऊ दिला हे आपल्या हातून पाप* घडलेले आहे. या पापाचे प्रायश्चित्त म्हणूनच की काय आपल्याला त्याच आक्रमकांशी आज लढाई करण्याचा प्रसंग आलेला आहे. "

— टाइम्स ऑफ इंडिया १९–११–६२

**कृष्णावतार**

कसाच्या घरी श्रीकृष्ण जन्माला यावा त्याप्रमाणे चिन्यांच्या ताब्यात असलेल्या तिबेटच्या प्रदेशातच सध्या भारतात आश्रयाला आलेल्या दलाई लामाचा जन्म झाला. याचे कारण दालाई लामा पदावरील माणूस हा बाल ब्रह्मचारी राहत असल्यामुळे त्याला काही मूलबाळ नसते. तो लोक म्हणतात तसा मरतही नाही. त्याचे निर्वाण होते. तो देह टाकतो आणि तिबेटात कुठेतरी पुन्हा अवतार घेतो. आता हा अवतार ज्या अर्थी चिन्यानी कबजा केलेल्या भू–प्रदेशात झाला त्या अर्थी तो तिबेटचाच भाग होता हे आपोआप सिद्ध होते की नाही ?

हे अवतारप्रकरण आणि दलाई लामाची निवड हा सर्व प्रकार मोठा गमतीदार आहे.

१९३३ मध्ये तेरावा दलाई लामा मरण पावला. सिंहासन रिकामे झाले. पोटाला राजवाड्यावर अवकळा आली. लामा म्हणजे साधा धर्मगुरू. असे २००,००० लामा तिबेटात आहेत. शून्यात चूक नाही. दोनशे हजार ! हे म्हणजे भारतात दोन कोटी विनोबा भावे असल्यासारखे वाटेल; कारण तिबेटची लोकसंख्या आहे ... ती कधी कोणी मोजलेलीच नाही परंतु आहे चाळीस-पन्नास लाख ! ( 3 to 5 million ) दलाई लामा हा सर्वश्रेष्ठ गुरू आणि राजा ! अमेरिकेच्या अध्यक्षाच्या निवडणुकीत उत्साह पसरतो तसा नव्या दलाई लामाच्या शोधासाठी तिबेटात पसरला. नशीब, दलाई लामा तिबे-



चार वर्षांच्या शेतकरी मुलाचे राज्यारोहण

टातच जन्म घेतो याची खात्री असते म्हणून ! नाहीतर जगात केवढी धूमधाम उडाली असती. एखादे गरिबाचे मूल पोटाला लागण्याची ('पोटाला' येथील तक्तावर बसण्याची) एवढीच एक शक्यता असते.

### लामा आणि साक्षात्कार

पण हा नवा दलाई लामा सापडणार तरी कुठे ? आधी नवीन पाळणे कुणाकुणाकडे हलणार आहेत किंवा हलले आहेत याची यादी करायला हवी. त्यातून एखादा उपजतच गेला असला म्हणजे तो पुन्हा कुठे जन्माला आला हे शोधायला हवे. परंतू लामांच्या देशात हे सर्व झटपट उरकण्याची सोय आहे. प्रथम भविष्यात डोकावून पाहण्याची ताकद असलेले अधिकारी पुरुष चार दिशांना रवाना केले जातात. त्यातल्या एखाद्याला अचानक साक्षात्कार घडून साधारणपणे कुठल्या गावात, कुणाच्या घरात दलाई लामा अवतरला आहे याचा सुगावा लागायचाच.

सध्याचे दलाई लामा आपल्या आत्मवृत्तात लिहितात —

"तेरावे दलाई लामा मरण पावले व त्यांचा मृतदेह ल्हासा येथील राजवाड्यात बसलेल्या स्थितीत ठेवलेला होता. त्यांचे तोंड दक्षिणेकडे होते. परंतू काही दिवसांनी असे लक्ष्यात आले, की त्यांचे तोंड पूर्वेकडे वळले आहे. त्याच वेळी त्या दिशेला आकाशात एक नवा तारा लुकलुकताना दिसू लागला. यावरून नवा दलाई लामा कोणत्या दिशेला असणार हे नक्की ठरले !

"दोन वर्षे अशीच गेली. कुणाला कसला साक्षात्कारच होईना. मग एके दिवशी कारभार पाहण्याकरिता तिबेटी परिषदेने निवडलेले रीजंट ल्हासाजवळ पूर्वेकडे नव्वद मैलांवर असलेल्या एका पवित्र जलाशयाच्या काठी गेले असताना त्यांना त्या जलाशयात तीन अक्षरे दिसली. या अक्षरांना काहीतरी अर्थ असावा म्हणून त्यांनी ती लिहून घेतली व साक्षात्काराचे संपूर्ण वर्णन लिहून काढले. परंतू साक्षात्काराचे हे वर्णन संपूर्णपणे गुप्त ठेवण्यात आले. फक्त तिबेटी धर्मपरिषदेच्या उच्च पदाधिकाऱ्यांपैकी एकदोघांनी त्याचा अभ्यास केला."

यापुढची हकीकत दलाई लामांच्या शब्दांतच वाचणे आवश्यक आहे. ते लिहितात —

"(साक्षात्कार घडला) त्यानंतर वर्षभराने पूर्वेच्या दिशेने निघालेले विद्वान धर्मगुरू आम्ही राहात होतो त्या भागात आले. तकत्सर (Taktser) हे आमच्या खेड्याचे नाव. खेड्यात फिरताना त्यांचे लक्ष झगमगत्या कौलारू घराकडे गेले. त्यांच्यातील जो मुख्य होता त्याने चौकशी केली, की या घरात कुणी लहान मूल आहे का ? सुमारे दोन वर्षांचा एक लहान मुलगा त्या घरात आहे असे त्यांना समजले.

"हे कळताच त्या लोकांपैकी फक्त दोघांनी आपले वेष पालटले. त्यांतला जो कनिष्ठ धर्मगुरू होता त्याने वरिष्ठ धर्मगुरूचा पोशाख केला व जो खरोखर जबाबदार धर्मगुरू होता त्याने त्याच्या नोकराचा वेष घातला. दरवाज्यातच माझ्या आईवडिलांची व या लोकांची दृष्टभेट पडली. प्रमुख लामा नोकराच्या वेषात होता, त्याची अर्थातच गडी माणसांच्या जागेत राहण्याची सोय झाली. परंतू आश्चर्याची गोष्ट अशी, की तिथेच असलेल्या छोट्या मुलाने "लामा – लामा" असे मोठ्याने म्हणत त्याच्याकडे झेप घेतली. तो त्याच्या मांडीवरून हलेचना. त्याच्या गळ्यातील मण्यांची स्मरणी तो मागू लागला. तेराव्या लामाची ती जपाची माळ होती.

"त्या मुलाच्या हालचालींकडे त्याने दिवसभर नजर ठेवली. रात्री मुलगा झोपला. पहाट झाली. मुलगा झोपेत असतानाच आलेले लोक जावयास निघाले. तितक्यात तो मुलगा जागा झाला. आणि 'मी तुमच्या बरोबर येणार' असा हट्ट धरून बसला.

"तो लहान मुलगा म्हणजेच मी !"

### दलाई लामा सापडला—पण......

एवढ्याने भागले नाही. त्या मुलावर इतरही अनेक प्रयोग करण्यात आले. फिरायला जाताना हातात धरण्याच्या दोन काठ्या त्याच्यापुढे टाकण्यात आल्या. त्यातली एक त्या मुलाने उचलली. क्षणभर विचार केला आणि ती खाली ठेवून मग दुसरी उचलली. जी नंतर उचलली ती तेराव्या दलाई लामाने नेहमी वापरलेली होती. परंतू पहिलीदेखील त्याने फक्त एकदाच वापरली होती.

रीजंटला जी अक्षरे दिसली ती होती अ, क आणि म. दलाई लामा लिहितात — "अ हे अमडो यातील आद्याक्षर. अमडो हे आमच्या जिल्ह्याचे नाव. क म्हणजे कुम्बुम्. कुम्बुम् येथे आमच्या जिल्ह्यातील सर्वात मोठे गुरुपीठ. म म्हणजे लामा...!"

चौदावा दलाई लामा तर सापडला. पण तो सापडला चिन्यांच्या ताब्यातील पूर्व तिबेटात ! या भागाचा चिनी गव्हर्नर धर्माने मुसलमान होता. त्याने शंका काढली – हाच दलाई लामा कशावरून ? त्याने खेड्यातील पोरे गोळा केली आणि स्वतः परीक्षा घेतली. एक खाऊचे खोके त्याने मुलांपुढे धरले. काही भीतीमुळे खाऊ उचलीनात. काहींनी झडप घालून मूठमूठ खाऊ उचलला आणि अधाश्यासारखा तोंडात कोंबला. एका मुलाने मात्र फक्त एकच तुकडा उचलला

आणि सावकाश खाल्ला. तो मुलगा म्हणजे धर्मगुरूंनी निवडलेला दलाई लामाच होता.

**मियाँभाईची पोळी पिकली !**

आता एवढा परमेश्वरी अवतार मियाँभाईनी सुखासुखी कसा द्यावा ! दलाई लामा सांगतात —

"तिबेटी सरकारकडून तो मुसलमान एक लाख चिनी डॉलर्स लाच मागू लागला. खरे म्हणजे हे पैसे फार होते आणि ते घेण्याचा त्याला काही अधिकारही नव्हता. तेवढे मिळाल्यावर तो आणखी मागू लागला. तीन लाख चिनी डॉलर्स हवे म्हणू लागला. मग तिबेटी सरकारी प्रतिनिधीने त्याला सांगितले – हाच अवतारी मुलगा आहे हे अजून नक्की नाही. ल्हासाला देशाच्या इतर भागातूनही उमेदवार आले असतील. तेव्हा हाच दलाई लामा असे धरून कसे चालेल ?"

पैशाच्या वाटाघाटी लगेच थोड्याच संपणार–? बरेच दिवसपर्यंत या चिनी मियाँभाईशी वाटाघाटी सुरूच राहिल्या. शेवटी त्याला हवे असलेले पैसे देऊन नव्या दलाई लामासह सर्व लामामंडळी सप्टेंबर १९३९ मध्ये ल्हासाला परतली.

या वेळी दलाई लामांचे वय चार वर्षांचे होते. त्यांच्याबरोबर त्यांचे आईवडील, दोन मोठे भाऊ (वय ९ व ६) सटफटर मिळून पन्नास माणसे आणि तीनशे पन्नास घोडी-खेचरे होती. काफिला पायीच निघाला होता. चिनी सरहद्दीबाहेर काफिला पोचताच ल्हासाला वर्दी पोचवण्यात आली. प्रवास चालू असताना तिबेटी राष्ट्रीय परिषद भरली. तिथे रीजंटला झालेला साक्षात्कार, दलाई लामाने ओळखलेल्या वस्तू, गावाची दिशा गव्हर्नरला चारलेले पैसे यांचा सर्व अहवाल देण्यात आला व नव्या दलाई लामाची दुंदुभि फिरवण्याचा निर्णय घेण्यात आला.

तीन महिने यात्रा सुरू होती. ल्हासाच्या जवळ काही मैलांवर हा काफिला पोचताच रीजंट, तिबेटी मंत्रिमंडळ व राष्ट्रीय परिषदेच्या वतीने जवळजवळ शंभर लामा सामोरे गेले. त्यांनी चौदाव्या दलाई लामाचा जाहिरनामा व वस्त्रे या चार वर्षांच्या मुलावर चढवली.

ल्हासाप्रवेशाचे वर्णन करताना दलाई लामा लिहितात —

"आम्ही दोगोथंग (Dogothang) येथे पोचलो तेव्हा उरलेले सर्व सरकारी अधिकारी मला भेटावयास आले. पंतप्रधान, मंत्रिमंडळाचे सभासद आणि ड्रेपुंग, सेरा, गाडेन या प्रमुख पीठांचे गुरू ही सर्व मंडळी आली होती. शिवाय ल्हासा येथील ब्रिटिश वकील ह्यू रिचर्डसन, भूतान, नेपाळ व चीनचे प्रतिनिधी हेही भेटावयास आले होते. आता आमच्या काफिल्याला मिरवणुकीचेच स्वरूप आले होते. रस्त्याच्या कडेने हातात धर्मध्वज घेऊन बुद्ध साधूंच्या रांगा होत्या. लोक गटागटाने गाणी गात होते. ल्हासातील जवळजवळ सर्व स्त्री-पुरुष आणि मुले-बाळे नवे कोरे सणासुदीचे कपडे अंगावर घालून माझ्या स्वागतासाठी रस्त्यावर लोटली होती. मला हे सर्व एखाद्या स्वप्नाप्रमाणे भासत होते."


दलाई लामा ल्हासात पोचताच सिंहासनारोहणाचा दिवस नक्की करण्यात आला. तारेने चिनी सरकारला, भारतातील ब्रिटिश सरकारला व नेपाळ, भूतान, सिकीम यांच्या राजांना निमंत्रणे रवाना झाली. १९४० मध्ये पोटाला राजवाड्यात चौदावे दलाई लामा म्हणून या शेतकऱ्याच्या मुलाचे राज्यारोहण झाले.

या दलाई लामाची संपूर्ण बिरुदावली होती—Getson Ngwang Lobsang Tengin, Gyapso, sisunwang yur tshungpa-Mapai Dhepal Sangpol ! वाचतांना दमछाट होईल. याचा अर्थ आहे – 'पवित्रतम, ललामभत, उत्तम वक्ता, शुद्ध मनाचा, ज्ञानसंपन्न, देवाचा लाडका, सागरासारखा विस्तीर्ण' अर्थात असा हा (चार वर्षांचा) दलाई लामा !

'शेतकऱ्याचा मुलगा' या पहिल्या प्रकरणात दलाई लामा यांनी आपल्या राज्यारोहणविधीपर्यंतची हकीकत वरीलप्रमाणे सांगितली आहे. यानंतरच्या दोन प्रकरणांत त्यांनी दलाई लामाचे धार्मिक शिक्षण आणि तिबेटी जनतेचे जीवन यांची माहिती विस्ताराने दिली आहे.

**मांसाहारी बुद्धदेव !**

दलाई लामा सहा वर्षांचे होताच त्यांचे शिक्षण सुरू झाले. लहानपणापासून त्यांचा स्त्रीजीवनाशी संबंध तोडण्यात आला. भावांशी खेळण्याची त्याला परवानगी होती. परंतु त्याच्या खुद्द बहिणींना त्याच्याशी खेळण्यास परवानगी नव्हती, मग इतर लहान मुलींची काय



**जन्म जरी घालवला तरी ज्याची संपूर्ण अंतर्रचना माणसाला उमगत नाही तो 'पोटाला' राजवाडा**

कथा ? मादक द्रव्याला दलाई लामाला कधी स्पर्श करता येत नाही. परंतू मांस खाण्यास मात्र हरकत नव्हती. हे काहीसे विचित्र वाटेल. त्यासंबंधी दलाई लामा सांगतात—

"तिबेटमध्ये अन्नधान्य भरपूर असले तरी त्यात फारसे प्रकार शक्य नाहीत. गहू आणि बार्ली खेरीज तिथे फारसे काही पिकवता येत नाही. त्यामुळे प्रकृती सुदृढ ठेवणे केवळ शाकाहाराने अशक्यच असते. त्यामुळे जरी लोक बौद्धधर्मीय असले तरी सुरवातीपासूनच इथे मांसाहार सुरू झालेला आहे.

याक व गाई-बैलांचे मांस तिबेटी लोक खातात. मात्र याक मारण्यासाठी नेहमीप्रमाणे त्याची मान इथे कापीत नाहीत तर त्याना गुदमरवून मारतात. समजूत अशी आहे, की त्यामुळे रक्त मांसातच राहते व फुकट जात नाही. अशा तऱ्हेने याकना मारताना अर्थातच तिबेटी खाटकाना आपण पाप करीत आहोत असेच वाटते. पण मागील जन्मातल्या क्रूर कृत्यांमुळे या जन्मात आपण खाटीक झालो अशी मनाची ते समजूत घालतात.

## बौद्ध धर्म हा भारताचा नजराणा !

आठव्या शतकात भारतातून बौद्धधर्म तिबेटमध्ये आला. त्यापूर्वी तेथे गम्पो नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याने दोन लग्ने केली होती. एक होती चीनची राजकन्या आणि दुसरी होती नेपाळच्या राजाची मुलगी. या दोघी बौद्धधर्मीय असल्यामुळे त्याच्या नादाने गम्पो बौद्ध झाला. गम्पोने तर बौद्ध धर्म स्वीकारलाच आणि त्याने आपल्या राज्यात त्याचा जारीनें प्रचारही केला. ल्हासा येथे त्याने राजधानी बांधली.-आजही तेथे दोन प्रार्थनामंदिरे आहेत. त्यातील रामोचे मंदिर हे चिनी बायकोने बांधवले व नेपाळी बायकोकरिता गम्पोने स्वत: 'जोकांग' बांधले. ही दोन्ही मंदिरे अतिशय भव्य आहेत.

बौद्ध धर्माच्या महत्त्वाच्या शाखा दोन. हीनयान आणि महायान-हीनयान बौद्ध गौतम बुद्धाला देव मानीत नाहीत. परंतु फार मोठा संत आणि महात्मा मानतात. याउलट महायान पंथीय बौद्ध गौतम बुद्धाला प्रत्यक्ष परमेश्वरच समजतात. त्याची पूजा अर्चा करतात. तिबेटी लोक हे महायान पंथाचे उपासक आहेत. म्हणूनच दलाई लामाच्या आत्मवृत्ताच्या इंग्रजी भाषातरात बुद्धाचा उल्लेख 'लॉर्ड बुद्ध' असा येतो. आपल्या धर्माची वाचकाना थोडक्यात ओळख करून देताना दलाई लामा सांगतात—

"आम्ही असे मानतो की सर्व सजीव प्राणी मरणानतर पुन: जन्म घेतात. पहिल्या जन्मात त्याच्या हातून जे बरे वाईट घडले असेल त्या प्रमाणात पुढच्या जन्मात त्याच्या वाट्याला सुख किंवा दु:ख येते. यालाच कर्मनियम म्हणतात. जीव हा नीच योनीतून उच्च योनीत किंवा उच्च योनीतून नीच योनीत कर्मानुसार फिरत राहतो. यातून सुटका होते ती निर्वाण स्थिती लाभली तर. परंतू निर्वाण लाभण्यापूर्वीही काही स्थिती त्याना लाभतात. बोधिसत्त्व, अर्हत् आणि बुद्ध या त्या अवस्था होत. या स्थितीत शिरल्यावर अवतारी पुरुष म्हणून ते या जगाच्या हिताकरिता पुन:पुन: जन्म घेतात. या स्थितीतील बुद्ध आपणच आपला पुढला जन्म निश्चित करतात. त्याना पूर्वजन्माची स्मृतिही असते आणि त्याचमुळे असे अवतारी पुरुष ओळखता येतात."

## पोटालाचे अजस्र पोट

पोटाला राजवाड्यात एखाद्या बंदीप्रमाणे दलाई लामाला राहावे लागते. परंतू पोटाला राजवाडा हा दलाई लामाला तुरुंगासारखा वाटत नाही. याचे कारण त्याची अजस्र इमारत. या राजवाड्याविषयी दलाई लामा सांगतात—

"जगातील सर्वांत मोठी अशी ही इमारत असावी. जन्म जरी या इमारतीत घालवला तरी त्याची संपूर्ण अंतर्रचना माणसाला उमगत नाही. एका टेकडीच्या माथ्यावर हा राजवाडा पसरलेला आहे. हा राजवाडा कसला ! एक शहरच आहे. तेराशे वर्षांपूर्वी याचें बांधकाम सुरू झाले. पाचव्या दलाई लामाने सतराव्या शतकात तो अमाप वाढवला, राजवाड्याच्या मध्य भागात तेरा मजले आहेत. दोन मजले पूर्ण होतात न होतात तोच पाचवा दलाई लामा मरण पावला. परंतू मरणापूर्वी त्याने आपल्या पंतप्रधानाला आपले निधन गुप्त ठेवण्याची सूचना दिली. कारण जर त्याचे निधन जाहीर केले तर तिबेटी लोक बांधकाम थांबवतील अशी त्याला भीती वाटत होती. या दलाई लामासारखाच दिसणाऱ्या दुसऱ्या एका लामाला पुढे करून त्या पंतप्रधानाने तेरा वर्षे पाचवा दलाई लामा मेल्याची बातमी गुप्त राखली. मात्र दुसऱ्या मजल्यावर त्याने पाचव्या दलाई लामाच्या पुनर्जन्माकरिता प्रार्थना लिहून तो शिलालेख भिंतीत पक्का करून टाकला होता. आजही हा लेख तिथेच आहे.

"या राजवाड्यात अगणित दालने आहेत. पस्तीस दालने केवळ प्रार्थनामंदिर म्हणून आहेत. तीस फूट उंचीची व सोन्याने मढविलेली सात दलाई लामाची थडगी या राजवाड्याच्या माथ्यावर उभी आहेत. ही सोनेरी थडगी सूर्यप्रकाशात चकाकताना लांब अंतरावरून फारच सुंदर दिसतात.

"राजवाड्यात हजार वर्षांपूर्वीचे बुद्ध ग्रंथ आहेत. काही पामवृक्षाच्या पानावर लिहिलेले असून भारतातून मुद्दाम आणवलेले आहेत. दोन हजार ग्रंथ सोनेरी अक्षरात लिहिलेले आहेत."

## दलाई लामांचे शिक्षण

पोटाला राजवाड्याच्या तळघरांत चंदा, कापड, तूप, लोणी याचे प्रचंड साठे असत. राजवाड्यात राहणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना आणि लामासाठी हे कोठार असे. सरकारी कचेरी, प्रार्थनामंदिर, शाळा, सैन्याचे मुख्य ठिकाण, सरकारी कर्मचाऱ्याचे निवासस्थान, दलाई लामाचे निवासस्थान, धान्य साठविण्याचे कोठार आणि तुरुंग अशा शतनात्यानी पोटाला राजवाडा उपयोगात आणला जाई. पुण्यात ज्याप्रमाणे कुठूनही पर्वती दिसतेच त्याप्रमाणे ल्हासात पोटाला राजवाडा सारखा नजरेसमोर राहतो. या राजवाड्यात लहानपणीच कोंडून पडलेल्या दलाई लामाला बाहेरच्या जगाची वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत गधवार्ता नव्हती. कुणीतरी लामाशिक्षकाने त्याना एकदा जगात युद्ध सुरू झाल्याचे सांगितले व चार वर्षांनी बंद झाल्याचे सांगितले. या काळात दलाई लामा शिकत काय होते ? धर्मग्रंथांचा अभ्यास चालू होता. प्रज्ञापरमित, माध्यमिक, विनय, अभिधर्म, प्रमना इत्यादी विषयात त्यांची गती होत होती. प्रज्ञापरमित—म्हणजे उच्चतम ज्ञान (Perfection of wisdom). या एकाच विषयावर तीस टीकाग्रंथ होते. बाकीच्या विषयावर असेच विपुल ग्रंथ अभ्यासून विद्वानांशी त्यांना चर्चा करावी लागे. वादविवाद खेळावे लागत. तिबेटी महा-

पंडित दिवसदिवस त्याच धर्मसूत्रांची चिकित्सा करीत, त्यांची परीक्षा घेत. या परीक्षातून दलाई लामा उत्तीर्ण झाले. आपल्या जीवनातील विद्यार्थिदशेविषयी दलाई लामांचे विचार चिंतनीय आहेत. त्यात अखेर विशाद आहे. ते लिहितात—

"It was not an unhappy childhood. The kindness of my teachers will always remain with me as a memory I shall cherish. They gave me the religious knowledge which has always been and will always be my greatest comfort. But I know that I grew up with hardly any knowledge of worldly affairs; and it was in that state, when I was sixteen that I was called upon to lead my country against the invasion of communist China."

[ माझे बालपण सुखात गेले नाही असे म्हणता येणार नाही. माझ्या गुरूंच्या प्रेमळपणाची आठवण मला जन्मभर विसरता येणार नाही. त्यांनी मला जे धार्मिक शिक्षण दिले त्यातच मला आतापर्यंत मानसिक समाधान लाभले; आणि तेच यापुढेही माझे सर्वोच्च निधान राहील. परंतू एक गोष्ट स्पष्ट आहे, की जगाच्या उलाढालीचे मला काडीइतकेही ज्ञान नव्हते आणि या अवस्थेत मी असतानाच वयाच्या सोळाव्या वर्षीच लाल चीनच्या आक्रमणाविरुद्ध नेतृत्व करण्याची जबाबदारी माझ्या शिरावर पडली. ]

### संपत्तीची विषमता

दलाई लामांनी आपल्या आत्मवृत्तात तिबेटमध्ये गरीब-श्रीमंतांत जी प्रचंड दरी होती त्याचीही कबुली दिली आहे. ते सागतात.

"Outside the monasteries our social system was feudal. There was inequality of wealth between the landed aristocracy at one extreme and the poorest peasants at the other. It was difficult to move up into the class of aristocracy."

[ आमच्या धर्ममठांव्यतिरिक्तची समाजरचना सरंजामशाहीचीच होती. जमीनदारवर्ग एका टोकाला अत्यत श्रीमत होता तर शेतकरी अठराविश्वे दारिद्रय अनुभवीत होते. खालच्या थरातील माणसांना आपली स्थिती पालटण्याची फारशी संधिही नव्हती. ]

धर्ममठातील व्यक्तीचा उदरनिर्वाह त्या मठात येणाऱ्या देणग्यांवर आणि वस्तूवर चालत असे. तर काही मठाच्या मालकीच्या शेत-जमिनी होत्या. पोटाला राजवाड्यांत अन्नधान्याचा जो प्रचंड साठा असे त्यातूनही या मठांना मदत मिळे.

तसे पाहिले तर सर्व तिबेटी जमीन ही सरकारची समजली जाई व जरी जमिनीचे खरेदीविक्रीचे व्यवहार मालकाना करता येत असत तरी सरकारी भाडे म्हणून धान्याच्या स्वरूपात, पैशाच्या स्वरूपात वा वेठबिगारीच्या स्वरूपात म्हणा प्रत्येक शेतकऱ्याला सरकारला कर भरावा लागे.

परंतू श्रीमत जमीनदारांना मोठमोठ्या इस्टेटी पुरातन काळापासून दिल्या गेलेल्या होत्या. या इस्टेटीच्या बदल्यात या जमीनदार कुटुंबातून एक पुरुषमाणूस सरकारी कामकाजासाठी द्यावा लागे. बाकीचे अशा इस्टेटीचे उत्पन्न त्या जमीनदाराकडेच पगार म्हणून राही. या इस्टेटीवर जे शेतकरी काम करीत त्यांच्या वेतनासंबंधी अथवा स्थितिसंबंधी सरकारला हस्तक्षेप करता येत नसे. अर्थातच् शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक सरकारला फक्त पाहावी लागत असे.

दलाई लामा यांनी हाती सत्ता येताच या बाबतीत सुधारणा केली-ते सांगतात —

"I began to see how much wrong was in it. Our inequality in distribution of wealth was certainly not in accordance with the Budhist teaching and in few years when I held effective power in Tibet, I managed to make some fundamental changes."

[ होणारा अन्याय माझ्या ध्यानात येऊ लागला. आमच्या येथे संपत्तीची केली जाणारी विषम वाटणी ही बुद्धाच्या शिकवणीशी सपूर्णतया विसगत होती. म्हणूनच जेव्हा माझ्या हातात खऱ्या अर्थाने अधिकार आला तेव्हा या बाबतीत मी मूलभूत सुधारणा घडवून आणल्या. ]

दलाई लामानी ज्या सुधारणा घडवून आणल्या त्या महत्त्वाच्या होत्या. (१) प्रत्येक जिल्ह्यातून जेवढा शेतसारा सरकारने ठरवून दिला असेल तेवढा सरकारात भरला की सरकारी अधिकाऱ्याने किती सारा प्रत्यक्ष गोळा केला याची सरकार चौकशी करीत नसे. ही पद्धत बद करून सरकारी अधिकाऱ्याचा पगार ठरवून देण्यात आला व जमलेला सर्व शेतसारा सरकारात भरावयास सागण्यात आले. (२) ज्या शेतकऱ्यांना सारा श्रमरूपाने भरावयाचा असे त्यांच्या श्रमाचे काही मोजमापच नसे. सरकारी अधिकारी व लामा मंडळी याचा दुरुपयोग करीत. दलाई लामानी मंत्रिमंडळाच्या पूर्वसूचनेखेरीज कुणाकडूनही फुकट श्रम घेण्यास बंदी केली. (३) सरकारने शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाचा हिशेब गोंधळात होता. ज्यांना शक्य होते त्यानीही कर्ज व व्याज परत केले नव्हते. ज्याना कर्ज परत करणे शक्य नव्हते त्याना सूट देण्यात आली. श्रीमतांना कर्जवसुली जारी करण्यात आली. (४) ज्या श्रीमत जमीनदारांना मोठमोठ्या इस्टेटी बहाल केलेल्या होत्या त्यांची बहालपत्रे रद्द करून जमीन पुनः भूमिरहित शेतकऱ्याना वाटण्याचे ठरविण्यात आले. याकरिता परत घेतलेल्या जमिनीबद्दल जमीनदाराना किती नुकसानभरपाई द्यावयाची हे ठरविण्यात आले. खासगी इस्टेटीमध्ये ही सुधारणा होताच धर्ममठाकडे असलेल्या इस्टेटीबद्दलही असाच विचार करावा असे ठरविण्यात आले.

### स्त्रियांना पूर्ण हक्क

तिबेटात संपत्तीची विषम वाटणी असली तरी इतर सामाजिक प्रश्न फारसे नव्हते. **स्त्रियांच्या हक्कांबाबतीत तर तिबेट जगातील सर्व देशांत आघाडीवर आहे असेच म्हटले पाहिजे. जेव्हा तिबेटी तरुण व तरुणी यांचे लग्न लागते त्याच वेळी एक लेखी करार करण्यात येतो. त्या कराराप्रमाणे जर लग्न मोडलेच तर कुणी कुणाला किती पैसे द्यावयाचे हा आकडा निश्चित करण्यात येतो. ज्याला ते लग्न पुढे नकोसे होईल त्याच्याकडून ठरलेली रक्कम वसूल केली की घटस्फोट मिळत असतो. तिबेटी संसारही समान हक्कांवर चालतो.** नवरा स्वयंपाकही करतो. स्वयंपाक फक्त बायकानीच करावयाचा असे ठरलेले नाही. ज्याला आर्थिक दृष्टया परवडत असेल त्याला एकाहून अधिक लग्ने करता येतात.

## वाचकाचा वित्तवेध करणारा वैशिष्टयपूर्ण कथासंग्रह !

कि. रु. ४–५० ) **कथावली** ( पृष्ठे २०६

**लेखक : उद्धव शेळके**

लोकव्यवहाराचे सूक्ष्म निरीक्षण, नर्म विनोद, उपहासगर्भ लेखन-शैली इत्यादी वाङमयगुणामुळे रसिकाचे लक्ष वेधून घेणाऱ्या श्री. उद्धव शेळके यांचा हा कथासग्रह त्यांच्या आजवरच्या लौकिकात भर घालील असाच वैशिष्टयपूर्ण आहे यात शकाच नाही.

खास विदर्भीय बोलीचा प्रत्यय आणून देणारी त्याची संभाषण निवर्णनशैली हा तर त्यांच्या कथालेखनाचा एक आगळा अन विलोभनीय विशेष मानावा लागेल. प्रादेशिक कथाकार म्हणून श्री. शेळके याची प्रसिद्धी असली तरी केवळ प्रादेशिकतेचे दर्शन घडविण्यापुरती मर्यादा त्यांच्या कथासृष्टीला पडली नाही. मानवी स्वभावाचे शाश्वत व दिक्कालातीत विशेष साक्षेपीपणाचे चित्रण करण्यात त्यांनी स्पृहणीय यश संपादन केले आहे. या गुणामुळेच त्याचे या पूर्वीचे काही कथासंग्रह व एक कादंबरी सरकारी पारितोषिकास पात्र ठरली आहे.

ग्रामीण निरक्षर जनतेच्या जीवनात हरघडी निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा श्री. शेळके ज्या अभ्यासू वृत्तीने व सहानुभूतीने विचार करतात, तितक्याच सहजतेने अन मिस्किलपणाने ते त्या थरांतील लोकांच्या दोषांवरही बोट ठेवतात. शहरी लेखकाना वाटते तितके ग्रामीण जीवन भावडे, निष्कपटी अन् सरळ नाही, याचा ते मोठ्या कौशल्याने वाचकांना प्रत्यय आणून देतात. प्रत्येक कथाशौकिनाने जवळ बाळगावा असा हा मौलिक कथासंग्रह आपल्या संग्रही असलाच पाहिजे.

तीन रंगी आकर्षक मुखपृष्ठ, सुबक मुद्रण व मजबूत वाढत्या पुठ्ठ्याची बांधणी असलेला हा कथासग्रह सर्व ग्रथालयाचे भूषण ठरेल. आपली प्रत आजच मागवा.

## नवोदित लेखकांस अत्यंत उपयुक्त ग्रंथ !

कि. रु. ४–५० ) **ललित-लेखनाचे तंत्र** ( पृ. १८८+१२

**लेखक : बालशंकर देशपांडे**

ललितलेखन ही एक कला आहे तसे ते शास्त्रही आहे. ललित-लेखन करू इच्छिणाऱ्याने ते शास्त्र समजावून घेणे अत्यावश्यक आहे. ललितवाङमय म्हणजे काय, त्याचे ध्येय काय, ललितवाङमयाच्या बाबतीत कोणकोणते गैरसमज प्रसृत झालेले आहेत, ललितलेखन करू इच्छिणाऱ्याने कोणती पथ्ये पाळावयास हवीत, वास्तववादी वाङमय म्हणजे काय, ललितलेखन करणाऱ्यांवर सामाजिक जबाबदारी कितपत येऊन पडते या व अशा अनेक मुद्द्याचा परामर्श या ग्रथात घेतला असल्यामुळे नवशिक्या लेखकांनी व साहित्याविषयी जिज्ञासा बाळगणाऱ्या वाचकानी तो जरूर संग्रही ठेवावा.

ललितवाङमयाचे सुमारे तेराचौदा प्रकार, त्याचे घटक, स्वरूप, कार्य इत्यादीचे रसाळ व उद्बोधक विवेचन करणारा प्रस्तुत ग्रंथ मराठी साहित्यात अपूर्व ठरावा. कादबरी, कथा, नाटक, लघुनिबंध, काव्य, चित्रपटकथा, नभोनाट्य, नवकथा, नवकाव्य वगैरे बहुतेक लेखनप्रकाराविषयी यात सागोपाग ऊहापोह केला गेला आहे.

प्रा. अनत काणेकर प्रस्तुत ग्रथास पुरस्कार जोडताना म्हणतात "श्री. बालशकर देशपाडे याचा ग्रथ नुसता वरवर चाळला तरी प्रा. ना. सी. फडके याच्या गाजलेल्या 'प्रतिभासाधन' या वाङमय-विवेचनात्मक ग्रथाची तो तीव्रतेने आठवण करून देतो. तितक्याच रसाळ आणि सोप्या भाषेत श्री. देशपाडे यानी ललितलेखनाच्या घटकाची व घटकावयवाची विवेचक चर्चा केली आहे."

तीन रगी आकर्षक मुखपृष्ठ, सुबक मुद्रण व मजबूत वाढत्या पुठ्ठ्याची बाधणी असलेला हा ललित-लेखनाचा ग्रथ सर्व ग्रथालयाचे भूषण ठरेल. आपली प्रत आजच मागवा.

# साहित्य-रस स्पर्धा पुरस्कृत
# साहित्य-रस माला
## प्रकाशन संस्था

आमची पुस्तके मिळविण्याचा पत्ता —
**१. श्री तुकाराम बुक डेपो,**
माधव बागेजवळ,
सी. पी. टॅंक, मुंबई ४

आमची पुस्तके कार्यालयातूनही मिळतील.
२. साहित्य-रस माला
नीतिन मॅन्शन,
७ वी खेतवाडी, मुंबई ४

### प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| ● गीतकृष्णायन | म. पां. भावे | १–२५ |
| ● लबाड गावात | राजा मगळवेढेकर | ०–८० |
| ● जिकू किंवा मरू | आशा गवाणकर | १–०० |
| ● निळ्या परीच्या राज्यांत | दिनकर शिर्के | ०–५० |
| ● भुंज आणि इतर गोष्टी | शशिकात कदम | ०–५० |
| ● योगीराजांचा आश्रम | आर. जी. सप्रे | २–५० |
| ● ललित लेखनाचे तंत्र | बालशंकर देशपाडे | ४–५० |
| ● कथावली | उद्धव शेळके | ४–५० |
| ● पाच एकांकिका | मनोहर देखणे | १–०० |
| ● बालछाया | बजरग सरोदे | ०–५० |
| ● मंत्र (कथासंग्रह) | मधु मंगेश कर्णिक | |
| ● घरंदाज (कादंबरी) | श्रीकात पुरोहित | |
| ● धूम्रपान व स्वभावरेखा (सचित्र) | अ. स. कवरे | |

**ऑगस्ट महिन्यांत प्रसिद्ध होणार**

प्रसिद्धीच्या वाटेवर !

## तुकाराम-गाथा

**मराठी साहित्यमंदिराचा देदीप्यमान कळस !**

'मराठी वेदांचा उद्गाता' म्हणून विद्वज्जनांनी ज्यांचा सार्थ गौरव केला आहे त्या तुकाराम महाराजांच्या समग्र अभंगांची गाथा साहित्य-रस मालेतर्फे प्रसिद्ध होणार आहे. फटकळ पण सत्यान्वेषी, सामाजिक सोंगाढोंगांचा खरपूस समाचार घेणारी तितकीच अज्ञ जीवाविषयी कणव बाळगणारी तुकोबांची अभंगवाणी म्हणजे साऱ्या मराठी वाङ्मयाचे भूषणच होय !

साहित्य-रस मालेच्या प्रकाशनांच्या विक्रीसाठी गावोगाव एजन्ट्स नेमणे आहेत.

**गरजूंनी आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर त्वरित पत्रव्यवहार करावा.**

गोव्यामधील सर्व विक्रेत्यांनी आमचे सोल एजन्ट याच्याकडे मागणी करावी. पत्ता — श्री. मनोहर कर्पे, शोप नं. ३८, म्हापसा गोवा.

## हा हंत हंत

तिबेटमध्ये जनतेत फक्त संपत्तीच्या विषम वाटणीचाच दोष होता. तो काढून टाकण्यासाठी योग्य ती पावले दलाई लामांनी उचलली होती. **तिबेटी जनतेचे दलाई लामा व बौद्धधर्म यांवर एवढे प्रेम आहे, की या सुधारणा दलाई लामाने व धर्मगुरूंच्या परिषदेने केलेल्या आहेत हे समजताच त्याला कुणी विरोधही केलेला नव्हता.** आता लवकरच तिबेटमध्ये सगळ्यांना अन्नधान्यवस्त्र उपलब्ध होईल; कुणावर अन्याय होणार नाही आणि सुखशांतीचे साम्राज्य पसरेल अशा स्वप्नांत दलाई लामा असतानाच —' हा हन्त हन्त नलिनीम् गज उज्जहार '— असा प्रकार घडला. दलाई लामा लिहितात —

" Howerer before we reached this stage of our reforms, the Chinese were in command of us. We could not carry through such a far reaching change without their agreement. But they had come with their own communist ideas of land-reforms."

[ परंतु आमच्या सुधारणांचा हा टप्पा गाठण्यापूर्वीच चिन्यांनी आमचा कबजा केला आणि त्यांच्या समतीशिवाय दूरवर परिणाम घडविणाऱ्या या गोष्टी आम्हाला पुऱ्या करता आल्या नाहीत. शिवाय ते येताना आपल्या खास कम्युनिस्ट जमीनसुधारणाच्या कल्पना बरोबर घेऊन आलेले होते. ]

## स्वारीपूर्वी

तिबेटचे सैन्य होते फक्त ८५००. अधिकारी व सैनिक मिळून फक्त साडेआठ हजार सैन्यनिशी लाल चीनचा मुकाबला होणे शक्य होते काय ? बंदुका पुरेशा होत्या. परंतू लहानमोठ्या तोफा होत्या पन्नासच्या आतबाहेर. हे सैन्य मुख्यतः तिबेटमध्ये परकीय प्रवाश्यानी येऊं नये याकरिता व पोलिसी व्यवस्थेकरिताच होते. लढाई ! बौद्धांच्या सैन्याने लढाई ! अब्रह्मण्यम् ! आणि लढाई करण्याचे कारण काय ? आम्ही बरे, आमचा धर्म बरा. लामांच्या देशात कुणी येऊ नये – आम्ही कुठे जाणार नाही. आम्हाला सुधारणा नकोत आणि काहीसुद्धा नको ' अशी तिबेटची वृत्ती.

परंतू या कोकराला सुखासमाधानाने राहू देण्याचे लाल लाडग्याने काही वचन दिलेले नव्हते. गेल्या कित्येत शतकांत चीनला स्थिर सरकार नव्हते. लोकात एकता नव्हती. आता कम्युनिस्ट राजवटीने चीनची ताकत शतपटीने वाढलेली होती. यापूर्वी चीनने तिबेटशी भांडणे केली. परंतू समानधर्मामुळे त्या भांडणाचे स्वरूप काहीसे कुरबुरीचे – एकमेकाना ओरखडे काढण्याचेच राहिलेले होते. आता मामला पालटलेला होता. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा प्रसार हे चिनी आक्रमणाची या वेळी प्रेरणा होते. कम्युनिस्टाच्या वरवंट्याखाली चिनी मुसलमान सुतासारखे सरळ आले होते. तिथे या तिबेटी कोकरांची काय कथा ? रक्ताचा एक थेंब न सांडताना तिबेटी लोक जसा याकचा गुदमरून प्राण घेत तसा तिबेटचा प्राण चीनला घ्यावयाचा होता. लढाई फारशी अभिप्रेतच नव्हती.

दलाई लामा लिहितात —

" In 1948, while I was still a student, the Govt. heard there were Chinese communist spies in the country. They had come to find out, how strong our army was, and whether we were receiving military aid from any foreign power."

[ " १९४८ मध्ये, मी अजून विद्यार्थी दशेतच असताना सरकारला असा सुगावा लागला, की देशात चिनी कम्युनिस्टांनी हेरगिरी चालवलेली आहे. ते मुख्यतः हे पहाण्यासाठी आले आहेत, की आमचे लश्करी सामर्थ्य नेमके किती आहे व आम्हाला परदेशांची लश्करी मदत आहे की काय !" ]

यापूर्वी म्हणजे १९४५ मध्ये तिबेटी सरकारने जनरल चँग कै शेक याना तिबेट स्वतंत्र घटक आहे याला मान्यता द्यावी अशी गळ घातली होती. जनरल चँग कै शेक यानी ही गोष्ट करण्याची टाळाटाळ केली. त्याचे म्हणणे असे होते, की परराष्ट्रराजकारण हा विषय सोडला तर तिबेट हा चीनचाच एक प्रांत आहे. परंतू जनरल चँग कै शेकचे काय म्हणणे आहे याचा त्या वेळी फारसा विचार कुणी केलाच नाही. तिबेटला कसले आले आहे परराष्ट्रीय धोरण ! तेव्हा जोपर्यंत तिबेट चीनचा प्रांत करण्यासाठी चिनी सरकार काही करीत नाही तोपर्यंत भांडण उकरा कशाला या साळसूद विचाराने लामा जागतिक शांततेसाठी परमेश्वराची आळवणी करण्याच्या आपल्या अखंड उपासनेत पुनः गढून गेले.

नंतर चीनमध्ये यादवी युद्धाला तोंड लागले. चिनी लालभाईंची सरशी होऊ लागली. राष्ट्रीय सरकार डळमळू लागले. या वेळी तिबेटी सरकारच्या एक लक्षात आले, की जर वेळीच काही केले नाही तर चीनची लाल सैन्ये खुसपट काढून तिबेटचाही कबजा करतील.

**तिबेटी सरकारने म्हणूनच ही संधी साधून तिबेटातील यच्चयावत् चिनी माणसांची हकालपट्टी करण्याचे ठरवले. ऐशी ते शंभर चिनी आपल्या बायकापोरांसह सन्माननीय पद्धतीने तिबेटबाहेर पोचविण्यात आले. याटुंगपर्यंत त्यांना पोचविण्यासाठी खास बंदोबस्त**

## मृत्युघंटा

" जेव्हा राजवाड्याबाहेर चिनी बंदुकांनी मृत्युघंटा वाजवली तेव्हा राजवाड्याच्या आत जमलेल्या प्रत्येक तिबेटी अधिकाऱ्याच्या मनात आणि राजवाड्याभोवती कडे करून जमलेल्या प्रत्येक नागरिकाच्या मनात एकच विचार येत होता— माझा जीव वाचवला पाहिजे आणि मी राजवाड्यातून बाहेर पडून शहराबाहेर गेले पाहिजे. हा निर्णय घेणे ही लहानसहान बाब नव्हती. धोका मोठा होता. तिबेटचे भवितव्यच याबर अवलंबून होते...जर मी ल्हासातून निसटलो तर मी जाणार होतो कुठे...? मला आसरा होता कुठे ? आणि मुख्य म्हणजे जर मी निघून गेलो तर चिनी रागाने ल्हासा या आमच्या पवित्र शहराची राखरागोळी करून माझ्या देशबाधवांची कत्तल करणार नाहीत ना ? का मी निसटलो हे कळताच राजवाड्याभोवती जमलेला प्रचंड समुदाय पांगून घरी जाईल व काही प्राण तरी अशा रीतीने वाचतील ? अशा उत्तरे नसलेल्या प्रश्नानी आमची मने व्यग्र होती. " —**दलाई लामा**

[ पुढील अंकात येणाऱ्या निवेदनातून ]

## प्रयाणाच्या क्षणी

भारताकडे प्रयाण करण्यापूर्वी आपली काय अवस्था होती तिचे वर्णन करताना दलाई लामा लिहितात—

" सैनिकाचा वेष आणि टोपी माझ्यासाठी ठेवण्यात आली होती. साडेनऊचा सुमार असावा. मी माझा धर्मगुरूचा पोषाख उतरवला आणि ते विचित्र कपडे अंगावर चढवले व माझ्या नेहमीच्या खोलीत प्रार्थना करण्याकरिता गेलो. नेहमीच्या उच्चासनावर बसून मी बुद्धदेवांच्या शिकवणुकीचे पुस्तक समोर उघडले...... . पुस्तक मिटून मी त्या खोलीचा निरोप घेऊन दिवे घालवले. मी बाहेर पडलो तेव्हा माझ्या मनातील सर्व भावना निपटून निघाल्या होत्या व मन कोरडे, शुष्क झाले होते. जमिनीवर पडणाऱ्या माझ्या पावलांचा आवाज मला जाणवत होता आणि घड्याळाची टिकटिक शांततेचा भंग करीत होती. "

[ पुढील अकात येणाऱ्या निवेदनातून ]

दिलेले होते. वाजतगाजत ही टोळी तिबेटबाहेर हुसकण्यात आली.

१९४८ मध्ये लाल राजवट चीनमध्ये रुजताक्षणीच तिबेटने केलेला चीनचा अपमान धुवून काढण्याच्या उद्योगाला माओचाळू लागले आणि चिनी हेरांनी तिबेटमध्ये आपली जाळी विणली.

दलाई लामाने राष्ट्रीय परिषद बोलावली. ४०० तिबेटी प्रतिनिधींनी निर्णय घेतला की ब्रिटन, अमेरिका, भारत व नेपाळ यांच्याकडे चार शिष्टमंडळे पाठवावीत, ही शिष्टमंडळे निघण्यापूर्वी चारही देशाना तारा गेल्या – " लाल चीनचे आक्रमण संभवते आहे. शिष्टमंडळ आपल्याकडे मदतीसाठी याचनापत्र घेऊन येत आहे. "

या तारांना जे उत्तर ब्रिटन, अमेरिका व भारताने पाठवले त्याचा तर्जुमा या लेखाच्या सुरुवातीलाच दिला आहे. भारताने उपदेश पाठवला, – " लश्करी प्रतिकार करू नका. वाटाघाटी सुरू करा ! " ही उत्तरे येऊन पोचतात न पोचतात तोच तिबेटच्या पूर्व भागातून चिनी सैन्याच्या प्रचंड जमवाजमवीची बातमी ल्हासात येऊन थडकली. ही जमवाजमव तिबेटवर लश्करी आक्रमण वा दडपण आणण्यासाठी होती ही गोष्ट स्पष्ट दिसत होती.

### दलाई लामा सर्वाधिकारी होतात

काही दिवस जातात न जातात तोच पूर्व तिबेटचे गव्हर्नर नगबो (Nagabo) याचा संदेश घेऊन दोन दूत ल्हासा येथे पोटालात दाखल झाले. मजकूर गंभीर होता.

" मला चिनी सैन्याने अटकेत टाकले आहे. पूर्व तिबेटमध्ये चिनी सेनेने कबजा केला असला तरी आणखी पुढे न सरकता शांततेसाठी वाटाघाटी करण्याची त्याची इच्छा आहे. तरी तिबेटी सरकारच्या वतीने बोलणी करण्याचा अधिकार मला मिळावा. "

या आघाताने तिबेटी मंत्रिमंडळ हादरलेच. मंत्रिमंडळाला एक गोष्ट स्पष्ट दिसू लागली, की चिनी सैन्ये फार काळ पूर्व भागातच थांबणार नाहीत. मंत्रिमंडळाने दलाई लामाना विनंती केली, की त्यानीच सर्व राज्यसूत्रे हाती घ्यावीत. या वेळी दलाई लामाचे वय फक्त सोळा वर्षांचे होते. बारा वर्षे राज्य करून वय फक्त सोळा ! चार चार वर्षांच्या मुलाना गादीवर बसवले की अशा गोष्टी होणारच. दलाई लामा लिहितात–

" I know nothing about the world and had no experience of politics and yet was old enough to know how ignorant I was and how much I had still to learn. I protested at first that I was too young......

...We had reached a state in which most people were anxious to avoid responsibility rather than accept it ...and I, as Dalai Lama, was the only person, whom everybody in the country would unanimously follow. I saw that at such a severe moment in our history, I could not refuse my responsibilities. I had to shoulder them...so I accepted with terpidation & full power was conferred on me with traditional celebrations."


[ मला जगाचा काहीच अनुभव नव्हता आणि राजकारणाचा सराव नव्हता. तरीही मी किती अज्ञानी आहे व मला अजून किती शिकायचे आहे हे समजण्याइतपत मी मोठा होतो. प्रथम मीदेखील तक्रार केली की, ' मी अजून लहान आहे. '

परंतु आम्ही इतक्या गंभीर परिस्थितीत अडकलो होतो की बहुतेक लोक जबाबदारी उचलण्यापेक्षा ती टाळूच पाहात होते. शिवाय दलाई लामा या नात्याने मीच एक असा होतो, की ज्याचे नेतृत्व सर्वांनी मानले असते. आमच्या देशाच्या इतिहासातील या गंभीर क्षणी, मला जबाबदारी टाळणे पसत नव्हते—ही जबाबदारी घेणे हे माझे कर्तव्यच होते. मी ही जबाबदारी भीतभीत उचलली आणि परंपरेप्रमाणे मोठा उत्सव करून संपूर्ण अधिकारसूत्रे माझ्या हाती देण्यात आली. ]


हे सर्व होण्यापूर्वी मंत्रिमंडळाने तिबेटचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघापुढे नेलेला होता आणि तिथे काय घडते याकडे तिबेटी जनतेचे लक्ष लागलेले होते. भारत सरकारवर दलाई लामाची सारी भिस्त होती. भारत सरकारने वाटाघाटी करा असा आपला आवडता सल्ला दिल्यानंतर दलाई लामांची परिस्थिती इकडे आड तिकडे विहीर अशी झाली. अखेर विचाराने त्यांनी चिनी सरकारला लिहिले–

" मी अज्ञान असताना आपल्या दोन देशांतील संबंध फारच ताणले गेलेले आहेत. परंतु आता मी राज्याची धुरा उचललेली आहे आणि आपल्या देशात पुनः सौहार्द निर्माण व्हावे असे मला वाटते. असे सौहार्द पूर्वी होतेच. याकरिता पूर्व तिबेटी भागातून घुसलेले चिनी सैन्य मागे घेण्यात यावें आणि तिबेटी सैन्यातील पकडलेल्या कैद्यांची मुक्तता करण्यात यावी. "

दलाई लामा लिहितात–" चिनी आक्रमण थांबवण्याचा अखेरचा उपाय म्हणून नगबो याना चिनी सेनाधिकाऱ्याशी वाटाघाटी करण्याची अनुज्ञा दिली. परंतु भारतांतील चिनी वकिलाने आम्हाला कळवले की वाटाघाटी पेकिंगमध्ये होतील. ल्हासात किंवा पूर्व तिबेटात चामडो (Chamdo) येथे होणार नाहीत. तेव्हा नगबो याच्या मदतीला मी आणखी चार सरकारी प्रतिनिधी दिले व हे सर्वजण पेकिंगमध्ये दाखल झाले. (अपूर्ण)


आपल्या अंतिम विजया पर्यंत प्रत्येकाने कर्तव्याची पराकाष्ठा केली पाहिजे.
देशाच्या भरभराटी करितां रेल्वेंना अति महत्वाचें काम करावयाचें आहे. देशाच्या रक्षणा करितां आज तर त्यांचे वर अधिकच जबाबदारी येऊन पडली आहे.
मध्य रेल्वे

# ' तू सुखी राहा '



## रामचंद्र हिंगणे

पडद्यावर आलेल्या आपल्या कथेचे लेखकानेच
उलगडलेले हे धागेदोरे

"तू सुखी राहा" या चित्रपटाची जन्मकथा पाहिजे असे म्हटल्यानंतर मी जरा विचारात पडलो. विचारात पडलो याकरिता की, चित्रपटाची जन्मकथा सांगणे म्हणजे माझे, माझ्या भोवतालच्या लोकांचे खाजगी जीवन लोकांना जाहीर रीतीने सांगणे— अनेक वर्षे काळजात रुतून बसलेले प्रसंग परत उकलून दाखवणे. चित्रपटाची कथा लिहून झाल्यानंतर ते प्रसंग परत माझ्या मनातून निघून गेले होते. या निमित्ताने परत त्यांची स्मृती करणे जरूर आहे. माझे, माझ्या भोवतालच्या लोकांचे खाजगी जीवन उघड करून सांगणे भाग आहे. माझ्या मनात अनेक वर्षे रुतून बसलेले प्रसंग म्हणजे 'तू सुखी राहा'ची चित्रकथा, असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही.

**जिद्दीचे प्रेम**

माझ्या लग्नाला सतरा वर्षे झाली. लग्नानंतर मला प्रश्न पडला होता— माझ्या पत्नीचा मामा माझ्या सासऱ्याच्या कुटुंबाचा घटक कसा? जिज्ञासेपोटी मी विचारले तेव्हा मला समजले— माझ्या सासऱ्याने त्यांच्या मेहुण्याला अगदी लहानपणीच आपल्याजवळ आणून ठेवले— आपल्या घरीच वाढवले. म्हणजे बहिणीने भावाला संभाळले. अजूनही माझे मामेसासरे बहिणीकडेच आहेत. मी आज सतरा वर्षे पाहात आहे. बहीणभावांची माया मोठी अमेय आहे— गोड आहे. यात मनाला समाधान वाटत होते. पण त्यापेक्षा फार चांगली गोष्ट मला एके दिवशी समजली — माझ्या आश्रित मामेसासऱ्याला खेड्यातला एक खटयाळ माणूस तिरस्काराने म्हणाला, "कशाला गावात आलास? इथ ना जमीन ना काय तुला?—" दुसऱ्या दिवशी ही गोष्ट माझ्या सासऱ्याला कळली. त्यांनी आपल्या मेहुण्याला लगेच त्याच पावली तालुक्याच्या गावी नेले आणि त्याच्या नावावर आपल्या मालकीच्या जमिनीचा काही भाग करून टाकला आणि मेहुण्याला सांगितले, "जाऊन त्या माणसाला सांग, 'मी या गावात उपरा नाही. तुझ्यापेक्षा जास्तज मीन माझ्या मालकीची आहे.'" ही हकीकत कळल्यानंतर मला सासऱ्याच्या जिद्दीचा मोठा अभिमान वाटला. कर्णाला दासीपुत्र म्हटल्यानंतर अंगददेशाचे राज्य बहाल करणाऱ्या दुर्योधनात आणि सासऱ्यात साम्य. या घटनेवर लघुकथा लिहावी असे मनात सारखे घोळत होतेच.

**सावत्रपणा**

जावयाचा मान सर्वच समाजातून उत्तम राखला जातो. त्यातून खेडूत स्त्रियांना जावई दारी आल्यानंतर त्याला कुठे ठेवू आणि कुठे नको असे होते. या असल्या पद्धतीत माझ्या एका खेडूत नातलग स्त्रीवर अत्यंत दुर्धर प्रसंग आला. तो दुर्धर प्रसंग सांगण्याच्या अगोदर खेड्यातल्या कांही रीती सांगणे जरूर आहे. कोणत्याही परिस्थितीत पुरुषाने जेवण्यासाठी हात धुतले की, स्त्रीने जेवण हे दिलेच पाहिजे. दुसरी सोयीची रूढ वागणूक अशी की, प्रवासाला निघालेल्या कोणत्याही माणसाबरोबर स्त्रीने प्रवासात उपयोगी पडाव्यात म्हणून भाकरी बांधून दिल्या पाहिजेत.

त्या म्हाताऱ्या स्त्रीची सून पहिल्या बाळंतपणात मेली. लहान मुलगी जिवंत राहिली. मुलाने दुसरे लग्न केले. सावत्र आईने मुलीचे हाल सुरू केले. तेव्हा म्हातारीने आपल्या देखरेखीखाली नातीला वाढवले. मुलगी मोठी झाली. तिचे लग्न झाले प्रथमच जावई बैलगाडीतून न्यावयास आला. जावयाने आणलेल्या आजेसासूला बरोबर चलण्याचा आग्रह केला. म्हातारी निघाली. प्रवास १८ मैलांचा बैलगाडीचा होता. म्हातारीने सुनेला भाकरी बांधून देण्यास सांगितले. सुनेने दिल्यात म्हणून सांगितले. अर्ध्या प्रवासावर रस्त्यावर विहीर पाहून जावयाने जेवणासाठी गाडी सोडली. विहिरीवर हातपाय धुवून जेवणासाठी गाडीच्या सावलीत येऊन बसले. म्हातारीने बोचके सोडले. भाकरी नव्हत्या. सावत्र मुलीचा सूड घेतला होता. पण आता ती म्हातारी जावयाला कोणत्या तोंडाने भाकरी नाही म्हणून सांगणार होती! पाहिजे ती वस्तू जावयाला हजर करणे जरूर असताना साधी भाकर नाही, असे ती म्हातारी कोणत्या तोंडाने सागणार होती! केवढा मोठा अपमान! खाली मान घालून म्हातारी किती तरी वेळ काठीने माती उकरीत होती. शेवटी म्हातारीच्या डोळ्यांतून अश्रू आले. जावई काय ते समजला. राहिलेला सारा प्रवास न बोलता झाला. मला ही हकीकत कळल्यानंतर त्या म्हातारीच्या दुःखाची मी कल्पनाच करू शकलो नाही. ही घटना सहासात वर्षांपूर्वी मला थोरल्या वहिणीने सांगितली. तेव्हापासून माझ्या मनात म्हातारीचे दुःख सारखे घर

करून होते. या प्रसंगातील सारी पात्रे अजून जिवत आहेत. या प्रसंगावर गोष्ट लिहावी असे सारखे मनात येत होते. स्वतःच्या मुलाच्या बाबतीत काळीज काढून देणारी स्त्री सावत्र मुलाचे हृदय तोडायला सदा तयार असते यातले इंगित मला अजूनही समजले नाही.

२० जानेवारी १९५८ रोजी माझी खेडूत बहीण वारली. त्या अगोदर ती माझ्याकडे माहेरपणासाठी आली होती. घरातील अड-चणीमुळे ती घरातील भांडी घेऊन खाली चौकात घासण्यासाठी गेली. खेडुताचे कपडे अगावर असल्यामुळे बाकीच्या भाडेवाल्याना ती एक मोलकरीणच वाटली. निव्वळ कपड्यावरून चहाटळ मोलकरणी माझ्या बहिणीला मोलकरीण म्हणाल्या. बहिणीने तो प्रकार हसण्यावारी नेला. पण मला त्या मोलकरणीचा अतिशय सताप आला. शेवटी थोरल्या बहिणीनेच माझी समजूत घातली, "तुला तसे वाटत नाहीना– जगाच्या तोडाला कोण हात लावील ?"

तरी पण बहिणीचा झालेला अपमान माझे एक शल्य झाले ! तोही प्रसग मनात कायम रुतून बसला.

**बहिणभावांतील दुरावा**

माझी आई माझ्या वयाच्या दहाव्या वर्षी वारली. मला एक धाकटी बहीण आहे. थोरले तीन भाऊ. वडील कधीच घरी नसत भाऊ-भावजयींच्या राज्यात खऱ्या सुखदुःखाचे स्थान धाकटी बहीण. आईबापाविना पोरके झालेले आम्ही दोघेच एकमेकाची दु:खे जाणीत असू. माझ्या पायाला काटा टोचला तर तिच्या डोळ्याना पाणी येई. वयाने लहान असताना धाकट्या बहिणीने मला बालवयातच आईच्या मायेने वाढविले. भगि-नीच्या दिव्य प्रेमाचा साक्षात्कार त्याच वेळी मला झाला. अगदी बालपणीच !

पुढे तिचे लग्न झाले. माझे लग्न झाले. काळ लोटला. दोघाची सुखदु:खे निराळी झाली.

—आणि काही घरगुती कारणांमुळे विभक्त कुटुंब असूनसुद्धा आम्हा भावंडात दोन तट पडले. मी आणि थोरली बहीण एका बाजूला, तीन भाऊ आणि धाकटी बहीण एका बाजूला. ही तग परिस्थिती सात वर्षे होती. त्याच काळात बहिणीच्या दारी गेलो असताना बोलता बोलता धाकटी बहीण बोलून गेली. "एक भाऊ मेला असे मी मानते—" बालपणाच्या सुखदु:खाची वाटेकरी बहीण मला तसे म्हटल्यानतर मला काय वाटले, ते शब्दात व्यक्त करता येणे शक्य नाही. त्या वाक्याच्या कट्यारीने माझ्या काळजाचे तुकडे तुकडे केले. आता ती बहीण येते, राहते. त्या कट्यारीचे दु:ख कमी झाले. पण ती आली की, तिचे ते वाक्य आठवते. माझ्या मनाशी मी समजूत करून घेतो. ते वाक्य बहीण बोलली नाही. भाऊच बहिणीच्या तोडाने बोलले. लघुकथेला हा विषय केवढा तरी चांगला. भाऊच बहिणीला असे बोलला. अशी लघुकथा लिहावयाचे, हे मनात पक्के होते.

**माझे आजारपण**

ही सारी दु:खे, हे सारे प्रसग मन ढवळले की, वरती येत. माझा धाकटा मेहुणा माझ्या घरी गेली नऊ वर्षे आहे. तो बी. ए. झाला असून लवकरच वकीलही होईल. बहीण-भावाच्या मायेने दुखावलेले माझे मन माझ्या घरातली बहीणभावाची माया पाहून सुखावते. ज आपल्याला लाभले नाही, त्याचा अनुभव दुसरा घेत असताना मनाला समाधान लाभते.

१९६० च्या जून महिन्यात माझी छाती भयंकर दुखू लागली. प्रख्यात डॉक्टरांना दाखवूनदेखील त्याना निदान करता येईना. मृत्यूची अचानक झडप आपल्यावर येणार या कल्पनेने काळजाने ठाव सोडला. भय मृत्यूचे नव्हते आणि नसावे. पण. दु:ख होते भरल्या संसाराचे ! आपल्या पश्चात् विभक्त कुटुब-पद्धतीमुळे मुलाबाळाची दैना होणार असे एक मन सागू लागले. तर दुसरे मन म्हणे, तुझा मेहुणा आज नऊ वर्षे तुझ्या घरी आहे. बहीण-भावाची अवीट माया आहे. तो तुझ्या पश्चात् मुलाबाळाना अतर देणार नाही."

मनाची अत्यत नाजूक दोलायमान परि-स्थिती असताना आणखी एक दु:खद घटना घडली. प्रत्येक मे महिन्यात मुलाना आजोळी नेण्याचा माझ्या थोरल्या मेहुण्याचा रिवाज आहे. तो सज्जन आणि पापभीरू आहे. स्वतःच्या मुलापेक्षा तो माझ्या मुलावर जास्त माया करतो की काय, असे मला वाटते. एका मे महिन्यात मुलाना आजोळी नेले असताना खेडूत स्त्रियाच्या हट्टवादी समजुतीप्रमाणे त्याच्या पत्नीने मुलाच्या बाबतीत थोडासा दुजाभाव दाखवला. मला प्रश्न पडला ! त्या प्रसगाने मनाला टोचणी लागली. मेहुणे कितीही चागले असले तरी त्यांच्या बायका आपल्या पश्चात् मुलांना थारा देणार नाहीत. याची खात्री झाली. आणि तशी आपण अपेक्षा करू नये हे निश्चित् झाले.

अलीकडे माझी छाती राहिली. मृत्यूचे भयदेखील टळले.

माझ्या मनाची पार्श्वभूमी ही अशी.

१९३७ साली माझी पहिली कविता प्रसिद्ध झाली. तेव्हापासून कमीजास्ती प्रमा-णात मी लेखन करीत आहे आतापर्यंत चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**प्रकाशझोताकडे**

प्रख्यात दिग्दर्शक श्री. अनत माने आणि सर्वश्रुत दिग्दर्शक दत्ता माने हे माझे स्नेही आहेत. सिनेमाबद्दल अनेक वेळा त्यांची माझी नेहमी बोलणी होत असतात. "सागत्ये ऐका" या कथेवर चित्रपट काढा म्हणून सागणारा माणूस मी. माने यानी तशी लेखी कबुली एका लेखात दिली आहे. नेहमीच बोलणे होत असताना एके दिवशी दत्ता माने मला म्हणाले, 'कलाचित्राचे निर्माते एका नवीन चित्रपट कथेच्या शोधात आहेत. पण त्यांना कथा मानिनीसारखी दर्जेदार पाहिजे !'

"बहीणभावांच्या मायेची चालेल का ?"

"कसलीही चालेल. पण दर्जेदार पाहिजे."

"बहीणभावाच्या मायेची चालेल ?" मी याशिवाय दुसरा कोणता विषय त्यांना सागू शकणार होतो ?

"चालेल."

आणि मग मी माझे मन ढवळले. सगळे प्रसंग त्याना सागितले. तेव्हा रात्री ११॥ च्या दरम्यान दत्ता माने म्हणाले, "कदाचित कथा चांगली होईल. लिहून काढा !"

रात्री मला झोप लागली नाही. सारे प्रसंग एकामागून एक आठवू लागले. सकाळी दहा वाजता पधरा-सोळा चतकोर लिहून श्री. दत्ता माने याच्याजवळ दिले. कामाला गेलो. संध्याकाळी कामावरून आलो तर दत्ता माने माझी वाट पाहात होते. ते म्हणाले, "कथा चागली वाटते. रात्री बसू !"

आणि मग रात्री त्याच्या धद्यातील खुब्यां-प्रमाणे प्रसगाची जुळणी सुरू झाली. सकाळी कामाला. जाताना परत लिहून मी कामाला

( पृष्ठ ५५ पाहा )

# धन्य तूचि काता

गेल्या दिवाळी अंकांत सादर केलेल्या

या भावरम्य संसारकथांची स्मृति

पुसट होते न होते तोच

## मी तुळस तुझ्या अंगणी

हो संसारकथांची दुसरी लेखमाला

यंदाच्या ' माणूस ' दिवाळी अंकात


वाचकांसमोर ठेवली जात आहे.

### या आवृत्तीतील काही लेखिका—

- ' एकपात्री सौभद्र ' नामांकिता —
  सौ. सुहासिनी मुळगावकर
- अभिनेत्री
  नूतन
- नरी कॉन्ट्रॅक्टर यांच्या पत्नी—
  मिसेस डॉली कॉन्ट्रॅक्टर
- दोन सुधाताई—
  सुधाताई अत्रे
  सुधाताई जोशी
- सौ. जयश्री वैद्य—
  आणि.........










**स्वरुप केबल्स् :** रबरानें विद्युद्रोधक बनविलेल्या, घरगुती व औद्योगिक कामास उपयुक्त, उत्तम दर्जाविषयीं ISI प्रमाणपत्र.

**शस्त्रक्रियेचे हात मोजे :** वजनास हलके, नरम, वस्तू हातांतून निसटण्यास प्रतिबंध करील असा पोत; बोटांच्या नैसर्गिक हालचालीस अडथळा होत नाहीं व हत्यारांवर घट्ट पकड घेतां येते.



**स्वस्तिक-वर्टनवूड ऑईल सील्स् :** वेग कितीहि असला व उष्णतामान अधिक असलें तरीहि उत्तमप्रकारें व संपूर्णपणें प्रतिरोध ( सीलींग ) करतात. तेलास व जळणास अधिक अवरोधक्षम.





**गम-बूटस् :** पावसापासून पावलांचें संरक्षण करतात, बांधकामांत पायांचा इजा होण्यापासून बचाव करतात. मजबूत, आरामशीर व टिकाऊ.

**होज-पाइप्स :** सुरक्षित राहण्यासाठीं चिलखत चढविलेले, मजबूत, पंपाच्या साहाय्यानें पाणी वर खेचून तें शेतांत, मळ्यांत व बगीच्यांत नेऊन पिकांना पुरविण्यासाठीं आदर्श.

**स्वस्तिक** रबर प्रॉडक्टस् लिमिटेड,
खडकी, पुणें – ३

TOM & BAY SRP/M-12/63

## दोन पाखरे

भिवयातील दोन पाखरे पापण्यातुनी पसार झाली,
परस्परांना हळू बिलगुन धवल जळी अन् विरून गेली.
निळसर लाटांच्या फेसावर तरंगणारे पिंगट पक्षी
काजळलेल्या नेत्रकडेवर अविरत आणिक गायन करती.
अलवार काहीशी लाट सुरांची कानावरती माझ्या फुटते
प्रणयी जाणिव मुग्ध मनाची भाव त्यातले टिपून घेते.

—वन्या साठे

## चित्र

श्रावणातली सकाळ तृप्त अवघडलेली
धुन्द तारकांची स्वप्ने डोळा विरघळलेली
सथ काजळ धुक्याच्या पाठी सोडूनिया बटा
केश उदवीत उभी मुखी चान्दण्याची छटा
उभ्या पारोशा अगात रुपे क्षितिज काचोळी
मन्द आळोखेपिळोखे देती नारळपोफळी
वाळवंटात ठसले ठसे ओलेल्या टाचांचे
क्लान्त पदावलीतून स्मित सांडते उन्हाचे
क्षण गाफील सोन्याचे
झिरपले गात्री
असे चित्र उभे तुझ्या
मुकुलित नेत्री !

—श्याम कुलकर्णी

## जीवनाची पायवाट

पायवाट जीवनाची घेते वळण वाकडे ।
वळणाच्या टोकावर टोचतात; काटे, खडे ।
अतराला अंत नाही; दूर दूर जावयाचे ।
नाही वृक्ष; नाही छाया; कुठवर चालायाचे ?
वर अनंत आभाळ; तळी अयांग धरणी ।
श्रांत शोधिते नजर; कुठे गवसेल पाणी ?
नागमोडी पायवाट, घेते वळण वाकडे ।
दिसे हिरवळ दाट; माळभूमी मागे पडे ।
वळणाच्या टोकावर, शुद्ध वाहतो ओहळ ।
शीण संपतो क्षणात, जल प्राशिता निर्मळ ।
रानफुलांचे झुबके, जागजागी डोलतात ।
रंग जांभळे, पिवळे, किरणांशी बोलतात ।
आम्रवृक्षाची सावली, बोलाविते विसाव्याला ।
मंद झुळूक सोबती, जीव मोहरून गेला ।
नागमोडी पायवाट घेते वळण वाकडे ।
बदलता ढंग तिचा, जीवनाला रंग चढे ।

—गुलाब गायतोंडे

## गंध पक्षी

नग्न ज्वालांचा कल्लोळ
श्वास फुटतो मातिला
जन्मायाचे वेड तिला
झळंबल्या ज्वाला नभा
खालि अनामिक पक्षी
गात्रात कोरितो नक्षी
विज गती मृग थेंब
जग वादळून गेले
मीहि गंध धूल झाले
भरारला गंध पक्षी
मंदरेषा...ओला रंग
क्षितिजाशी अर्धसंग
पक्ष्यांच्या पंखांत, गात्रांच्या स्वप्नात
पहाट वेडी खून
पोपटी तृणात नितळ मनात
स्पर्शासारखे उन
वादळी मिठीत श्वासांचे संगीत
उबेतो असा वारा
पौषातिल रग डहुळले अंग
थांबेना इथे जरा
किती अनिवार जरीकाठी भार
तळमळति शेज
कंचुकिचे बंध हुंगताना गंध
येते गात्रांना निज

—उदयन

## मेल्याहून मेलेल्यांना

जन्म झाल्यावर झाले
मनी मेल्यावर मेले
तेथे जन्म नको देवा !
जेथे जीवन कुजले
जन्मो-जन्मींच्या सुखास
लाचावली किडा-मुगी
साधकाला साद आली
मुक्ती गाजराची पुंगी
स्वर्ग शोधतो मातीत
आभाळाचा निळा डोळा
रुजे मातीत हिरवा
मंत्र जगण्याचा भोळा
हुडकाव्या मातीतल्या
नित्य नव्या जन्म-खुणा
मेल्याहून मेलेल्यांना
जन्म नाही पुन्हा पुन्हा.

—ह. शि. खरात

# सोनेरी मासा

गोखलेबाईंनी डाव्या हाताने चक्कर घट्ट दाबून ठेवले, मान खाली केली, टेबलावरचे आकडे उचलले, उजव्या हाताने ते व्यवस्थित लावले, वर आरशात पाहत दोन्ही हातांनी चक्कर मानेवर बरोबर बसले आहे की नाही याची खात्री केली, अन् जाळी बांधली. सगळे ठीक झाल्यासारखे वाटल्यावर खुर्चीवरचा टॉवेल त्यांनी उचलला अन् त्या तोंड धुवायला गेल्या. चेहरा खसखसून पुसून काढल्यावर गाल, नाक, कानांच्या पाळचा लालबुंद झाल्या. आरशाच्या अगदी जवळ तोंड करून डाव्या-उजव्या बाजूंना न्याहळून घेताना त्या खुश झाल्या. किंचित् थांबून आरशातल्या आपल्या छबीकडे पाहून हसल्या. अजूनही आपण इतके मोहक हसतो याचा त्यांना अभिमान वाटला. त्या पावडरच्या डबीचे झाकण उघडतात. परंतु त्यात फूल नसते.

"माले, इकड ये लवकर" हाकेसरशी चौदापंधरा वर्षांची माली बिचकत खोलीत येते.

"पावडरच्या डबीतल फूल कुठाय ?" मालती टेबलावर कुठे सापडते का पाहते. गोखलेबाईंना असले काही आवडत नाही. नोकरचाकरांनी जिकडेतिकडे ढवळाढवळ करावयाची म्हणजे काय ? अन् साबीसुबी का पावडर वापरतात त्या ? 'मॅक्स फॅक्टर' ब्रँड आहे त्यांचा ! "पुरे झाल शोधायच कौतुक आता–अन् पुनः एकदा सांगून ठेवते, कधी माझ्या वस्तूंना हात लावलास तर याद राख." मालती खालच्याा मानेने निघून जाते. "करायचेत काय पावडरी अन् फावडरी मोलकरणींना-उद्यापासन खोलीत यायच बंद. करून टाकीन–अवलक्षणी कार्टी–"

बाईंच्या खोलींतून बाहेर पडायच्या दरवाज्याजवळच एक छोटी टी पॉय आहे. तीवर बाईंची एंगेजमेंट डायरी पडलेली असते. बाई शंकराला हाक मारीत लगबगीने दरवाज्याशी येतात. शंकर त्यांचा ड्रायव्हर आहे. दरवाज्याचा पडदा दूर सरकवीत बाहेर पडताना डायरीवर त्यांचे लक्ष जाते. गुरुवार–सुहासची शाळा–मास्तरांच्या भेटीसाठी जाणे–वाचल्यावर त्यांना आश्चर्य वाटते. भिंतीवरच्या कॅलेंडरकडे दोनदोनदा पाहत आज गुरुवार असल्याची त्या खात्री करून घेतात. स्वत:शीच हसतात. आजची एंगेजमेंट विसरलेल्याच असतात त्या 'मी तरी म्हणत होते. काहीतरी खास काम आहे म्हणून.' कुठे जायचे हे लक्षात न आल्यामुळे टाईम पास करण्यासाठी शॉपिंगला जायचे त्यांनी ठरवलेले असते. तेवढ्यात शंकर आत येतो. बाईंच्याकडे पाहत हुकुमाची वाट पाहत नुसता उभा राहतो. "काही नाही. जा– गाडी तयार ठेव." इतक्या सौजन्यशील वागणुकीचे त्याला आश्चर्य वाटते.

आरशासमोर येऊन स्वत:च्या प्रतिबिंबाकडे पाहतात. 'छे: ! शाळेत जायच म्हणजे असले कपडे करून चालायच नाही.' असे मनाशी म्हणत त्या फुलपाखरासारख्या भिंगांचा गॉगल काढून ठेवतात. जांभळट रंगाचे नायलॉनचे पातळ अन् तसाच ब्लाऊज मनांत भरत नाही. चिकनचे पांढरे शुभ्र पातळ अन् ब्लाऊज शेवटी ठरतो. कानातल्या 'नवरंग' इअरिंग्जची जागा मद्रासी पांढऱ्या खड्यांच्या कुड्यांनी घेतली जाते. व्हॅनिटी बॅगऐवजी एवढीशी पांढरीच पर्स अन् हातात छत्री घेऊन त्या पुनः आरशासमोर येतात "छान ! आता जरा इंप्रेसिव्ह वाटत नाही !"

सुहास सातवीत शिकतो आहे. तिमाहीला त्याचा दुसरा नंबर आला तेव्हा तो म्हणाला, "तुला काही माझा पहिला नंबर यावा अस वाटतच नाही. मंडल्याची आई सरांना भेटून गेली तेव्हा त्याचा पहिला नंबर आला की नाही बघ !" "अस आहे होय ! या मंडलीकिणीने जसा काही जिथ तिथ अपमान करायचा विडाच उचललाय. तुझा नक्षा नाही उतरवला तर नावाची मृणाल गोखलेच नाही." सुहासन फारच हट्ट धरला म्हणून त्यांनी आज जायच ठरवल होत. "पोरग बाकी जिद्दी आहे बर का ! पहिला नंबर गेल्याच वाईट किती वाटतय ! माझ्याशी रडूनरडून हाड काढून घेतली. कसा गुटगुटित होता अगदी. अन् आता अस रडायला लागल पोर की मला बर बघवेल ते !"

शाळेतून परत येताना त्या स्वत:शीच हसत होत्या. "मुख्याध्यापक किती भित्रे ! मी गेल्यावर त्रेधा तिरपीट उडाली अगदी. गोखलेबाईंना तंत्र तसे छान जमते ! शाळेची प्रगति कशी काय आहे, नव्या इमारतीच काम कस काय चाललय ? देणग्या कुठपर्यंत आल्यात" अशा दूरदूरच्या गोष्टी गोड गोड रीतीने बोलून, मुद्याची गोष्ट झाल्यावर त्या शाळेबाहेर पडल्या होत्या. त्यांची कार शाळेसमोरून हालेपर्यंत सारे शिक्षक खिडकीतून बाहेर बघत होते. त्या नेहमीपेक्षा जास्त रुबाबात बसल्या. मोटारच्या बाहेरचे जग नेहमीपेक्षा जास्त उल्हसित दिसत होते.

गोखलेबाईंना मंडलिकांचा फार राग येतो. मिस्टर आणि मिसेस दोघांचाही ! "काय ते टक्कल पडलेल ढेरपोट सोंग ! अगदीच मुखदुर्बळ आणि त्याच्या उलट ती ढालगज भवानी. आता एवढ्या मोठ्या बाईला तस

अरविंद दीक्षित



म्हणायची हौस का आहे कुणाला ? पण एवढ मोठ असल्याची कबुली तरी द्यायला पाहिजे ना ! ' मला म्हणे बत्तिसाव लागेल आता ! ' लोकांना काय ठाऊक नाही, हिची सर्वांत मोठी मुलगी बी. ए. ला आहे. कितीही हुशार आहे म्हटल तरी कमीत कमी अठरा-एकोणीस वर्षांची तरी असेल की नाही ? म्हणजे काय–वय सांगताना या गोष्टींचा तरी विचार करावा की नाही माणसान ?–"

मंडलिकांचे नाक ठेचायची संधिच बाईंना मिळत नाही. मागे एकदा नवनवीन पदार्थ तयार करण्याची स्पर्धा झाली त्यांत मंडलीक बाईंचा पहिला नंबर आला. ' स्वयंपाक काही येरागबाळाच काम नाही. तेथे पाहिजे जातीचे ' असा चार चौघात सरळ टोमणा मारला– ' स्वयंपाक म्हणजे काही सगळ नाही. अजून कितीतरी स्पर्धा व्हायच्येत. चांगला इंगा दाखवीन. ' असे म्हणून बाईंनी मनाचे समाधान करून घेतले होते. सगळ्या स्पर्धांत मंडलिकांनाच बक्षीस मिळायचे. कमीत कमी गोखल्यांच्यापेक्षा वरचढच असायच्या. डोळ्यात सलत होत ते तेच ! ही बाई आपल्याला ऐकणारी नाही याची पुरेपूर कल्पना येऊनसुद्धा त्या हार मानायला तयार नव्हत्या. स्वयंपाकाच्या स्पर्धेत त्यांनी पदार्थ दुसऱ्या बाईकडून करून घेतले होते, भरत-कामाचे नमुने त्यांनी विकत घेतले होते. हे ऐकून त्या स्वतःवर जळफळत होत्या. असल्या कल्पना आपल्याला का येत नाहीत; याबद्दल राग येत होता. मग अगदी अगतिक होऊन त्या म्हणाल्या होत्या, ' खऱ्याच जगच नव्हे हे ! '

गोखलेबाईंकडे उठायबसायला नेहमी बडी मंडळी असतात. त्यांच्याकडे डॉक्टर, मॅजि-

---

" तो सोनेरी मासा अगदी एक्कलकोंड्यासारखा वागतो बर का ! बाकीचेही काही कमी रंगीबेरंगी नाहीत ...... मलासुद्धा कसतरीच वाटत बाई मंडळात गेल्यावर. पण दुसरीकड कुठ टाईम पास होत नाही म्हणून जायच ...... "

गोखले बाईंचे हे दुःख होते, सुखही होते. कारण मोठे मासे छोट्या माशांना खातातच. सोनेरी असले तरी !

---

स्ट्रेट, मोठमोठ्या दुकानदारांशिवाय कुणी येतच नाही. 'परवा की नाही मी पिक्चरला गेले होते. म्हणजे मला काही जायच नव्हत, पण जज्जसाहेब आले अन् सरळ मोटारीतून घेऊन की हो गेले, मग मी तरी काय करणार—' अशा नाजूक तक्रारी ऐकून घ्याव्या लागतात. घरातल्या नवनवीन गोष्टी दाखवून होतात. गडीमाणसाची कौतुके होतात. त्यांना स्वातंत्र्य कसे असते, पगार किती असतो, वागणूक कशी अगदी घरच्या-सारखी मिळते. एखादी गोष्ट किती वेळा सांगून झाली हे त्याच्या लक्षात नाही राहत. अन् भिडस्त स्वभावामुळे पुन पुन. ऐकाव्या लागतात.

गावकरांचे कापडाचे खूप मोठे दुकान आहे. अतिशय आग्रहामुळेच ते बाईंच्याकडे बसायला म्हणून आले आहेत मिसेससह. बाहेरच्या खोलीत गोखलेसाहेब अन् गावकर बसलेत गप्पा मारीत. आत बाईसाहेब मिसेस गावकराना गोदरेजचे कपाट उघडून दाखवतात. पेटीतल्या एकेका दागिन्याचे कौतुक चालले आहे. "हा कठमणी की नाही आमच्या ह्यानी घेतला बर का ! लग्नाच्या वाढदिवशी. त्या दिवशी सध्याकाळी ते हट्टच धरून बसले आपण दोघानी फिरायला जायच म्हणून. मी म्हटल मला आता 'सोशल' अटेंड करायचय. तुम्हाला पाहिजे असल तर लिफ्ट देते जिकड जायच असेल तिकड. हो म्हणाले अन् सरळ सराफाकड घेऊन गेले की ! म्हणाले 'हा कंठमणी तुला कसा वाटतो ?' आता तुम्हीच बघा, छान आहे की नाही ? मला वाटल नुसत 'विंडो शॉपिंग' चाललय. मी म्हटल–' आहे ! जस्ट फाईन ! ' त्यानी लगेच गळयात बाधला. अगदी दुकानातच, सर्वांच्या देखत ! अन् म्हणाले, 'ही आपल्या लग्नाच्या वाढदिवसाची भेट.' मी नाही बाई गेल्ये मग कुठ ! अशा घरच्या प्रेमळ माणसांपुढ कसल सोशल अन् कसल मडळ ! ! "

"आमचे मिस्टर सुद्धा असच करतात बाई ! मागच्या वर्षी काय झाल आम्ही दोघजण—"

"अन् त्या दिवशी मी अगदी हवेतच चालले होते. अन् हे मंगळसूत्र खास शोसाठी म्हणून करवून घेतल—"

हे असे चालते. गोखलेबाईंकडे दोन घटका बसायला बोलायला जायचे म्हणजे नुसती त्यांची बडबड ऐकायला जायचे हे सगळ्यांना ठाऊक आहे. त्याच्या प्रत्येक कृतीत वैशिष्ट्य आहे, वेगळेपणा आहे. त्यांना भरतकाम करताना सुई टोचली तर डॉक्टराना फोन जातात. सेप्टिक होऊ नये म्हणून इंजेक्शने होतात. अन् इजेक्शने तरी किती महागाईतली—" पण मी म्हटल देहापुढ पैशाकड ते काय बघायच ! " हे येणाऱ्या जाणाऱ्याला ऐकावे लागते. "सोफासेटच्या कव्हर्सचा 'चॉईस ' ह्याचा असतो. सुहासला फ्लॉवरपॉट अरेजमेंटच वेड असत. या वयांत फारच समज बाई पोराला ! " तसे पाहिले तर बाईंच्या घरातले दरवाज्यावरचे पडदे आखूडच आहेत. पण तसे सांगितले तर त्यांना पटत नाही. " हे कर्टन्स की नाही, याच्या सागण्यावरून शिवले बरं का ! ते पाटणकर स्टेट्सहून परत आले ना त्यांनी ही स्टाईल पिक्अप् केली म्हणे ! आमचे साहेब बंगलोरला गेले की त्याच्याकडेच उतरतात. परवाच्या खेपेला हे सहज म्हणाले 'कर्टन्स छान आहेत.' मिसेस पाटणकरानी लगेच एक नमुन्यादाखल दिला. "

बाईंना त्याच त्याच वस्तूंचा फार लवकर कंटाळा येतो. बसायच्या खोलीतली फर्निचरची माडणी कशी वारवार बदलावी, नेहमी येणाऱ्या माणसाला प्रत्येक वेळी काही तरी नवीन वाटले पाहिजे. भितीचे रग देखील नेहमी बदलावेत. कसे अगदी बरे वाटते. येत्या उन्हाळयात एअर कूलर लावायचे नक्की ठरले ! नाहीतरी पल्याची स्टाईल कंडम झालीच आहे. बाईसाहेबाचे छदही वेळोवेळी बदलत असतात. पूर्वी ' टेबल अॅक्विशियम ' सोडून दुसरीकडे कुठे बघावे म्हटले तर पुरसत नसे. जेव्हा तेव्हा त्याचे रंगीबेरंगी माशाशी हितगूज चालू असे. 'तो सोनेरी मासा अगदी एकलकोंडयासारखा वाटतो बर का ! इतर लोकात कधी मिसळतच नाही. बाकीचेही काही कमी रंगीबेरगी नाहीत–म्हणा–पण सोनेरी सर कुठून येणार त्याना ! अन् सोन्याचाही खरच आहे, खालच्या दर्जाच्या लोकाबरोबर त्याने तरी का मिसळाव ? मलासुद्धा कसतरीच वाटल बाई मडळात गेल्यावर. पण दुसरीकड कुठ पास टाईम नाही म्हणून जायच एवढच.' तसे पाहिले तर बाईंच्या तोडीच्या अनेकजणी आहेत. नाहीत असे नाही. पण बाईंना नाही असल्या बायकांत वावरणे आवडत. 'हो ! पहिल्यादा मानअपमान बघितला पाहिजे अन् मग समाजकार्य— '

काही दिवसांपूर्वी गार्डनिंगची लाट उसळली, अन् त्यावरच्या लहानमोठ्या पुस्तकाची रीघ लागली. जशी पुस्तकाची तशीच फुलझाडांचीसुद्धा. आज इकडून गुलाब आला, तिकडून डेलिया आला, कोकणातून अनंत आला, बागेत फुलझाडाची ही गर्दी झाली. बाईंना सगळ्या गोष्टी कशा भरभर झालेल्या आवडतात. माणसाने कसे स्मार्ट असावे. दोनचार गड्याना हाताशी घेऊन पंधरवड्यात बागेला रूप आणले; पण फुलांची वाट बघायची वेळच आली नाही. मध्येच पोल्ट्रीची टूम निघाली अन् पुनः त्या विषयाची पुस्तके माहितगार लोकाच्या भेटी, खडकीचा पोल्ट्रीफॉर्म जाऊन बघून आल्या. बागेच्या जागीच खुराडी उभी राहिली. जाळीचे कुपण आले, अन जेव्हा बाईसाहेबाच्या कुत्र्याचे अन् कोंबड्याचे जमेना तेव्हा त्याला अर्धचंद्र मिळाला. थोड्या दिवसानी कुठल्याशा रोगाने कोंबड्या जशा पटपट मरायला लागल्या तेव्हा बाईंचा इंटरेस्ट उतरला. 'नाहीतरी मला बाई आवडत नसेच ती लाबण –! '

गायनाचे प्रस्थ झाले; 'सण्डे पेंटर्स 'चा परिचय येतो हे पाहिल्यावर चित्रकला अभ्यासून झाली. लेखनात सुद्धा प्रयोग करून झाले. पण सगळीकडे अपयश आल्यावर 'जिनिअस ' ला किंमतच नाही जगात ' असे म्हणून त्यानी नाद सोडला, अधूनमधून रेडिओवरच्या 'गृहिणींसाठी खास कार्यक्रमा 'साठी व्याख्यानश्रुतिका लिहीत असतात. कार्यक्रम सुरू झाला की उत्साहाने रेडिओ ऐकत बसतात. पहिल्यादा गाणे सुरू झाले तर ते संपायची वाट बघतात. पुढले भाषण आपण लिहिलेले असेल या आशेने नाव ऐकायची उत्सुकता असते. ते त्याचे नसले तर 'काय रटाळ विषयाच सिलेक्शन होतय हल्ली ! ' असे स्वतःशी पुटपुटत सोफ्यातल्या उश्याची अदलाबदल करतात ! शेजारच्या टीपॉयवर फॅमिना, इव्हज् विकली, स्त्री-सारख्या मासिकाचा ढीग लागलेला असतो. तो वारंवार चाळीपर्यंत व्याख्यान सपलेले असते. पुढली श्रुतिका तरी आपली असेल असे वाटते पण आताही निराशाच होते. खरे म्हणजे कुठलाही

कार्यक्रम सादर करण्यापूर्वी लेखिकेला कळवले जाते हे बाईंना ठाऊक आहे. पण आशा वेडी असते. सानेबाई नेहमी सांगत असतात...... "आज पुण्याहून संमति आली, पुढल्या आठवड्यात मुंबईवर व्याख्यान आहे. मला आता जायची तयारी केलीच पाहिजे. नागपूरच्या अधिकाऱ्यानी 'एखादी श्रुतिका लिहून देता ना?' म्हणून फारच आग्रह केला बाई!" असे त्यांचे पुराण नेहमी चालू असतेच. बाईंना खरे वाटत नाही की सानेबाई स्वतः लिहीत असेल. 'असल्या बायकाच्या हातून काय होणार आहे! नुसत झकपक वागून मोठेपणाचा आव आणत्ये. सान्याची वकिली कितपत चालत्ये ते माहीतच आहे!'

नभोवाणीचे पत्र कदाचित् पोस्टात गहाळ झाले असेल अन् चुकून आपला कार्यक्रम आजच असेल या आशेने त्या सारा कार्यक्रम ऐकतात. पत्रांच्या उत्तरातदेखील जेव्हा त्यांच्या नावाचा सबंध येत नाही तेव्हा त्या चिडतात. रागावतात. मालतीला बिचारीला सगळे ऐकून घ्यावे लागते.

रागावल्यावर गोखलेबाईंसारखे चमत्कारिक कुणीच नाही. सुहासला अन् मिस्टर गोखल्याना सुद्धा त्याची सवय झाली आहे. मम्मी रागावलेली असली तर सुहास मित्रांना बाहेर नेतो. 'मम्मी फार रागावते बर का अव्यवस्थितपणा पाहिल्यावर' गभीर चेहरा करून तो सागतो. अशी जोरजोरात नेहमी रागावणारी मम्मी त्याच्या मित्राना मनापासून आवडतच नाही, पण खायप्यायला भरपूर मिळते; नवनवीन मिळते; ते येतात; एवढेच. बाईंनासुद्धा चागले मित्रच आवडतात. चागले कपडे करणारे. 'आँटी आँटी' करणारे. खड्यासारखे शेंबडे, टोपी घालणारे, काळेबेंद्रे मित्र आवडतच नाहीत. तिने ताकीदच देऊन ठेवली आहे –'असल्या मित्राना घरी आणीत जाऊ नकोस अन् त्यांच्या संगतीतही राहू नकोस. बिघडशील. मित्र कसे आपल्या दर्जाचे पाहिजेत.'

परवा सहज मोटरीतून हिंडताना नवीन दुकान दिसले म्हणून आत शिरल्या. 'फिलिप्स'ची शोरूम होती ती. चागले लाइटिंग, चागली रंगसगति, बसायला कुशन चेअर्स, आकर्षक कॅलेंडर्स, अन् या सगळ्यात शोभून दिसणारा हसतमुख विक्रेता. मन अगदी प्रसन्न झाले. समोरच्याच शिसवीच्या रगाच्या मोठ्या केसकडे बघून आश्चर्य वाटले. त्यांनी विक्रेत्याकडे पाहिले. तो आदबीने पुढे झाला. अन् केसचे दार हळुवारपणे वर करीत म्हणाला, 'रेडिओग्रॅम मॅडम.'

"ओह! ब्यूटिफुल!" उजव्या हाताला प्रशस्त रेडिओ, डाव्या हाताला रेकॉर्डचेजर, खाली रेकॉर्ड्स् ठेवायला जागा. बाईंच्या एकदम मनात भरले हे सगळे. पियानो स्विचेसवरून हात फिरवताना खुशीने त्यानी डोळे मिटले.

"ओन्ली एटीन फिफ्टी मॅडम!"

"असं!"

"परवाच ओसवाल शेटजी घेऊन गेले."

त्या मारवाड्याने असली चीज घ्यावी याचा त्याना राग येतो. मूड एकदम बदलतो.

पुढच्याच टेबलावर एक आकर्षक बॉक्स आहे. क्षणभर त्या तिथेच उभ्या राहतात. 'हा फिलिप्सचा लेटेस्ट टेप रेकॉर्डर आहे बाईसाहेब, ए. सी.–डी. सी. मेन्स. बॅटरी ऑपरेटेड फोर ट्रॅक्स, फोर स्पीड्स, ड्यूरेशन '...

त्यांनी मागे वळून पाहिले. दुसरा विक्रेता सांगत होता. त्यानी एक क्षणभर थांबून पहिल्या विक्रेत्याला खुशीने बोलावले.

"काय बाईसाहेब?"

"हा टेपरेकॉर्डर रेडिओग्रॅममध्ये बसवता येईल का? अगदी ओरिजिनल वाटल पाहिजे."

"होय बाईसाहेब!"

"अन् अस पाहा! काम झाल्यावर बगल्यावर फोन करा." व्हॅनिटी बॅगमधून व्हिजिटिंग कार्ड काढून बाईंनी हातावर ठेवले.

असे काहीतरी नवीन हातात पडले की बाई खुश असतात. आपल्या घराची सगळ्यानी स्तुती करावी याचा त्याना फार हव्यास आहे. 'तुमच फर्निचर अगदी अपटुडेट असत' असे म्हटल्यावर त्याना मूठभर मास चढते. मिसेस इनामदारना ही कला चागली अवगत आहे. त्या पूर्वी बाईंच्याच सहवासात असायच्या. पण हल्ली त्यांच्या यजमानाचा धंदा तितकासा जोरात चालत नाही आणि त्याचा वरखर्च तर कमी होत नाही. तरी त्या गोखलेबाईंकडे येऊन बसतात. त्या घरी नसल्या तरी वारवार येतात. भेट झाल्यावर अगदी सहज म्हणून आले होते असे भासवतात.

"बर झाल बाई, तुम्ही आलात. मला अगदी लोनली वाटत होत."

"मलाही हल्ली एकट एकट वाटत. अन् त्या मडळीत जाऊन तरी तुझ माझच करायच की नाही! त्यापेक्षा तुमच्याकड बर वाटत बाई!"

इनामदारानी कार विकली आहे हे गोखलेबाईंना ठाऊक आहे. ती विकताना नवीन मॉडेल घ्यायचा भास निर्माण केला आहे हेही ठाऊक आहे. म्हणूनच त्या म्हणतात–

"चला, जरा फिरायला जाऊ या का?"

"आज नको बाई. कंटाळाच आलाय फिरायचासुद्धा!"

"आपल्याला काय, मोटरीतून जाऊ!" असे कोंडीत पडल्यामुळे बाई खुशीत आहेत त्याच खुशीत म्हणतात–

"मालेऽ चहा आण ग दोन–"

इनामदार नेहमीप्रमाणे छोटे छोटे घुटके घेतात. मधूनच बिस्किटाचा नाजूकसा तुकडा तोडतात. अन् त्याच्या या डौलदार हालचालीवर गोखलेबाई जळफळत असतात... 'काप गेले पण भोक राहिली!'

"बरी आठवण झाली. तुम्ही पाचशे रुपये उसने देणार का" गोखलेबाई तिकडे लक्ष नसल्यासारखे करतात.

"वाटल्यास ही अंगठी ठेवून घ्या. हिऱ्याची आहे."

"काय म्हणालात?" एकदम भानावर येत त्या म्हणाल्या.

"म्हटल, ही अगठी ठेवून घ्या अन् पाचशे रुपये हातउसने द्या."

"पाचशेच ना! मग त्यासाठी अगठी कशाला पाहिजे!" असे म्हणत सहजपणे अगठी उचलतात. खरच भारीतली आहे ती. गोदरेजच कपाट अर्धवट उघडतात. इनामदारना दिसणार नाही अशा बेताने आतल्याआत पैसे मोजतात. अन् पुनः येऊन बसतात. मिसेस इनामदारना जायची घाई आहे. पैशाकडे अन् घड्याळाकडे बघत त्या उठल्यादेखील. बाईंचेही लक्ष घड्याळाकडे असते. सात वाजायला पाच मिनिट अवकाश आहे. प्रोफेसर मराठे मिसेससह येणार आहेत हे त्यांच्या लक्षात आहे.

तितक्यात मराठे दापत्य येतेच. अन् त्याच्याशी गप्पा मारता मारता गोखलेबाई

(पृष्ठ २६ वर पाहा)

# कुऱ्हाड

मधु मंगेश कर्णिक

राजाराम दहा एक वर्षांपूर्वी जेव्हा प्रथमच आपली कथा घेऊन माझ्याकडे आला, तेव्हा मी प्रसिद्धीच्या शिखरावर होतो. राजाराम साहित्याच्या प्रांतात नुकते पाऊल टाकू इच्छीत होता. आणि मी एक प्रथितयश साहित्यिक म्हणून वावरत होतो. दोन वर्षांपूर्वीच साहित्यसमेलनाचे अध्यक्षपद मी भूषविले होते. कथा, कादंबरी, काव्य, नाटक आणि समीक्षा यांवरील — माझी किमान पाऊणशे पुस्तके वाचकाच्या समोर होती. मी नित्य नवे लिहीत होतो. प्रकाशकांची त्यासाठी अहमहमिका लागली होती. वाचक माझ्या हातचे लेखन वाचायला उत्सुक होते. मी देईन ते स्वीकारीत होते. आणि मला नित्य नवे नवे सुचतही होते. वाङ्मयाचा एक विलक्षण उन्माद मला चढला होता. यश, कीर्ती, पैसा आणि सन्मान ही सगळी माझ्या समोर हात जोडून उभी होती. माझ्या ग्रंथांना सरकारी पुरस्कार मिळत होता. त्यांच्या आवृत्यामागून आवृत्या निघत होत्या आणि मी नवनवे विषय हाताळीत होतो. साहित्यक्षेत्रात मला फिका ठरवणारा दुसरा एखादाही तारा त्या वेळी उपलब्ध नव्हता...

अशा दिवसांत एके दिवशी राजाराम आपल्या कथाची कात्रणे घेऊन माझ्या घरी आला. लेखकाला नव्या कादंबरीचे अखेरचे प्रकरण सांगून मी निवांतपणे डोळे मिटून पडलो होतो. लोडाला टेकून स्वस्थपणे विश्रांती घेत होतो. एक सुखद असा मानसिक शीण मला आला होता. वाचकाकडून होणारे नव्या कादंबरीचे स्वागत मी कल्पनेने अनुभवीत होतो. माझ्या प्रकाशकानी एक पाश्चिम कल्पना वाचकाममोर मांडली होती. कादंबरी प्रसिद्ध होताच पहिल्या आठवड्यात रोज त्यांच्या पुस्तकविक्रीकेंद्रावर केवळ वीस मिनिटे मी उभे राहून ग्राहकानी विकत घेतलेल्या माझ्या कादंबरीवर स्वाक्षरी देणार होतो. इकडे ही योजना नवी होती. शेकडो उत्सुक वाचक दुकानासमोर रांग लावून माझ्या कादंबरीसाठी उभे राहिले की मी वीस मिनिटांऐवजी तीस मिनिटे द्यावी अशी गळ प्रकाशक घालीत आहेत हा हा म्हणता एखाद्या फुलाचा बहर सपावा अशी माझ्या कादंबरीची ती आवृत्ती सपत आहे.

अशी चित्रे मी डोळे मिटून पाहत होतो नि बाहेरून निरोप आला. "राजाराम गुरव आला आहे—"

राजाराम गुरव हे नाव काही फार आकर्षक नव्हते. हा राजाराम त्यापूर्वी तीनचार वेळा माझ्याकडे आला होता नि प्रत्येक वेळी मी त्याला "आता वेळ नाही, पुन्हा ये–" असे सागून वाटेला लावले होते. मला नव्या लेखकाबद्दल कौतुक नव्हते असे नव्हे, पण मार्गदर्शनासाठी असे मान्यवर लेखकाची घरे हिंडणारे लेखक आयुष्यात कधी लेखक होऊ शकणार नाहीत, असे माझे खरे मत होते. मी स्वतः कधीही कुणाकडे मार्गदर्शनार्थ गेलो नव्हतो आणि हा प्रांत मार्गदर्शनाने जिंकता येणार नाही, यावर माझी श्रद्धा होती. म्हणून मी राजारामसारख्या होतकरू लेखकाना फार जवळ करीत नसे. पुष्कळदा त्याचे लिखाण भिकार असे नि ते तसे आहे, असे स्पष्ट सागितलेले त्याना आवडत नसे. अशा लेखकांना जवळ येऊ द्यावयाचे नाही, असे माझे धोरण होते. राजारामलाही मी त्याच धोरणाने वाटेला लावले होते. पण दरम्यान त्याची एक कथा एका मासिकात सहज वाचनात आली नि माझे कुतूहल चाळवले. राजारामच्या कथेने मी अस्वस्थ झालो होतो. एक वेगळाच प्रत्यय मला त्याच्या कथेने दिला होता. किंबहुना मी जी एक कथा गेले कित्येक महिने मनात घोळवीत होतो, मनासारखी जमणार नाही, म्हणून लिहू धजत नव्हतो, ती कथाच नेमकी राजारामने लिहिली होती. मला सुचलेले तेच कथाबीज, तोच भेदक अनुभव आणि ज्याचा अविष्कार करणे अतिशय कठीण होते. अतिशय क्लेशदायक होते. जो अनुभव लिहून जीवनाचे एक निराळे दर्शन मी वाचकांना घडवू इच्छीत होतो नि जे मला साधत नव्हते. ते राजारामने नेमके केले होते. माझ्यापेक्षा राजारामची शैली स्वतत्र होती. ताजी होती. त्याचे लेखन टवटवीत होते. नव्या लेखकांत कधी आढळत नसेल असली सफाई त्याच्या लेखनात मला आढळली होती. सुरुवातीला ती माझ्याही लेखनात नसायची. मला जीवनाचा जो अनुभव वयाच्या पन्नासाव्या वर्षी व्यक्त करणे अवघड वाटत होते तो अनुभव राजरामने केवळ विशीबाविशीत अतिसमर्थपणे व्यक्त करून माझा पराभव केला होता.

त्या क्षणापासून राजारामने माझ्या मनात घर केले. त्यानतर जेव्हा तो आपल्या कथाची कात्रणे घेऊन आला. तेव्हा मी त्याला पूर्वीसारखे वाटेला लावले नाही. त्याला मी आवर्जून आत बोलावले. लेखनिकाला जायला सागितले नि माझ्या शेजारचे आसन त्याला दिले.

राजाराम संकोचला. माझ्याकडून एवढी जवळीक त्याने अपेक्षिली नव्हती असे वाटले. तो मांडी दुमडून अदबीने बसला. नि माझ्याशी बेताबाताने बोलू लागला. त्याचा सकोच मी ओळखला. तो घालवणे आवश्यक आहे असे मला मनापासून वाटले. मी त्याच्या पाठीवर थाप मारून म्हणालो—



एखादे झाड वठावे, निष्पर्ण व्हावे म्हणून त्वेषाने प्रहार करावा आणि त्या जखमेतूनच त्या झाडाला हिरवागार घुमारा फुटावा ना ! पण यात फारसे आश्चर्य नाही. वेदनेशिवाय निर्मिती नाही. प्रहाराशिवाय आकार नाही.

'मित्रा, असा अवघडू नकोस ! तुझी ती अमक्या मासिकातील कथा मी वाचली आहे. मला ती फार आवडली. तुझ्या लेखनात मला रस आहे. वाच तुझ्या कथा--'

मग राजाराम सावरून बसला. आपल्या मोठाल्या डोळ्यांवरचा जाड भेदक चश्मा त्याने काढला नि एकवार सदऱ्याच्या टोकाने पुसला. चश्मा लावून नि मोकळेपणी बसून तो आपली कथा वाचू लागला. मी लक्षपूर्वक ऐकत होतो. राजारामच्या कथा निःसंशय उत्तम होत्या. शैली वेगळी होती. थोडया शब्दात एखादी प्रखर भावना तो अगदी लीलया पण समर्थपणे सांगून जाई. अनुभवाच्या विविध पातळयांचे दर्शन घडवण्याची त्याची धडपड थक्क करून सोडणारी होती. जे माझ्यासारख्या प्रौढ, परिणतप्रज्ञ लेखकाला सांगता आले नसते, राजाराम सहजगत्या सांगत होता. जे मला कधी जाणवलेच नव्हते ते राजारामने डोळसपणे पाहिले होते नि त्या सगळयाचे हृदय अस्वस्थ करणारे चित्रण त्याने सहजपणे केले होते. मला राजारामची थोडीशी असूयादेखील वाटली--

त्याने आपल्या तीन चार कथा वाचल्या नि एकाएकी तो म्हणाला-" एवढे पुरे-"

मी खरे तर त्याच्या कथात रंगलो होतो. एक मूल्यवान रत्न अचानक हाती यावे तसा हा नवा समर्थ लेखक माझ्यासमोर आला होता. त्याला प्रकाशात आणून जगापुढे मांडायचे बेत मी मनाशी रचीत होतो. माझ्या शिष्यत्वाचीही छाप त्याच्यावर मारता आल्यास मला तो हवा होता. त्याच्यात राजारामचा होईल त्यापेक्षा माझा फायदा अधिक होणार होता. राजारामवर किती नि कसे उपकार करता येतील याचा मनाशी मी विचार करीत होतो. माझ्यापेक्षाही काकणभर अधिक उच्च दर्जाची प्रतिभा राजारामजवळ होती. याची मला जाणीव झाली होती. पण राजारामला तसे दाखवून चालणार नव्हते. कसे झाले तरी माझ्यासमोर तो तुच्छ होता. साहित्यप्रांतात धडपडू इच्छिणारा एक कोवळा होतकरू लेखक... टीकेचे चार आसूड बसताच निराश होऊन कदाचित कथालेखन सोडून देणारा...अद्याप एकही पुस्तक जमेला नसलेला. नगण्य. माझा अहंकार गोंजारीत मी त्याला विचारले--

" या कथांच पुस्तक व्हाव अस नाही वाटत तुला ?"

" खूप वाटत; पण कोणता प्रकाशक माझ्यासारख्या नव्या लेखकाच पुस्तक काढण्याच धाडस करणार ? माझी फारशी ओळख नाही...नि कुणाला विचारायचा धीरच मला होत नाही--"

" ही कात्रण माझ्याकड ठेव. मी पहातो खटपट करून--" मी म्हणालो.

" फार उपकार होतील--" राजारामवर माझ्या आश्वासनाने उपकारांचे प्रचंड ओझे चढले होते नि त्याने तो दबून गेला होता.

मी माझा शब्द खर्च करताच प्रकाशकानी राजारामचे पुस्तक काढायचे कबूल केले. लगेच त्याच्या कथासंग्रहाची जाहिरात छापली गेली. मजकूर प्रेसमध्ये गेला आणि दोन महिन्यांतच राजारामचा पहिलावहिला कथासंग्रह माझ्या प्रस्तावनेनिशी बाहेर पडला. राजारामच्या गुणांचे मी प्रस्तावनेत खूप कौतुक केले होते. 'माझ्या संप्रदायातला' एक नव्या दमाचा समर्थ लेखक म्हणून मी राजारामची ओळख वाचकांना करून दिली होती...

प्रस्तावना वाचून राजारामचा चेहरा खरे म्हणजे खुलायला हवा होता. त्याची खूप वाखाणणी केली होती. माझ्या लेखनाची त्याच्यावर कशी छाप आहे, त्याचे विवेचन केले होते. माझ्यासारख्या थोर लेखकान आपली तुलना स्वतःशी करावी, याचा खरे तर कुणाही नव्या लेखकाला हर्ष झाला असता; पण तसा तो राजारामला झाला नाही, तो संथपणे मला म्हणाला--

" तुमच्या नि माझ्या लेखनांत खूप फरक

आहे. मला नाही वाटत मी तुमच्या सप्रदाया-मधला लेखक आहे अस ..”

मी चमकलो. राजारामकडे मी रोखून पाहिले. थोडयाशा रोषानेच. पण राजाराम त्याच नजरेने, तसाच रोखून आपल्या चश्म्यातून माझ्याकडे पाहत होता. त्याच्या हडकुळया देहात काडीची शक्ती नव्हती; पण त्याच्या नजरेत त्याच्या लेखनासारखीच भेदक चमक होती. मी अस्वस्थ झालो नि म्हणालो—

“नाही कस ? माझ्या साहित्याचा तुझ्यावर खूपच प्रभाव आहे, राजाराम—”

“मुळीच नाही ! तुमच्यापेक्षा माझ लेखन निराळ आहे—”

“अधिक चांगल आहे, अस का तुला म्हणावयाच आहे—”

“होय, नि.संशय. माझ लेखन तुमच्यापेक्षा चांगल आहे—ताज आहे. तुमच्या वर्तुळातून मी कधीच बाहेर पडलो आहे...”

राजाराम उद्धटपणे बोलत होता का ? मला तसे वाटले. पण दुसऱ्याच क्षणी असेही वाटून गेले. राजाराम म्हणतो ते खोटे तरी कसे म्हणावे ? खरेच त्याच्या नि माझ्या लेखनात फरक होता. मी गेली कित्येक वर्षे त्याच त्याच विषयावरील प्रेमकथा लिहीत होतो. तेच त्रिकोण, तीच निरगाठ नि तीच उकल. फक्त थोडा वेगळा मसाला दर वेळी आलटून पालटून वापरीत होतो, एवढेच. राजाराम मुळीच माझ्या पठडीत बसणारा नव्हता आणि तेच तो प्रामाणिकपणाने, ठामपणाने सागत होता. मला त्यामध्ये वाईट वाटण्याचे कारण नव्हते. राजारामवर मी माझे लेबल लावूं इच्छीत होतो नि राजारामला ते नको होते—

“वाटल्यास तू माझ्या मताला विरोध कर—तुला स्वातंत्र्य आहे—” मी म्हणालो.

आणि खरोखरच त्यानतर राजारामाने माझ्या साहित्याचा आढावा घेणारा, माझ्या साहित्याचे मूल्यमापन करणारा एक विस्तृत लेख प्रसिद्ध केला, त्यात त्याने माझ्या सर्व दोषाचे विवेचन केले होते. राजाराम आणि त्याच्या सोबतचे आजचे नवे लेखक किती वेगळया तोलामोलाचे आहेत, त्याची जीवनाकडे पाहण्याची नजर कशी आहे नि जुन्या साप्रदायिक वाङ्मयापासून ते कसे वेगळे आहेत हे त्याने अचूकपणे लिहिले होते माझ्या साहित्याला त्याने निर्भयपणे “वेगडी आणि क्षणभगुर; रजक” साहित्य असे म्हणून मला एक तुच्छ, क्षुद्र लेखक ठरवले होते.

माझ्या प्रस्तावनेसह बाहेर पडलेला त्याचा कथासंग्रह, त्याचा झालेला बोलबाला, माझे त्याचे स्नेहसबंध, या सगळयाच्या पार्श्वभूमीवर राजारामाची माझ्यावरील टीका, सगळीकडेच गाजली. माझी प्रतिक्रिया अजमावण्यासाठी माझे मित्र माझ्या घरी बैठका टाकू लागले.

खरे तर मीही मनातून अतिशय अस्वस्थ झालो होतो. कालपरवाच्या एका नव्या लेखकाने माझ्यासारख्या सुप्रतिष्ठित, राजमान्य, लोकमान्य लेखकावर केलेल्या हल्ल्याने मी घायाळ झालो होतो, आणि त्याचे दुसरेही एक कारण होते. माझे मलाच ठाऊक होते, की गेली काही वर्षे माझी प्रतिभा आटत चालली आहे. मला काही नवे, सुचेनासे झाले होते. जुन्या नावावर मी सगळा मामला धकवून नेत होतो. लोकानी मला विसरू नये, म्हणून अट्टहासाने मी रटाळ लिहीत होतो नि ते सगळे उत्कृष्ट ठरले जावे, असे वातावरण तयार करवीत होतो. अनेक टीकाकार मी उपकारानी आपलेसे केले होते. मी कितीही रटाळ लिहिले तरी खपत होते व म्हणूनच या रटाळपणावर राजारामाने केलेल्या हल्ल्यामुळे मी घायाळ झालो होतो...

दुसरे असे होते की राजाराम आणि त्याच्याबरोबरची नवी लेखक मडळी आमच्या जुन्यांच्या मानाने कितीतरी नवे, निराळे आणि नि संशय चागले लिहीत होती. त्यानी कथेला नवे वळण लावले होते. क.दंबरीत क्रांतिकारक बदल घडवले होते, आणि वाचकांची त्यानी पकड घेतली होती. वाचक त्याची पुस्तके वाचायला उत्सुक होते. प्रकाशकही. ह्या नव्या पिढीसमोर आम्ही जुने लेखक निष्प्रभ ठरत चाललो होतो आणि हे सगळे बदलणे मला कठीण वाटत होते. आत्मविश्वास ढळल्यासारखे वाटत होते—जुन्या व नव्या लेखकांचे दोन सरळ तट पडले होते. नव्याचे नेतृत्व राजारामकडे होते. तो निर्दयपणे आमच्या साहित्यावर आसूड ओढीत होता नि वाचक त्याचेच कौतुक करीत होते... आम्ही या नव्या लाटेखाली नामशेष होतो की काय अशी भीती मला जाळू लागली..

मी दिवसेदिवस अधिकच बेचैन होऊ लागलो. हातून काही लेखन होत नव्हते. मन निराश झाले होते. काही सुचतच नव्हते. कुणी प्रकाशक येत नव्हता. ओळखीचे प्रकाशक माझ्या नव्या लिखाणाबद्दल फारशी आस्था दाखवीत नव्हते. नि या बदलत्या वाऱ्यानी मी खचत चाललो होतो. उलट राजारामचे कथासंग्रह भराभर निघत होते. कादंबऱ्या प्रसिद्ध होत होत्या. त्याना पारितोषिके मिळत होती राजारामच्या नावचे नवेयुग साहित्यक्षेत्रात सुरू झाले होते. नि मी झपाटयाने मागे पडत होतो—

राजारामचे लेखन कसे बंद पडेल याचा एक दुष्ट विचार माझ्या मनात घर धरू लागला... नि राजारामानेच त्या विचाराला बळकटी लाभेल अशी वेळ आणली—

एके दिवशी राजाराम अगदी उतरलेल्या तोडाने माझ्याकडे आला. बरेच दिवसात तो आला नव्हता. मी औपचारिकपणे नि उपरोधाने विचारले—

“काय राजाराम, कस काय येण झाल ? नवकथाकार तुम्ही ... जुन्याच दर्शन घेण म्हणजेसुद्धा महापाप तुमच्या दृष्टीन—”

“माफ करा... तो विषय काढू नका ... मी फार अडचणीत सापडलो आहे. तुमच्याकड मदतीसाठी आलोय्— ”

राजारामची परिस्थिती यथायथाच होती; त्यामुळे पूर्वी तो अनेकदा माझ्याकडे पैसे मागण्यासाठी येई त्याला नाव मिळाले नि त्यापाठोपाठ पैसाही मिळू लागला; त्यानंतर तो आपल्या अडचणी घेऊन प्रथमच आला होता. मनात येते तर मी त्याला हवी तेवढी आर्थिक मदत करू शकलो असतो—

“बोल, कोणती अडचण आहे ? किती रुपये हवेत—”

“रुपये नकोत...तुमची मध्यस्थी हवीय—”

“मध्यस्थी ? ती कसली नि कशासाठी ? ”

“तुम्ही मध्यस्थी केलीत तरच प्रश्न सुटणार आहे. नि तो सुटला नाही, तर मी आयुष्यातून उठणार आहे ... वेड लागेल मला... ”

“काय प्रकार आहे साग बघू —”

मग राजारामने आपल्या प्रेमप्रकरणाची हकीकत तपशीलवार सागितली. माझ्या एका

जवळच्या श्रीमत स्नेह्याच्या मुलीवर त्याचे प्रेम होते. प्रश्न नेहमीचाच होता. त्या स्नेह्याला आपल्या मुलीने एका भणंग लेखकाशी लग्न करावे, हे पसंत नव्हते. त्याने तिचे लग्न एका श्रीमत ऑफिसरशी ठरवले होते ते पक्के ठरण्यापूर्वी मी माझा शब्द घालून ते मोडावे नि राजारामची योग्यता त्या माणसाला पटवून द्यावी, असे राजारामचे म्हणणे होते.

"आज जरी मी फार श्रीमंत नसलो, तरी माझ्या लेखनावर मी श्रीमती मिळवीन पण मला शशिकला मिळाली नाही, तर श्रीमंतीच काय पण माझ लिहिणसुद्धा यापुढे चालेल की नाही, हीच शका आहे. शशिकलेशिवाय आयुष्य व्यर्थ आहे माझ. माझ्यासाठी एवढ कराल ना ? एका लेखकाने दुसऱ्या लेखकाची दु ख जाणायला नकोत का —"

मी त्याला कळणार नाही अशा बेताने हसलो. मनाशी म्हणालो —'आता मी लेखक आहे, अस वाटत काय तुला ? काल परवाच तर लेख लिहून मी लेखक नव्हेच अशी हाकाटी करणारा तो तूच नव्हे काय ?' पण वरवर काही न दाखवता म्हणालो —

"ठीक आहे मी सागेन माझ्या मित्राला—"

"मी निश्चित राहू ? शशिकलाच म्हणाली, की 'तुम्ही तिच्या वडिलांना सागितलत की आणखी काही नको' –तुमचा एक शब्द पृथ्वीमोलाचा वाटतो तिच्या वडिलाना — "

मी पुन्हा एकदा खुशीने हसलो.

"जा तू–तुझ्या शशिकलेला साग; आपलं लग्न पक्क ठरल ! मी सागतो तिच्या बापाला —"

"उपकार आपले ! तुम्ही हे कबूल केल नसत, तर मी या क्षणीच सपणार होतो. लेखक म्हणून नि साधा माणूस म्हणूनही . . एक वेडा दिसला असता जगाला माझ्या जागी—"

माझी पुन्हा पुन्हा करुणा भाकून नि उपकार मानून राजाराम निघून गेला ... आणि माझ्यातला खलपुरुष जागा झाला. हीच वेळ होती राजारामला आयुष्यातून उठवण्याची... हीच वेळ होती त्याला लेखक म्हणून नष्ट करण्याची ... अशी वेळ पुन्हा येणार नाही. मी कबूल केल्याप्रमाणे शशिकलेच्या वडिलांकडे त्याच्यासाठी रदबदली केली असती नि राजरामाचे शशिकलेशी लग्न झाले असते म्हणजे त्याच्या प्रतिभेचा फुलोरा दुप्पट जोमाने फुलला असता. एकाहून एक सरस वाङमयकृती त्याने पार पाडल्या असत्या. त्याच्या साहित्याच्या प्रखर प्रकाशात मी नि माझ्याबरोबरचे जुने साहित्यिक लोपून गेलो असतो ... नामशेष झालो असतो —

मी उठलो. तिरीमिरीने शशिकलेच्या बापाच्या घरी गेलो. राजारामाचा प्रश्न कधीच सुटणार नाही अशी चोख तरतूद करून मी घरी परतलो.

ठरल्याप्रमाणे शशिकलेच्या बापाने त्याच दिवशी तिला नागपूरला नेले. तिथे तिचे लग्न त्या श्रीमंत ऑफिसरशी चार दिवसात पार पडले, नि शशिकला गळयात राजारामाऐवजी दुसऱ्याच कोणाच्या नावाने काळे मणी बांधून वावरू लागली.

राजारामची काय अवस्था झाली असेल, याचा कल्पनेने अदाज करू शकत होतो, पण मी तेवढ्यावर संतुष्ट नव्हतो. त्याची भकास मुद्रा, निराश चेहरा, वेड लागल्यागत डोळे पाहायला मी उत्सुक होतो. त्याचा वाङमयीन अवतार कधी सपतो, हे पाहायला मी आतुर झालो होतो. त्याच्याबद्दल लावूनलावून बातम्या काढीत होतो. पण काही नक्की समजत नव्हते. कुणी म्हणे, 'तो कुठ गायब झाला आहे', कुणी म्हणे 'तो खोलीतच कोंडून घेऊन बसलेला आहे', कुणी म्हणे, 'तो स्वत ची पुस्तके फाडून टाकीत आहे', कुणी म्हणे, 'त्याला वेड लागल आहे.'

राजारामाला वेड लागले ही बातमी खरी ठरलेली समजताच मी एके दिवशी शातपणे त्याच्या खोलीवर गेलो आता राजाराम कसा दिसतो ते मला नजरेने पाहायचे होते. एका 'अँग्री यंग मॅन'ची शोकातिका मी जवळून पाहिली होती. तिच्यावर अखेरचा एक दृष्टिक्षेप मला टाकायचा होता. मग मी राजारामावर एक कादबरी लिहिणार होतो. राजाराम हा नायक...कादंबरी गाजली असती, यात सशय नव्हता. नाहीतरी गेली चार वर्षे मी काहीच लिहू शकलो नव्हतो. राजारामाच्या लिखाणापुढे माझे लिखाण भराभर आटले होते. सपून गेले होते. आता राजाराम संपला होता. आता मला पुन्हा फुलायला हरकत नव्हती.

मी गेलो तेव्हा राजाराम खोलीत कोंडून

### रुग्णालयीन गजबज

पाहिले म्या डोळा
रोगांचे आगर
पलगावर भार ...... रोगीयाच्या.

रंजले गाजले
साऱ्यांचे हे घर
भोजनाला भार ...... संख्या व्याली.

अरेरे ! देवा रे !
आई ग, या अल्ला ! !
नाव उद्धारिती ...... शल्य शाळा.

पाय तुटचा कुणि
पोट फुग्या दिसे
पोळले सर्वांग ...... अवतार.

पीर ढोगी काही
जगाचे आळशी
मूत्र-विष्ठा चाले ...... अभिषेक.

डॉक्टरात म्हणे
एक नवा ट्रेंड
रोग्या सुई टोची ...... मेल्यावर.

चपरासी भंगि
मिळाले टोळके
रंगला विषय . .... काम नाही ?

काही नुस्ते येती
भोजनी शयनी
गर्दी त्यांची सदा ...... ताटापाशी.

चहा भक्त त्यात
शेगडी दैवत
आप्त रोगी झोपे ...... मजा यांची.

अमृताहूनि गोड
त्यांना धूम्रपान
तोंड झाले कुंड ...... अश्वमेध

परिचारिका या
भारी अप्टुडेट
काही त्यात मात्र .... . लीन कामी

—बबन उल्हे

घेऊन बसला होता. एकूण लोक म्हणत होते ते खरेच तर. मी खूप वेळा दार ठोठावले तेव्हा राजारामाने ते उघडले. ओढलेला चेहरा, खोल गेलेले डोळे नि वाढलेली दाढी मिरवीत, राजाराम मला सामोरा आला. त्याच्या हातात लिहिण्याचे कागद होते. दुसऱ्या हातात पेन होते. लिहिता लिहिताच तो उठला होता–

"वसा –" तो निर्विकारपणे म्हणाला. मी एका मोडक्या खुर्चीवर बसलो.

"काय लिहतो आहेस ?–"

"नवी कादंबरी–ऐकायचीय् ?" त्याने विचारले.

"वाच –"

आणि राजाराम वाचू लागला. पहिली सात-आठ पाने ऐकताच माझ्या ध्यानात आले की राजाराम ही कादंबरी खुद्द माझ्यावरच लिहीत आहे. मी अस्वस्थ झालो. वाटले होते राजाराम संपला असेल. तो लिहिण्याचे कागद टराटरा फाडीत असेल...पण छे: ! राजाराम संपला नव्हता. तो दुप्पट उत्साहाने लिहीत होता. ... वाचता वाचता राजाराम आपल्या प्रेमकहाणीपाशी आला. ती असफल नीतिकथा ... नि ती तशी घडवणारा मी... माझे अचूक वर्णन राजारामाने केले होते. होय, मीच तो – संशयच नाही.

"पुरे, राजाराम – थांबव आता –" मी न राहवून ओरडलो. नि तडकाफडकी बाहेर पडलो. माझ्या मनाला पुन्हा ग्लानी आली होती. जीवघेणी ग्लानी...मी एका झाडापाशी थांबलो. कुणा लाकूडतोड्याने अर्धवट तोडलेले ते झाड होते. झाड वठायला हवे होते. पण कसा कुणास ठाऊक, एक हिरवागार धुमारा त्या वठलेल्या झाडाला फुटला होता; नि सूर्यकिरणांच्या दिशेने तो वाढत होता. लाकूडतोड्याच्या कुऱ्हाडीची जणु त्याला क्षितीच नव्हती. ...

तो हिरवा तरतरीत कोंब पाहता पाहता मला माझी संकल्पित कादंबरी आठवली. राजारामवर लिहिली जाणारी कादंबरी... आणि पुन्हा एक ग्लानीची लाट माझ्या शरिरावर–मनावर पसरली. अगतिक झाल्यासारखा मी खोडाला टेकून उभा राहिलो. जणु माझ्यावरच कुऱ्हाड चालविली जात होती.

• • •

### माझ्या 'वाडीची' रुक्मामाय— !

**हुरमुंजी पैलथडीच्या बिटऱ्या दरडीवर**
**आडमुठ्या झाडाखाली 'ठाण' मांडून गोजीर**

**चिल्यापिल्यांची इवल्या सदा करीते राखण**
**चिट्पाखरू मन ते इला माय रूक्मिन**

**झुळमुळतोय वढा जरा पैलाडून तिच्या**
**जाईजुईला म्हणते घे ग झोका आवळीचा**

**लाल किरणाची काया पसरता लाटांवर**
**झेपावली हिरवी गर्दी कोवळचाशा वेलीवर.**

**असा वाकून खालती पाया पडतो पिंपळ**
**पाय चुंबून चुरून उजळला डोहतळ**

**येती नवस फेडण्या इच्या म्होरी रोज 'आवा'–**
**औक्ष बाळाला चिंतून जाती आपलाल्या गावा**

**गर्द राईच्या खालती पसरली होय 'खाडी'**
**तिच्या जवळच हाये झुरी बोरगळ 'वाडी'**

**रात पडल्यावरती इथे न्हात न्हाई कुणी**
**वाट, तांबुस रंगाची जाते जांभुळाच्या 'बनी'...**

—राजा मुकुंद

## सोनेरी मासा ......

[ पृष्ठ २१ वरून चालू ]

पैशाची गोष्ट अगदीच विसरून जातात. पैसे टेबलावर बेफिकीरपणाने ठेवून इनामदारांना जास्तच अस्वस्थ करतात. सरळ उठून पैसे घेऊन जावे असे त्यांना वाटते पण ते बरे दिसणार नाही. तिथे बसणेही अशक्य होते. शेवटी उठत लाचारीने म्हणतात – "बरय मृणालिनीबाई ! आता फारच उशीर झाला – बरय मिसेस मराठे ! –"


तितक्यात मिसेस मराठे गोखलेबाईंना अगदी खाजगी सुरात म्हणतात – "मृणाल, तूं माझी फार वाट पाहिली असशील नाही. पण यानाच घरी यायला उशीर झाला..." मिसेस इनामदारना वाटते आपली फारच उपेक्षा होत आहे. त्या चुळबुळ करतात. अगदी सहज वाटावे असे गोखलेबाई तितक्यात म्हणतात – "अगबाई ! विसरलेच. तुमचे – पैसे इथ टेबलावरच राहिले बघा ! घेऊन जा ना ! "

"थँक्यू ! " म्हणत इनामदार पैसे उचलून लगबगीने बाहेर पडतात. उंबरठा ओलांडायच्या अगोदरच त्यांना ऐकू येते –

"बिचारीला पाचशे रुपये पाहिजे होते. मी म्हटल हात्तीच्या ! घेऊन जा. गरिबीचे दिवस आले बिचारीवर. तिच्याकडे पाहिल्यावर कसतरीच वाटत मला... "

इनामदारबाईंना राग येतो. वाटते तसेच मागे फिरावे अन् तिच्या तोंडावर पैसे फेकून म्हणावे "फुकट तर नाही दिलेस. चांगली हजार रुपयांची अंगठी ठेवून घेतली आहेस की ? " पण त्या फिरत नाहीत. सोनेरी माशांना नाहीतरी काचपात्रातच राहावे लागते !!

• • •



तलोरा—बलरामचे परस्परांवर प्रेम होते. शहरी संस्कृतीचा स्पर्श न झालेले हे दोन जीव कोलंबो शहरात आले आणि स्वतःला हरवून बसले. पुन्हा एकरूप झाले. जणू काही झालेच नाही इतक्या सहजपणे......



# बिन ऋतूंचा बगीचा

: लेखक :

**मॅक्स डाउथेंडाय**

*

: अनुवाद :

**प्रा. श्री. भा. श्रोत्री.**

मुंगीच्या पावलांनी निघालेली ती छोटी गाडी उंच उंच पहाड असलेल्या नुवारा एलियाच्या दिशेने नागमोडी चढण घेत आहे. समुद्रसपाटीवर असलेल्या कोलंबोहून ती गाडी जेव्हा पहाटे निघते तेव्हा कोठे ती संध्याकाळी पाचच्या सुमारास नुवारा एलियास पोहोचते. गाडीतून बाहेर बघितल्यावर असे वाटते, की जणु काही आजूबाजूचे दालचिनीचे मळे खाली खाली सरपटत आहेत. जणु काही चहाच्या आणि भाताच्या हिरव्यागार रंगशाळा विमानातील छत्रीसारख्या अलगत खाली पडत आहेत. दऱ्यांमधली रुपेरी तळी मोत्यांच्या शिंपल्यांसारखी चमकत आहेत. पडीक देवळांचे कळस समुद्रावरील दुर्बिणी-सारखे दिसतात तर ते निमुळते पहाड क्षितिजाच्या आसमंतात विखुरलेल्या निळ्या मनोऱ्यांसारखे. नुवारा एलियाजवळील प्रसिद्ध 'ॲडॅमचा बगीच्या' सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत आपली त्रिकोणी सावली एखाद्या अवाढव्य घड्याळाच्या काट्यासारखी सबंध सिलोनवर – त्या चमकणाऱ्या अंडाकृती देशावर – टाकीत असतो.

सूर्यास्ताच्या सुमारास ती छोटीशी गाडी अखेरीस त्या शेवाळाच्या आणि गर्द दाट झाडीच्या पहाडावर पोहोचते. त्या पहाडावरील झाडे एकमेकांच्या गळ्यात गळे अडकवून उगवली आहेत आणि वाढली आहेत. त्यामुळे त्या पहाडाच्या घसरत्या पठारावरून वाऱ्याच्या मोठ्या झोतानेही त्यांतले एकही झाड खोल दरीत उमळून जाऊ नये.

त्या पहाडावर आणि वळणे घेत दुथडी वाहणाऱ्या रुपेरी ओढ्याजवळ कोलंबोतील श्रीमंत व्यापारी आणि इंग्रज लोकांची वस्ती आहे. तेथील घरे इंग्रजी पद्धतीने बांधली आहेत. युरोपप्रमाणे येथेही रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस विजेच्या दिव्यांच्या लुकलुकणाऱ्या रांगा आहेत. तेथे फूटबॉलची क्रीडांगणे आहेत, टेनिसची कोर्टस् आहेत. इतकेच काय, तेथील हवाही पांढऱ्या फटफटीत इंग्रजी स्त्रीच्या कातडीसारखी नितळ आहे.

नुवारा एलियाच्या जवळच एक प्रसिद्ध बगीचा आहे. त्याला 'इडन'चा बगीचा म्हणतात. निळ्या, लाल आणि पिवळ्या भारतीय तलम शालीसारखा तो बगीचा उदात्तपणे त्या पहाडावर पसरला आहे. तेथे सर्व ऋतूंमधील फुलझाडे निरभ्र आकाशाकडे आपला मार्ग काढीत आहेत. त्या बगिच्याचा चेहरा नेहमीच निळ्या आणि तांबड्या रंगात गोंदलेल्या सिंहलीच्या चेहऱ्याची आठवण करून देतो.

आणि याच बागेच्या अद्भुत जगतात बलराम आणि त्याची पत्नी तलोरा वाढली होती. सबंध सिलोनभर त्यांची अत्यंत प्रेमळ पतिपत्नी अशी ख्याती होती.

नवव्या वर्षात पदार्पण करते न करते तोच तलोरा चहाच्या मळ्यावर काम करू लागली. एप्रिल महिन्याचा सुमार आला, की इतर शंभर मुलींप्रमाणे तीही चहाची पाने खुडू लागे. तेथूनच बलरामच्या बापाने तिला 'इडन'च्या बागेत आणले, कारण बलराम आता चौदा वर्षांचा झाला होता, आणि त्याचे आता लग्न व्हावयास पाहिजे होते.

---

मॅक्स डाउथेंडाय या जर्मन लेखकाच्या एका कथेचा हा स्वैर अनुवाद आहे. 'थॉमस कुक' कंपनीबरोबर या लेखकाने दोनदा जगप्रवास केला. दुसऱ्या जगप्रवासाच्या वेळी युद्धामुळे तो जावात अडकून राहिला. मायभूमी व स्वतःची निरपेक्ष पत्नी यांचा ध्यास घेऊन तिथेच त्याने मृत्यूला कवटाळले. भारत, जपान, चीन, जावा वगैरे पूर्वेकडील देशांवरील त्याच्या कथा अत्यंत प्रसिद्ध आहेत.

---

सिंहली लोकात जसे केसातला कंगवा अगर कानातली भीकवाळी भेट म्हणून देण्यात येते, त्याप्रमाणे तलोरा ही बलरामला मिळालेली एक भेट होती. बलरामने स्वत:च्या मनास अगर दुसऱ्या कोणासही विचारले नाही, की मला दुसरी बायको हवी का ? ज्याप्रमाणे त्याच्या बापाने त्याचे शरीर ही त्याला दिलेली देणगी होती, तशीच तलोरा हीसुद्धा एक बलरामच्या बापाची देणगीच होती.

जशी 'इडन'च्या बागेला निळ्या आणि निरभ्र आकाशाची जोड असणे हे क्रमप्राप्त त्याचप्रमाणे बलरामने तलोराचा पत्नी म्हणून स्वीकार केला हेही क्रमप्राप्तच ! ज्याप्रमाणे तलोरा स्वत:च्या हातांस अगर पायास विचारू शकत नव्हती, की तुम्ही माझेच का, त्याप्रमाणे तिने बलराम आपणास नवरा म्हणून पाहिजे किंवा नाही याचाही विचार केला नव्हता.

नुवारा एलियातील सिंहली सर्वज्ञ असतात, असे कोलंबोतले सिंहली नेहमी म्हणतात. ते जादू करू शकतात, पण आपण जादुगार आहोत, याची त्यांना कधीच कल्पना नसते. मोठ्या आदराने दऱ्यातली माणसे पारदर्शक हवेत आपले आयुष्य कंठणाऱ्या या पहाडावरील आत्म्याकडे पाहत असतात.

जानेवारी असो अगर जुलै, एप्रिल असो नाहीतर ऑक्टोबर असो,–'इडन'च्या बगिचात सदा वसंत फुललेला असतो. सप्टेंबरच्या अस्टरशी जुलैचे गुलाब गुजगोष्टी करीत असतात तर त्याच्या संभाषणात भाग घेण्याचा प्रयत्न हिमफुले करीत असतात.

बलराम आणि तलोरा याची झोपडी त्यांच्या इंग्रजी मालकाच्या बंगल्याच्या पाठीमागेच बागेच्या कुंपणापाशी होती. ते दोघे नेहमी वाऱ्यारहित दऱ्याप्रमाणे अगर अमेघ आकाशाप्रमाणे शांत असत, आणि त्यांच्या डोक्यात भारतीय अगर युरोपियन फुलाशिवाय दुसरा कसलाही विचार नसे.

ती निरंतर आणि स्तिमित 'इडन'ची बाग मनुष्यमात्रास एक प्रकारची शांती देते. ही शांती एखाद्या देवळात हजारो वर्षे तेवत असलेल्या समईसारखी आहे. या बागेला ऋतुबदल मान्य नाही. तेथे एकाच वेळी वसंत, हेमंत आणि ग्रीक फुलत असतात, तेथील झाडे अविरत वाढत असतात. तेथे कायम थंड हवा असते आणि सतत शांतता नांदत असते.

अशा शांत हवेत माणसास कधीच क्रूर होण्याचा प्रसंग येत नाही. तेथील माणसे बंदिस्त काचपात्रात–कृत्रिम हवेवर जगणाऱ्या उंदरासारखी अर्धवट धुंदीत जगत असतात. नितळ हवेमुळे ती माणसे झोपाळू आणि गलितगात्र होऊन गेली आहेत. जणु काही त्यांच्या शरिरात रक्ताच्या ऐवजी निळी निळी शून्यता वाहत असते.

एक दिवस त्या बगिच्याचा इंग्रजी मालक बलरामला म्हणाला,

"हे पाहा, बलराम, तुला उद्या माझ्याबरोबर कोलंबोला यावं लागेल. माझं तिथं सरकारी काम आहे आणि शिवाय येताना मला काही खरेदी करावयाची आहे. तू विश्वासू आहेस, आणि तू आतापर्यंत दूर असा कुठंच गेला नाहीस. नवीन नवीन माणसं पाहिलीस की तुला मौजही वाटेल. आणि कायरे, तलोरा तीन दिवस तुझ्याशिवाय सहज राहू शकेल, नाही का ?"

बलराम म्हणाला,

"साहेब, आमचं लग्न झाल्यापासून मी व तलोरा एकमेकांपासून कधीच दूर गेलो नाही."

"पण बलराम, तू तुझ्या बायकोची समजूत घाल. हे बघ, तू येताना तिच्याकरिता एखादी सुंदर शाल आणलीस ना म्हणजे ती खुश होईल. तुला उद्या सकाळी तयार राहिलंच पाहिजे. गाडी ९ वाजता सुटेल. इथून आपणास ६ वाजता निघावं लागेल."

दुसऱ्या दिवशी सकाळी गाडी आपली नेहमीची चढण उतरू लागली. बलरामच्या डोक्यात एक सुंदर गोलाकार कंगवा होता. त्या कंगव्यामुळे त्याचे काळेभोर केस कपाळावर येत नव्हते, आणि तो एखाद्या युरोपियन शाळकरी मुलीसारखा दिसत होता. कोलंबोत अशाच प्रकारे केशरचना करतात, हे त्याला माहीत होते आणि म्हणूनच त्याने शहरी केशरचना केली होती. त्याने एक विटकरी, लिंबू रंगाची लुंगी आपल्या शरिराभोवती लपेटली होती आणि स्त्री जसा आपल्या स्कर्टवर पट्टा घालते, तसला पट्टा त्याने वर बांधला होता. लुंगीवर शर्ट होता. तलोराने त्याच्याकरिता तो मुद्दाम स्वच्छ धुवून ठेवला होता. प्रवासाचा दिवस साजरा करण्याकरिता त्याने आपल्या कानामागे फुलाचा एक गुच्छ खोवला होता. पायात वळे चमकत होते. तो अनवाणीच होता; फक्त मालकासमोर तो चपला घालीत असे. त्याच्या हिरव्या ट्रंकेत त्याने स्वत:च्या चपलाखेरीज काहीच ठेवले नव्हते. पण तलोराकरिता तो खूप खूप खरेदी करणार होता आणि म्हणूनच त्याने एवढी मोठी ट्रंक घेतली होती.

बलरामला दुसऱ्या कोठल्याच हवेची सवय नव्हती. आता गाडी धुक्याच्या उंच पर्वतावरून खाली उष्ण हवेत उतरत होती. ती उष्ण हवा तांबड्या मिरचीसारखी बलरामच्या नाकात झोंबत होती, त्यामुळे त्याला सारख्या शिंका येत होत्या. त्या उष्ण हवेमुळे आणि जमिनीच्या त्या उबट वासामुळे आपण फारच घट्ट कपडे घातले आहेत असे त्यास वाटत होते. आता गाडी हळूहळू आपल्या ठिकाणावर पोहोचत होती. हवा लवंगांच्या आणि कापराच्या वासाने भरून गेली होती. गाडीच्या मार्गावर दोन्ही बाजूस उंचउंच माडांच्या रांगा होत्या आणि आंब्याची झाडे भरदार फळांमुळे खाली वाकली होती. नुवारा एलियास आंब्याची झाडे आहेत पण ती कधीच फळ धरीत नाहीत.

कॉफीच्या रंगाचे, बळकट, घट्ट रक्ताचे लठ्ठ, आणि अर्धनग्न सिंहली मुंग्यांच्या कळपाप्रमाणे त्या दऱ्यामधील स्टेशनावर गर्दी करीत होते.

या पृथ्वीवर येवढी माणसे आली कुठून; हे बलरामला समजत नव्हते. बलरामचे तोंड म्हणजे एक मधाचे पोळे आहे आणि त्यावर माश्या बसल्या आहेत असे समजूनच जणु काही ती माणसे त्याकडे बघत होती. त्या माणसाच्या तुफान समुद्रामुळे त्या पहाडावरील सिंहलीच्या छातीवर इतके दडपण आले, की त्याला गुराच्या पायाखाली तुडविल्या गेलेल्या गवतासारखे वाटू लागले. नजरा, आवाज, वास आणि पावले त्याचे शांत पहाडी हृदय तुडवू लागली. त्याच्या डोळ्यास काही दिसेनासे झाले आणि त्याचे कान दडे बसल्यासारखे कामातून गेले.

माणसाच्या नजरांचा मारा चुकविण्याकरिता त्याने आपले सर्व लक्ष फुलझाडांवर केंद्रित केले. हे काय गुलाबाचे झाड, तर ते मोगऱ्याचे. परंतु त्याच्या स्वत:च्या बागेची त्यांना काय सर येणार ? जेव्हा संध्याकाळी कोलंबोस गाडी पोहोचली त्या वेळी तो दमून गेलेला होता आणि हॉटेलमध्ये पोचे-

पर्यंत तो अगदीच मरगळून गेला होता.

त्या समुद्रकाठच्या भव्य हॉटेलच्या दगडी इमारतीत बलराम एखाद्या भ्रमिष्टासारखा वागू लागला. रात्रदिवस होणारा समुद्राच्या लाटांचा आवाज त्याला सहन होईनासा झाला. हॉटेलमधील ते पांढरे कपडे घातलेले प्रवासी, पांढऱ्या कातडयाच्या युरोपियन स्त्रिया; त्याला त्याच्या फुलझाडांची आठवण करून देत आणि त्याला वाटे, की ही सर्व फुलझाडे मुळांशिवाय अधांतरीच उगवली. आहेत. एखाद्या सावलीसारखा तो भिंतीला चिकटून बसलेला असे आणि त्याचा मालक त्याला जेव्हाजेव्हा शोधी त्या त्या वेळी त्यास अंधाऱ्या जागी भयग्रस्त बसलेला दिसे. जणु काही भयाण अरण्यात रानटी श्वापदांच्या तावडीत सापडलेला तो एकुलता एक जीव होता.

आणि एक दिवस बलराम अचानक नाहीसा झाला. टेलिफोन, पोलीस, वर्तमानपत्र या कोठल्याही मार्गाने तो सापडू शकला नाही. आठ दिवस वाट पाहून अखेरीस त्याचा मालक नुवारा एलियास परतला. त्याला वाटले बलराम आधीच तेथे आला असावा पण नुवारा एलियातही त्याचा पत्ता लागला नाही.

तलोरा काहीच घडले नाही अशी शांत होती. तिच्या बागेत नेहमीप्रमाणे बागडत होती आणि हसत होती. मालक मात्र अगदी अस्वस्थ झाला होता. तलोरा त्यास म्हणाली, "साहेब, बलराम येईल. आपण त्याकरिता दु:खित होऊ नका."

तो इंग्रज तिच्याकडे स्तब्धपणे बघत राहिला. त्याला वाटले ही सिंहली स्त्री रडून आकांत करील, जमिनीवर लोळण घेईल, आपले केस विस्कटील, परंतु सारखी हसतहसत ती त्यास म्हणे, "साहेब बलराम काही नाहीसा होत नाही. माझ्या हृदयाच्या कोठडीत मी त्याला चांगल बंदोबस्तात ठेवल आहे."

तलोरा आता एकटीच सकाळपासून सध्याकाळपर्यंत झाडास पाणी घालू लागली. आणि दोघांचे काम शांत चित्ताने करू लागली. पोस्टमनकडून पत्रे घेताना तिचे मन कधीच विलंचित झाले नाही. बलरामचे पत्र असेल, अशी तिने कधीच अपेक्षा केली नाही. जेव्हा जेव्हा दारावरील घंटा वाजे आणि लोक बाग पाहावयास येत तेव्हाही तिचे पाय थबकले नाहीत आणि तिचे दाराकडे लक्ष गेले नाही. घरात एकटी राहतानाही तिच्या हातापायाचा कधी थरकाप झाला नाही. जणु काही अदृश्यपणे ती आपल्या पतिसमवेत त्या नितल निरभ्र हवेत दिवस कंठीत होती. जणु काही या जगतावर तिच्या हृदयाच्या धुंद चैतन्यात दूरत्व अगर सानिध्य हे शब्दच नव्हते.

---

### वळुनी तरी पहायाचे—

तुझ्या चरणस्पर्शाचे, जेथे वत्सलांछन झाले,
त्याच खुणेच्या संकेते, माझे चरण चालले ।।

किर्र, किर्र रातकिडे, वारा चुकवी चाहूली,
दाही दिशा वणवण, नेत्री उडतसे धूली ।।

घनदाट अरण्यात, वाट संपता संपेना.
तुझ्या पाउलांचे चिन्ह, निरखिता गवसेना ।।

अन् याच वेळी अचानक, तुझा होतो हस्तस्पर्श.
पुलक प्रगटतो अंगी तुझा ऐकता भावार्थ ।।

तू म्हणतो वेडे खुळे, असे काय चालायचे
येतो मागून मी हे, वळुनी तरी पहायाचे ।।

—सौ. मुक्ता केणेकर

---

सहा महिने लोटले. एक दिवस मालकीण तलोरास म्हणाली, "मी कोलंबोस खरेदी करावयास जात आहे. तू माझ्याबरोबर ये. तिथ आपण बलराम सापडतो का हे पुन्हा बघू." आणि ती तलोराला घेऊन दुसऱ्या दिवशी कोलंबोला निघाली.

तलोराने दरीतली हवा कधीच अनुभविली नव्हती. परतु त्या हवेचा तिच्यावर तिच्या नवऱ्यापेक्षा वेगळा परिणाम झाला. ती नेहमी शात असे, गप्प असे, स्वत.च्याच नादात असे, ती आता एकदम बडबड करू लागली. लोकाना ती स्वत:च्या दंतपंक्ती मनमोकळे-पणे हसून दाखवू लागली. ती ओठानी आणि जिभेने मचमच असा आवाज करू लागली. एकाच वेळी तिची दृष्टी सर्व दिशाकडे लागली होती. तिचे डोळे म्हणजे दोन काळी-मोर द्राक्षेच. तिची जीभ बाहेरील हवा अधीरतेने चाखीत होती, तिचे गाल लालबुंद झाले होते आणि फुगीर दिसत होते. तिने एक बऱ्याच आखूड बाह्याची चोळी घातली होती. जसजशी गाडी पहाडातल्या थंड हवे-कडून कोलंबोच्या उष्ण हवेकडे धाव घेत होती तसतशी तलोरा अधिक अधिक अधीर होत होती. तिचे उघडे हात चोळीखालच्या तिच्या वक्षस्थळावरून जोरजोरात फिरत होते, जणु काही तेथे दोन पूर्ण पिकलेली सफरचंदे होती, आणि गाडी थांबल्याबरोबर ती ती सफरचंदे उतरवून ठेवणार होती.

आणि एके दिवशी तलोरासुद्धा हॉटेल-मधून नाहीशी झाली. असेल आपल्या नवऱ्याच्या शोधात, असे तिच्या मालकीणीस वाटले, परंतु तीन दिवस झाले तरी कोणालाच तिचा पत्ता लागला नाही.

असेच एक वर्ष गेले—

'फेसगेल' हॉटेलच्या समोरील समुद्राचे तांडव नृत्य नेहमीप्रमाणे चालू होते. उष्ण कटिबंधातला सूर्य लवणाच्या मळयावरून आपला मार्ग आक्रमीत होता आणि एखाद्या तेलज्योतीसारखा लालजांभळा समुद्र तेवत होता.

समुद्रात दूरवर एक बोट उभी आहे. गेले चार तास तिच्या धुराडयातून धुराचे लोट बाहेर पडत आहेत. ती प्रवासाच्या तयारीत आहे. लहानमोठया नावा पांढरा शुभ्र पोषाख परिधान केलेल्या प्रवाश्यास आणि त्यांच्या बरोबरच्या सामानास बोटीवर पोहोचवीत आहेत. आता शिडी बोटीवर उचलण्यात आलेली आहे आणि सर्व बाजूनी गोंधळ माजला आहे.

बोट अजून स्तब्ध उभी आहे. प्रवाश्यांची डोकी बोटीच्या कठडयावरून खाली वाकली आहेत. पाण्यात अर्धनग्न, गरीब, तपकिरी रगाचे सिंहली हातात लाकडाचा एक एक ओंडका घेऊन पोहत आहेत. कोणीतरी एक चांदीचे नाणे पाण्यात टाकते आणि मग हे सिंहली एखाद्या पाणघोडयासारखे जोराचा आवाज करीत पाण्यात डुबी मारतात. थोडयाच वेळात त्यांची चकाकणारी काळी डोकी पाण्याबाहेर दिसू लागतात आणि त्याच्यातला एक दातामध्ये ते चांदीचे नाणे धरून उभा राहतो. मग ते पुन्हा बोटीभोवती चकरा मारतात व बोटीवरील प्रवाश्यांची करमणूक करतात. बोट सुटेपर्यंत नाणेफेकीचा

खेळ चाललेला असतो, आणि दर वेळी हे सिंहली लोक नाणी पाण्यावाहेर काढतात.

त्यातच बलराम आहे. कित्येक महिने बलरामसुद्धा हा नाणे पाण्यावाहेर काढून पैसे मिळविण्याचा धंदा करतो आहे. तो जितक्या सहजपणे पाण्यात डुबी मारून पैसे मिळवतो, तितक्याच सहजपणे ते रात्री जुगारात आणि कलावंतिणींवर खर्च करतो. येथे आल्यापासून बलराम तलोराला केव्हाच विसरून गेला आहे. साखरेला चिकटलेल्या एखाद्या माशी-सारखा तो कोलंबोला चिकटून आहे. एखाद्या वाघासारखा तो रात्री कलावंतिणीवर झडप घालतो व दिवसा नाण्यावर! रोज रात्र पडण्याच्या सुमारास तो आपली नाणी गोळा करून समुद्र काठावर येतो आणि मग एखाद्या बाईला जो कवटाळून बसतो तो सकाळ होईपर्यंत तिला सोडीत नाही.

आजची रात्रसुद्धा निखाऱ्यासारखी उष्ण आहे. कापराच्या झाडांनी आपला गंध सवंध शहरभर पसरविलेला आहे. तारे पाण्याच्या चमकदार बुडबुड्यासारखे आकाशास लटकले आहेत. हॉटेलमधून दर दोन मिनिटांनी पांढरा अगर काळा पोषाख केलेले लोक बाहेर पडत आहेत. कुली त्याना रिक्षातून ओढीत आहेत. कोणाच्याहि डोक्यावर टोपी नाही. हे सर्व लोक कोलंबोचे रात्रीचे जीवन अनुभवावयास निघाले आहेत.

बलराम असाच एका घराच्या भिंतीला पाठ टेकून रस्त्याच्या कडेला बसला आहे. चंद्राप्रमाणे शहरातील या वस्तीत तो आता ओळखला जातो. रिक्षातून येणारे लोक त्याच्याजवळ थांवले आणि रिक्षातून खाली उतरत आहेत.

लोक एका मोठ्या घरात शिरताना बल-रामला दिसत आहेत. सर्व घराची दारे बंद आहेत व आतून मध्येच गाण्याची लकेर येत आहे. कुठे सारंगीचे सूर उमटत आहेत तर तंबोऱ्याचे झंकार निनादत आहेत.

बलराम टेकला आहे त्या भिंतीजवळचेच एक दार उघडले जाते. एका स्त्रीचा हात बाहेर दिसतो. हाताच्या दोन बोटांनी खुणा केल्या जातात. अपुऱ्या प्रकाशात आणि त्या चांदणी रात्रीच्या उजेडात बलरामला चम-कणाऱ्या दंतपंक्ती दिसतात आणि खिडकीवर चेंगरली जात असलेली तिची दोन अनावृत उरोजे. बलराम त्या स्त्रीस ओळखीत नाही, परंतु त्या अंधाऱ्या खिडकीच्या दिशेने तो विचारतो, " तू मोकळी आहेस काय ? " ती स्त्री फक्त जिभेने आवाज करते, आणि बलरामच्या भोवतालची सर्व पृथ्वी गरगरू लागते.

बलराम आत शिरणार इतक्यात एक इंग्रजी सोजीर त्याला मागे सारून त्या घरात शिरतो. बलराम खिडकीखाली उभे राहून त्याच्या परत यण्याची वाट पाहत राहतो. परंतु ती स्त्री पुन्हा खिडकी उघडीत नाही. आठ दिवस आणि आठ रात्री सर्व सैनिकाचा तेथे जणु तळ पडला आहे. आठही रात्री बलराम त्या खिडकीखालीच झोपत होता आणि त्या आठही रात्री त्याने दुसऱ्या कोठल्याही स्त्रीस स्पर्श केला नाही. नवव्या रात्री पुन्हा खिडकी उघडली गेली, त्या हसऱ्या मुखातल्या दंतपक्ती चमकल्या. बलरामची कानशिले लालवुंद झाली आणि त्याच्या डोळ्यांसमोर काजवे चमकू लागले. बलराम त्या घरात शिरला आणि त्याने त्या स्त्रीस आपल्या बाहुपाशात कवटाळून घेतले. पूर्वेकडील लोक सुखाचा अत्युत क्षण अनुभवीत तेव्हा ते आपले डोळे मिटून घेतात. आज बलरामनेसुद्धा आपले डोळे मिटून घेतले होते. त्या बद दाराच्या मागे त्या स्त्रीच्या सानिध्यात तो चार दिवस राहत होता.

आज तेव्हापासून चौथी रात्र होती. त्या घराचा मालक नेहमीप्रमाणे आपल्या मित्रां-समवेत बाहेर रस्त्याच्या कडेला गप्पा मारीत बसला होता. आतून जोराच्या गल-क्याचा आवाज ऐकू येत होता, आणि एका मुलाने येऊन त्याला सांगितले; " बाबा, त्या सिंहली मुलीची खोली रिकामी आहे. ती आणि तिच्या बरोबरचा सिंहली हे दोघेही नाहीसे झाले आहेत. कदाचित् तो सिंहली पहाडा-वरील असणार, आणि ठग होऊन त्याने त्या मुलीला पळविले असावे. "

त्याच वेळी मालकास दिसले की खिडकीचे गज मोडलेले आहेत. तो ओरडला—" हलकट, पळून गेले शिंचे—! जशी आली तशी पळाली सटवीण ! एका रात्री ती एका नावाड्यास घेऊन आली. सर्वांना ती फार आवडे. नाव काय विचारले तर सांगे 'तलोरा' म्हणून. आणि आजच्यासारखीच त्या दिवशी वादळी हवा होती. विजेसारखी आली आणि विजेसारखी गडप झाली. "

अनेक महिन्यानतर एका संध्याकाळी 'इडन' बगिच्याच्या फाटकावरील विजेची घंटा वाजली. फाटक उघडले गेले तेव्हा त्याच्यासमोर बलराम आणि तलोरा उभे होते. दोघेही आनंदी दिसत होते आणि नेहमीसारखेच शांत !

इंग्रजी मालकाने विचारले, त्याच्या बाय-कोने विचारले, इतर सर्व माळ्यानी विचा-रले, " अरे दोन वर्षांनतर तुम्ही आलात, ते कोठून आलात ? " ती दोघे उत्तराऐवजी नुस्तीच हसली आणि निरभ्र आकाशाकडे बोट दाखवीत. तेव्हापासून ती दोघे बागेत पुन्हा आपली कामे पाहू लागली आणि आजही ते त्या स्वच्छ नील आकाशाच्या आवरणाखाली त्या बागेत काम करीत आहेत. त्या बागेत आजही, वसंत, हेमत, ग्रीष्मादी ऋतु एकत्र नादत असतात. ऋतु-बदल त्या जागेला ठाऊकच नाही.

• • •

# फरक



सकाळपास्न भिकाऱ्यांची कटकट चालूच होती. इकडे घरात धान्याचा साठा नव्हता. दिवसेंदिवस त्याला गळती, लागली होती. बायकोने सुनवले–'चार दिवसांपुरते तांदूळ घरात आहेत म्हटल.' बाजारात तांदूळ मिळत नव्हते असे नाही पण काळ्या बाजारात तांदळाचा भाव सदतीस रुपये मण होता.

बायकोला म्हटले–" तांदळाची पेज सात्त्विक असते. आपण तांदळाची पेज फेकून देतो ते खर म्हणजे मला ......... म्हणजे जे काही सत्त्व असत ते पेज फेकून दिल्यान निघून जात. साहेब लोक पेज फेकीत नाहीत. जपानी लोकदेखील फेकीत नाहीत. "

माझ्या बोलण्यातले तथ्य तिला उमगले नाही. मग मी भराभर भात खायला सुरवात केली झाले !

तांदळाची दोन दिवसांचीच बेगमी होती. अन् त्यात भिकारी सकाळ होते न होते की त्यांचा ओरडा सुरू– " माई, थोडा भात वाढ माई ! थोडी पेज तरी दे माई ! "

सहानुभूति राहोच पण मनातून संताप यायचा. घरात तांदुळाचे रेशनिंग चालू होते. बाजारात तांदूळ मिळणे दुरापास्त. सदतीस रुपये मणाचे तांदूळ घेऊन किती दिवस चालणार ? पोटाला मारणे एखादेवेळी शक्य आहे पण भिकाऱ्याचा उपद्रव सहनशक्ती-बाहेर गेला आहे. ऊः ? भिक्षा मिळणार नाही म्हणून सांगणे शक्य नाही कारण संस्कार आड येतात.

लहानपणी खेडेगावात असताना पाहात आलो होतो मूठभर भिक्षेसाठी फकीर वैष्ण-वाला कुणी परत पाठवीत नसे. तेव्हापासून एक तऱ्हेचा संस्कार मनावर ठसलाय – भिक्षु-काला परत पाठवू नये.

पण कुणी आले की मनस्ताप होतो

---

विभूतिबाबूंनी आपल्या साहित्यजीवनात दोनशेहून अधिक लघुकथा लिहिल्या. त्यांच्या साहित्यिक जीवनाचा आरंभ लघुकथांनीच झाला. त्यांचे मौरीफूल, असाधारण, तालनवमी, अनुसंधान, मेघमल्लार वगैरे कथासंग्रह बंगाली वाचकांस आजही प्रिय वाटतात. त्यांची पहिली लघुकथा 'उपेक्षिता' १९२१ साली 'प्रवासी' ह्या बंगाली नियतकालिकात प्रसिद्ध झाली. १९४२ ते १९४९ ह्या छोटया काळात भारताला जागतिक युद्ध, दुर्भिक्ष, देशाची फाळणी, स्वातंत्र्यप्राप्ती इत्यादी अनेक घटना अनुभवावयास मिळाल्या. बंगाली समाजाचे मर्ममूळ या काळात उध्वस्त झाले. विभूतिबाबूंच्या अनेक कथा या पार्श्वभूमीवर आधारलेल्या आहेत.

विभूतिबाबूंच्या अनुवर्तन, अपराजित, बिपिनेर संसार, आवश्यक, पथेर पांचाली. आदर्श हिंदू होटेल, इच्छामती वगैरे कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. सत्यजित राय यांनी दिग्दर्शित केलेल्या पथेर पांचाली, अपराजित अपूर संसार ह्या चित्रपटां-मुळे आता सर्वांनाच विभूतिबाबूंची ओळख झाली आहे.

---

: लेखक :

विभूतिभूषण बन्द्योपाध्याय

: अनुवाद :

सौ. नलिनी उगार

कुणी आले नाही तरच बरे असे वाटते.

सकाळी छोट्या खोलीत लिहीत बसलो होतो. मध्यम आकाराची पिशवी घेऊन चाकर बाजार करून आला होता. 'घरातून कुणी त्याला तांदूळ आणावयाला पाठविले होते की काय? साठा खतम्?' मी विचारले.

"त्यात काय आहे?'

राजनला ती पिशवी गुपचूप घेऊन जायची होती. त्याचा चेहराच सांगत होता. मुद्देमालासकट सापडल्यामुळे तो थोडा गागरला होता. डोके खाजवीत खाजवीत म्हणाला—"तादूळ धनी!"

—"अस्सं. कसे?"

—"दोन शेराचा भाव आहे जहुरीच्या दुकानात. कंट्रोल ......"

—"अच्छा, म्हणजे कंट्रोलच दुकान इथदेखील उघडल म्हणता. किती देतो?"

—"दोन रुपयापेक्षा जास्त देत नाही धनी."

हा बगाला नव्हे. विहार. तरीदेखील इथ कंट्रोलच दुकान, अन् दोन रुपयापेक्षा जास्त कुणालाहि मिळणार नाही म्हणे—काय आहे तरी काय?

एका भिकाऱ्याने हाक मारली—"भिक्षा वाढ माई—तांदूळ दे!"

राजन म्हणाला—"भिक्षाविक्षा काही नाही, तादूळ नाहीत."

लिहिता लिहिता म्हटले—"दे, मूठभर दे!"

पाठोपाठ आणखी एकजण आला. त्यालाही भिक्षा घालण्यात आली.

नऊच्या सुमारास आणखी दोघेजण. भिक्षा घेऊन ते निघून गेले. त्यानतर एका म्हाताऱ्याचा आवाज आला. मनस्ताप वाढत चालला होता. भिक्षा घालू नकोस म्हणून राजनला सांगितले. पण तरी म्हातारा ताटकळत उभाच राहिला, जायला तयार होईना. वारवार एकाच एका सुरात ओरडायला लागला. बाहेर येऊन मी म्हटले—"भिक्षा वगैरे काही मिळणार नाही. चालता हो इथून—सारख सारख काय देणार?"

माणूस म्हातारा होता. अगात फाटके कपडे. हातात पोचे आलेला टिनचा मग्. मुरकुतलेला चेहेरा खरा पण भुकेकंगाल खास नव्हे.

## दुपार

**टळटळित दुपार**
**घुटमळते क्षणभर**
**लाल तांबड्या पांगाऱ्यावर.**
**तेथून झेपावते लोचट मांजरासारखी**
**विस्कटलेल्या कौलारावर.**
**तेथून हळूच डोकावते**
**गारठलेल्या चुलीवर**
**रिकामटेकड्या भांड्यावर.**
**आणि शेवटी होऊन राहते**
**खपाटलेल्या पोटामध्ये**
**भुकेचा अग्निशर!!**

*—राम श्री. गोसावी*

मग् पुढे करून रेकत रेकत तो म्हणाला—थोडी पेज दे बाबा—फार भूक लागलीय."

रागावून म्हटले—काय राजा लागून गेलास रे—भाताची पेज हवीय म्हणे.

—"थोडी दे बाबा."

—"चालता हो इथून. जा. दिमाख बघा. सकाळी केव्हाच स्वयपाक झालाय. आत्तापर्यंत पेज राखून ठेवलीय ह्याच्यासाठी!"

हताश होऊन तो निघून गेला. पुन्हा लिहायला बसलो. माझ्या मनाला ह्यात काही खटकले नाही. रोजच्या रिवाजाप्रमाणे ठराविक मुठी तांदळाची भिक्षा घातली. किती भिकाऱ्याना तरी भिक्षा घालायची!

दिवस वाढत चालला. आघोळीला निघणार इतक्यात एक प्रौढ व्यक्ती फाटकाजवळ उभी राहिली. अगात मळकी बडी, पायात खडावा, हातात वेळूची लाठी. त्याने विचारले—"बाबूजी, तुम्ही ब्राह्मण?"

मान वर करून फाटकाकडे पाहात मी विचारले, —"का, काय हवय?"

हात वर करून नमस्कार करून तो म्हणाला—ब्राह्मणेभ्यो—"

मीहि नमस्कार करून विचारले—"कुठून आलात?"

—"बाबूजी, घरात येऊ? मीहि ब्राह्मणच आहे."

"हो, या ना."

तो आत आला खरा पण व्हराड्यात न येता, अंगणातच उभे राहून म्हणाला—"एक विचारायचय तुम्हाला. खूप शोधाशोध केली पण ब्राह्मणाच घर सापडल नाही. माझ गाव शान्तिपूर. मुसावनीत एक नातेवाईक नोकरीला आहे. त्याच्याकडे निघालोय. बरोबर एक लहान मुलगा आहे. त्या सीताफळाच्या झाडाखाली बसवून आलोय. थोड प्यायला पाणी मिळू शकेल तर—"

—"हो. हो!—अहो त्यात काय मोठ झाल—कमालच करता—बोलावून आणा त्याला."

मुलगाही आला. ह्या ब्राह्मणाचीसुद्धा दुर्दशाच दिसली. तोंडाने उघड मागायचे त्याला जड वाटत होते. मी विचारले—"आपल जेवण झाल नसेलच. आता इतक्या उशिरा कुठ जाणार—इथच थोडा वरणभात......"

—"छे. छे. थोड पाणी मिळाल तरी पुरे. तुम्हाला उगीच त्रास कशाला? मुसावनीत माझा मेव्हणा......"

—"हे काय बोलण झाल! मुसावनी इथून दोन मैलावर आहे."

त्यांना मी जेवायला लावल. जेवण करून थोडी विश्रान्ती घेऊन संध्याकाळच्या सुमारास ते दोघेजण निघून गेले.

रात्री पडल्या पडल्या माझ्या मनात आले—हे अस कस झाल? भाताची पेज मागणाऱ्या भिकाऱ्यावर खेकसलो अन् शान्तिपूरचा ब्राह्मण म्हटल्याबरोबर दोघाना आदरातिथ्यान जेवायला घातल. त्या वेळी तादळाच्या काटकसरीची आठवण राहुली नाही ती?

हे अस का होत?

विचार केल्यावर एका कारणमीमासेने माझे समाधान झाले.

स्वत ला भिकाऱ्य च्या पंगतीत बसवायची माझी छाती होत नाही. पण मनातल्या मनात शान्तिपूरच्या दरिद्री ब्राह्मणाशी स्वतःची तुलना मी सहज करू शकतो.

• • •

# न्यूड



: लेखिका :

सौ. वसुधा पद्माकर पाटील

हॉलच्या बंद दाराबाहेर अनिवार उत्सुकतेने थबथबलेला घोळका उभा होता. ठणठणून घंटेचा टोला पडला आहे. अकराला फक्त पाचच मिनिटे आहेत. आणि रोजच्याप्रमाणे हातात सर्व सामान घेऊन, धडधडत्या छातीने, घामाघूम होऊन जिना चढून वर येताच हॉलचे मोठे दार उघडे नसून बंद का ? सर्वांच्या चेहेऱ्यांवर प्रश्नचिन्ह. आधीच भीतीने चेहेरे काळवंडलेले. त्यातच अनिश्चिततेची विलक्षण व्याकुळ छटा आणि शिवाय हॉलचा पांढरा शुभ्र भव्य दरवाजा बंद. कुजबूज सुरू झाली. हलक्या आणि भित्रट आवाजात.

"लाईफस्टडीचा पेपर चार दिवसांचा म्हणून आज पहिल्याच दिवशी उशीर ?" एक लहानसा, पोरगेलासा दाढीवाला गळ्यातील गोटी वरखाली करीत गुदमरल्या आवाजात कुणाला तरी म्हणाला. त्याला उत्तर एका प्रौढ आणि छद्मी चेहऱ्याच्या माणसाकडून फक्त मिस्किल हास्याच्या स्वरूपात मिळाल.

"पाच मिनिट उशीर झाला पेपर द्यायला तर सुपरवायझर्स लांडग्यासारखे वस्स्कन् अंगावर येतात नुसते. आणि आज यांना का म्हणून उशीर विचारल पाहिजे" — गुरमर आवाजात एकाची तक्रार.

"अरे यार, चार दिवस पेपर चालू राहणार आहे. पाच मिनिटांची कशाला फिकीर ! रंगवून रंगवून आपल्यालाच कंटाळा येईल" — फेफिकीर सुरात कुणाचे तरी उत्तर.

"ड्रेपरी जर गुलाबी असेल तर रंगवायला बर वाटत बुवा. नाहीतर आहेच आपला जांभळा, निळा, चटणी रंग — द्या थरावर थर—" कुणाला तरी पुढलीच चिंता.

"ड्रेपरीच काय मोठस रे. पण आधी आऊटलाईन येणाराय का काढायला परफेक्ट ! तिथच तर घोटाळा आहे. केली आहेत का काही स्केचेस ? वर्षभरात आहे का थोडीशी तरी प्रॅक्टिस ?" दुसऱ्याला दुसरीच चिंता.

कुणीतरी फाट्कन् शिंकले. लहानशी खसखस पिकली.

"वा राव ! आज हाणामारीच्या पेपराचा पहिलाच दिवस अन् तुम्ही आपले शिकताय ? निर्धास्त दिसताय." — तिरीमिरीने कुणीतरी फणकारले.

"अहो घाबरू नका. ड्रेपरीची चिंता होती ना या सद्‌गृहस्थांना. मी त्यांना म्हणतोय की ड्रेपरीची चिंताच नको. टुडे लाईफ इज् विदाऊट ड्रेपरी"...शिकणारा रुमालाने नाक पुशीत आरामात बोलून गेला नि बाकीचे सारे बावचळून गेले.

"न्यूड !"; "आज न्यूड आहे !"; "बापरे ! आज लाईफ ड्रेपरीशिवाय !"; "अरे देवा, आता कस होणार आमच !" एकामागून एक अश्चर्याचे हताश उद्‌गार. जरा वेळ निःशब्द शांतता. कुणीहि कुणाच्या नजरेला नजर देऊ इच्छीत नाही. एकमेकांशी बोलू पाहत नाही. सारेजण जागच्या जागी खिळल्यागत. पाय जणु कुणी जबरदस्तीने जमिनीला कायम चिकटवून ठेवले आहेत आणि थंडगार पडलेल्या पंजांची घट्ट पकड हातातल्या सामानावर निर्जीव कलेवरांच्या पंजासारखी पडली आहे.

विलक्षण संथपणे तीनचार क्षणांची, अस्वस्थतेची ती लाट ओसरते आणि हॉलचे बंद दार करकरत हळूच उघडते. साऱ्यांच्या भकास नजरा दारावर खिळतात. मुख्य अधिकारी गंभीरपणे बोलतबोलत आतल्या दारातून मोठ्या दारापर्यंत हळूहळू येतात आणि कमानीखाली स्थिरावतात.

एक मिस्किल हास्याची सूक्ष्म लकेर क्षणभर चौघांच्याहि चेहेऱ्यावर एकदम तरळून जाते. मग क्षणार्धात चेहेरे दगडासारखे निर्विकार करून, घोळक्यातून वाट काढून एक शब्दही न बोलता ते झपदिशी निघून जातात आणि एकदम, विलक्षण गतीने सारेजण निःशब्द होऊन त्या भव्य दारातून आतल्या मोठ्या दालनात प्रवेश करतात.

दालनात इझेल्स उभी असतात. वाकडी मांडलेली असतात. त्यांची रचना वर्तुळाकार. वर्तुळाच्या मध्यभागी पोझ घेऊन मॉडेल बसलेले असते. ड्रेपरी मागल्या पार्टिशनवर आणि मॉडेल बसलेल्या बाकड्यावर नीट लावून ठेवलेली असते. चुण्यांची सुरेख रचना करून. पण मॉडेल ड्रेपरीशिवाय. न्यूड स्टडी...

आत शिरल्याबरोबर चोरून डोळ्यांच्या डाव्या कोपऱ्यातून, उजव्या कोपऱ्यातून मॉडेलकडे झपकन् दृष्टिक्षेप टाकून सारेजण आपापल्या नंबरावर जातात. मॉडेल शांत. निर्विकार. मात्र नजरेत चलाखी. नजरेच्या एकाच सराईत फेकीतून साऱ्यांचा नवशिकेपणा आणि मनाचा ढळलेला तोल अजमावला जातो आणि पान खाऊन लाल झालेल्या निबर ओठांना किंचित् मुरड पडते. थोडीशी, दिसेल न दिसेल अशी हातापायांची हालचाल होते आणि एकदाच डोळ्यांची झपझप उघडझाप होऊन खिडकीतून दिसत असलेल्या लालभडक गुलमोहोराच्या शेंड्यावर निर्विकारपणे, सराइतपणे रोखली जाते. इतरांच्या स्वतःवर खिळलेल्या

नजरांपासून केव्हाच संपूर्णपणे अलिप्त होऊन.

मग जराशी गडबड. बोर्डस् आणण्याची. सर्व साहित्य नीट माडून ठेवण्याची. एकमेकांशी हलक्या आवाजात बोलण्याची. सुपरवायझरकडून कागद, प्रश्नपत्रिका घेण्याची. पेनने कागदावर आवश्यक ती माहिती लिहिण्याची. मनावर आलेले दडपण हळूहळू मेणासारखे वितळू लागते. संकोच कापरासारखा उडून जाऊ लागतो. स्वच्छ आणि कोऱ्या मनाने प्रश्नपत्रिका वाचल्या जातात.

"समोर असलेल्या मॉडेलची पूर्णाकृति काढून छायाप्रकाशामुळे ती जशी दिसते आहे तशी रंगाच्या सहाय्याने काढण्याचा प्रयत्न करा."

"ती जशी दिसते आहे तशी"......"ती जशी दिसते आहे तशी". "कशी दिसते आहे ही समोरची बाई ?"......साऱ्याच्या समोर एकच प्रश्न उभा राहतो आणि त्याचे उत्तर शोधण्यासाठी सारेजण धिटाईने, ताठ मानेने मॉडेलकडे, चित्रकाराच्या ऐटीत रोखून पाहतात – तरीही मनात अस्वस्थताच. नजरेत तोच काहीतरी वेगळेच करीत असल्याचा, बुजरा केविलवाणा भाव–हातापायांना किंचित् सूक्ष्म कंप – आणि नस न नस ताठरलेली.

मॉडेलची नजर कमानीच्या आकाराच्या आकाशाच्या निळ्या लखलखीत तुकड्यावर स्थिरावलेली.

बसका, रुंदट, निब्बर असा चेहरा. पानतंबाखू खाऊन काळसर पडलेले ओठ. वयानुसार पेशानुसार चेहेऱ्याचे रूक्ष भाव. गच्च बाधून गाठ मारलेले खुरटे, चरचरीत केस.

नजरा खाली ओघळतात.

पुष्ट खादे, त्याना भरभक्कम गोलाई, गुळगुळीत निमूळते दड, पण त्यांना गोंडसपणापेक्षा कणखरपणाच जास्त. पंजे मात्र नाजूक. लावसडक निमूळती बोटे. त्याना मेंदीचा रंग. वाकड्याच्या कडेवर अगदी अलगद टेकून ठेवलेली.

नजरा हळुवारपणे खाली सरकतात.

एके काळी पुष्ट आणि भरीव असलेले परंतु वयोमानाने आता वरेच खाली ओथंबलेले नितळ स्तन. सर्वांत जास्त प्रकाश उजव्या स्तनावर आणि त्यावरच्या, खांद्यापर्यंतच्या भागावर. सर्वांत जास्त काळोख डाव्या स्तनाच्या आणि डाव्या दंडाच्या मधल्या घळीत. त्यामुळे दोन्ही स्तनांच्या आकारातील साम्यच नाहीसे झालेले.

नजरा सराइतपणे खाली येतात.

नाजूक नसला तरी लयदार असा कबरेचा भाग, डावीकडल्या काळोखामुळे जास्तच उठून दिसणारा उजवीकडचा प्रकाशमान असा नाभीभोवतालचा आणि ओटीपोटाचा फुगीर भाग ... सगळ्यात जास्त भरीव, ठाशीव गोलाई याच भागाला जास्त. साऱ्या शरीरातील स्त्रीत्व केवळ याच भागात सामावलेले. कदाचित् तीन-चार अपत्याचा भार या भागाने सोसलेला असेल. म्हणून एक प्रकारच्या लुसलुशीतपणाचा, मार्दवतेचा झालेला आभास.

नजरा शांतपणे आणखी खाली स्थिरावतात.

मध्यभागी लहानसा काळोखा फुगीर त्रिकोण – आणि प्रकाशात अर्धवट न्हाऊन निघालेल्या, काळोखात अर्धवट बुडालेल्या मांसल पण कणखर मांड्या – स्नायूंच्या लवचीक स्त्रीसुलभ गोलवा – छायाप्रकाशाची विलक्षण सरमिसळ – आकार दिसतात पण निश्चित समजत नाहीत. गोलाई कुठे सपते आणि कणखरपणा कुठे जाणवतो ते उमजत नाही. नजरांना भिरभिरी आल्यासारखा भास होतो. त्या गिरगिरून खाली कोसळतात.

तिरप्या घाटदार पोटऱ्या – जवळजवळ काळोखात सपूर्ण बुडालेल्या – त्याच्या नाजूक, कोमल, बाकदार रेषा काळोखातून हुडकून काढाव्या लागतात – त्या रेषांचा एकमेकाशी झालेला छेद बारीक नजरेने टिपून घ्यावा लागतो – आणि खाली सुबकशी, गोजिरी पावले. अलगद, हळुवारपणे जमिनीवर टेकलेली – जणु तुकतेच घुंगुर काढून बाजूला फेकलेले आहेत अशा अभिनिवेशात तळव्याचा मेंदीचा रग काळोखातूनही अस्पष्टसा दिसण्यासारखा.

नजरा तळाकडून डाव्या बाजूने वर्तुळाकार फिरून वरून पुन: उजव्या बाजूने खाली पावलांशी येऊन स्थिरावतात. पार्श्वभूमीसाठी लिंबोणी पिवळ्या रंगाचे पारदर्शक, झुळझुळीत नजरेत चटकन् भरण्यासारखे वाऱ्याने फडफडणारे कापड आणि बाकड्यावर सहज घरंगळून खाली येईल, असे वाटण्यासारखे व्यवस्थित चुण्या पाडून ठेवलेले, प्रकाशात उजळून दिसणारे गुलाबी कापड. या दोन रगाच्या समन्वयात आपल्या अगाच्या वेगळ्याच तुकतुकीत, रसरशीत, सावळ्या रंगाने उठून दिसणारी भरदार बाध्याची ती स्त्री. सपाट, रंगीत पार्श्वभूमीवर एक जिवंत, रसरशीत कातीचा सघन मानवी आकार.

समोरच्या निर्जीव कॅनव्हासवर, कागदावर हा समोरचा आकार, रेषांच्या जाळ्यातून, रंगांच्या फटकाऱ्यातून जसाच्या तसा, त्याच्या गोलाईसकट, त्याच्या रसरशीत त्वचेसकट, कणखर कण्यासकट आणि निर्विकार मुद्रेसकट सघन स्वरूपात चितारायचा म्हणजे शून्यातून विश्व निर्माण करणे.

नजरा क्षणभर सूक्ष्म निरीक्षणात व्यग्र होतात आणि लागलीच प्रत्येकजण आपापल्या चिंतनात मग्न होतो. लज्जा, संकोच, कुतूहल याना बाजूस सारून आव्हान समोर उभे ठाकते.

आणि मग हाणामारी सुरू होते. कॅनव्हास, चारकोल, कागद, रबर, पेन्सिल आणि हात यांची. हात पुढेमागे होतात, डोळे बारीक होतात – मापे घेतली जातात – चौकोन रेखले जातात – पाय मागे जातात – पुढे येतात – रेषाचे जाळे – आणि खोडाखोड – निरीक्षण मापन आणि रेखाटण.

आव्हान स्वीकारले जाते – प्रत्येकाकडून – परीक्षेची भीति जाते – मनावरचे दडपण नाहीसे होते – प्रत्येकापुरते विशिष्ट मर्यादेचे, तरल विश्व स्वतत्रपणे निर्माण होते – मी आणि मॉडेल – माझे कौशल्य, माझी अभिव्यक्ती, आणि समोरचे मॉडेल – आकार त्या स्त्रीचा, रेषा माझ्या – त्वचा त्या स्त्रीची – रग माझे – अंग, प्रत्यग, तिचे आणि कलात्मक आविष्कार माझा. तिच्यात आणि माझ्यात अडथळा फक्त कॅनव्हासचा – दु:खी ती नि मी एकच – मी त्या त्वचेत मिसळून जाईन आणि माझे रंग तयार करीन – मी त्या आकारात एकरूप होईन आणि कॅनव्हासवर रेषाकृती काढीन – मी आव्हान स्वीकारले आहे.

प्रत्येकाचे मनाशी हेच हितगूज. कुणी कुणाकडे पाहत नाही. कुणाशी बोलत नाही. प्रत्येकजण हाणामारीत व्यग्र.

मध्येच विश्रातीसाठी त्या स्त्रीला टाळ्या वाजवून खुणा केल्या जातात. एक लांबलचक जाभई आणि आळोखेपिळोखे देऊन ती उठते आणि सावकाशीने बाजूला सोडून ठेवलेले कपडे एकएक अगावर चढविते–बाकाखालीच

अंग लेटून देते – तेवढीच विश्रांती – दहा मिनिटात एक झोपेची लहानशी सुरसुरी येऊन जाते –

तेवढ्या वेळात पुन: कुजबूज – एकमेकांच्या आकृत्यांशी तुलना. मिस्किलपणे काही लहानश्या तक्रारी. पण संकोच बुजला आहे नवखेपणाची लाट केव्हाच ओसरली आहे – काही जण अजून तंद्रीतच – पुढची रूपरेषा डोळयांसमोर आणण्याच्या प्रयत्नात. रंगाची कालवाकालव केव्हाच मनातल्या मनात सुरू झाली आहे – मिटल्या डोळ्यांसमोर –

यलो ऑकरमध्ये थोडासा ब्राऊन – शिवाय क्रिमझन लेक हवा. डार्कशेडसाठी पर्पल मिक्स करावा लागेल. बॅकग्राऊंड नतर केली पाहिजे. एक ना दोन. रंग उधळले जातात नुसते मिटल्या डोळ्यांसमोर. रेषाचे थैमान चालूच असते. तंद्री भंग पावते टाळयाच्या आवाजाने. सारेजण जागेवर येतात. मॉडेल डोळे चोळीत कपडे काढून पुन: जागेवर येऊन बसते. सुपरवायझरर्सना आतापावेतो नित्याप्रमाणे वस्कन अंगावर येण्याची, आपल्या हेगाडया पद्धतीने गेंगाण्या सुरात वचवच करण्याची संधी मिळालेली नव्हती ती आता मिळते. तरतरा, टोपी सावरीत ते जवळ जातात नि ओरडतात, " ए बये, नीट बस की, खडूच्या खुणा नीट बघ की एकदा नजरेन आणि झोपू नकोस मधे मधे "–

कुणालाच ते आवडत नाही. मॉडेलबद्दल एव्हाना जिव्हाळा निर्माण झालेला असतो. मारक्या म्हशीसारखे डोळे टवकारून बघणाऱ्या सुपरवायझरला मॉडेलने आपल्या गावठी भाषेत एक अस्सल शिवी हाणून गप्प बसवावे असे अगदी मनापासून प्रत्येकाला एक क्षणभर वाटले. पण मॉडेल लाचार हसून अजिजीने नीट सावरून बसते. खडूच्या खुणावर पावले नीट ठेवून.

पुन: तंद्रीची वर्तुळे निर्माण होतात. सर्व वर्तुळाचे केंद्र एकच. सतेज, सावळया वर्णाची ती स्त्री आणि तिचा पुष्ट आकार. सतत चार दिवस काम चालू राहते. एकाच स्त्रीची नाना रूपे निरनिराळ्या फलकावर साकार होऊ लागतात. वर्ण निराळे. आकार निराळे, रंगपद्धतीचे प्रत्येकाचे टेकनिक् निराळे. दिलखुलास चर्चा चालते, सूचनाची देवाण घेवाण होते. काहीची स्तुती केली जाते– काहीच्या टेक्निक्ची वाखाणणी केली जाते. चौथा सबंध दिवस जवळजवळ सैरमैर फिण्यातच जातो. काम पूर्ण होत आलेले असते. जे आव्हान स्वीकारले त्यात यशस्वी की अयशस्वी याची खात्री कुणालाच नाही, तरीही सुप्त समाधान आहे. निर्मितीचे–निदान आव्हान स्वीकारण्याचे. आता मॉडेलविषयी कसलीच जिज्ञासा नाही– राग, लोभ, द्वेष, किळस– कसलाच विकार नाही– मॉडेलही निर्विकार आणि इतर सारेही निर्विकार– टोल पडण्याची सारे वाट पाहतात.

शेवटी सुपरवायझर साऱ्याचे पेपर्स गोळा करतात. सर्व हॉल रिकामा होतो. कोपऱ्यात एकजण अजून शेवटचे पॅचेस मारीत असतो. पेपर्स मोजता मोजता एक नंबर कमी आढळतो. कपाळावर डझनभर आठ्या चढवून सुपरवायझर चौकस नजरेने सर्व हॉल निरखून पाहतात. कोपऱ्यात इझेलवर अजून तन्मयतेने काम चालूच असते– मॉडेल केव्हाच उठून गेलेले असते. ड्रेपरीही गोळा करून घडया मारून बाजूच्या बाकडयावर ठेवलेली असते तरीही ब्रशचे फटकारे जोरात चालूच असतात.

सुपरवायझर ताडताड पावले टाकीत वहाणा फडफडावीत, मोठ्यांदा आरडाओरडा करीत कोपऱ्यात जातात आणि कॅनव्हासवरचे चित्र पाहून विस्मयचकित होतात.

"हे काय हो रावसाहेब ! बायजाबाई इतकी सुदर होती का हो ? काय रंग ! काय हे नाकडोळे ?" चश्म्यावरून पुन्हा पुन्हा निरीक्षण करीत सुपरवायझर म्हणतात.

"जरा गप्प बसा हो. अजून पाच मिनिटे आहेत. मध्ये व्यत्यय आणू नका. टोल पडला की काम बंद करीन "– तिरीमिरीचे उत्तर. पुन्हा ब्रश झपाझप सुरू.

टोल पडतो, हातातले सामान तसेच टाकून तो दहा पावले मागे जाऊन चित्र निरखून पाहतो. मनपसतीचे हसतो. मनाशीच म्हणतो, "नापास तर नापास. पण कस झक्क चित्र काढलय ! परवाच तर येताना बसमधून पाहिली. गोरी गोरी नाजूक– चवळीच्या शेंगेसारखी ! असे मोठमोठे मोकरासारखे काळे डोळे–आणि एवढुसे बदामी ओठ. फार इच्छा होती. ओळख व्हावी. नाव, गाव, पत्ता विचारून घ्यावा. जमलच तर ओळख वाढवावी. आणि. आणि.. पण काही ठरवायच्या आतच ती पदर सावरून झपदिशी उतरली आणि निघून गेली. डौलदार गतीन...किती वेळ पाठमोरीच पाहत होतो दिसेनाशी होईतोवर. तेव्हापासून हालत नाही डोळ्यासमोरून. वाटत ... वाटत ... तीन दिवस तीच समोर बसली आहे. नाजूक. सडपातळशी ... गोऱ्यापान रंगाची ... गोड. लाजवट चेहेरा. उच शंखाकृति गळा. त्याखालची खळगी. त्या खाली कवठी चाफ्याचे पिवळे धम्मक दोन कळे. बारीक लुसलुशीत कंबर.. आणि अगदी कोवळा, नितळ असा नाभीभोवतालचा, सतेज, टवटवीत, किंचित फुगीर असा उदराचा भाग ... त्याखाली सुबकसा, काळासावळा त्रिकोण आणि नाजूक, लयदार वक्ररेषांनी वेढलेल्या, केळीच्या गाभ्यासारख्या मांडया, पोटऱ्या आणि अळीता लावलेली सुरेख आकाराची, लांबसडक बोटांची विलक्षण रेखीव पावले. बस्स. कशी अस्पष्ट धुक्यात वेढल्यासारखी तरळतेय तिची नग्न आकृती डोळयांसमोर. छपरातून शिरलेल्या सकाळच्या पहिल्या कोवळया कवडशासारखी. कोळयाच्या जाळयावर पडून चमकणाऱ्या पाण्याच्या थेंबासारखी सोनचाफ्याच्या ताज्या टवटवीत फुलासारखी. तश्शी मी काढलीय– हुबेहूब. मॉडेल पाहिजे ते अस. अगदी अस्सच आणि चित्र रेखाटणाराही मी एकटाच हवा. भल्या मोठ्या दालनात मी एकटाच. मग मी मनमुराद रंग फेकीन .. मस्तीत डुबेन. चित्रांत जीव ओतीन– आणि...

"अहो मिस्टर डोक ठिकाणावर नाहीय वाटत. एकटेच हसताय ते. चला आटपा लवकर. दोन मिनिट जास्त घेतलीत तुम्ही.." सुपरवायझर खेकसून म्हणतात. तो भानावर येतो. इझलवरच चित्र हळुवार हातानी काढून एकदाच डोळे भरून निरखून पाहतो. आणि सुपरवायझरच्या स्वाधीन करून सावकाश रंगसामान आवरू लागतो. एवढ्या मोठ्या हॉलमध्ये एकटाच.

• • •

स्टॅलिनच्या मृत्यूला दहा वर्षे पूर्ण झाली. या दहा वर्षांत रशियाच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक विश्वामध्ये अंतर्बाह्य बदल झाले. स्टॅलिनच्या दडपशाही वृत्तीने पुन: डोके वर काढू नये म्हणून नवीन रशियन राज्यकर्त्यांनी स्टॅलिनने केलेल्या क्रूर कर्मांचा, तात्त्विक आणि व्यावहारिक चुकांचा पाढा रशियन जनतेपुढे निर्भयपणे मांडला. त्यामुळे नवे रशियन जीवन हे अंतर्बाह्य बदलून गेल्याचे, नव्या विश्वासाने उजळून निघाल्याचे दृश्य आज दिसत आहे. अर्थात हे बदल कुठल्याही एकाच विशिष्ट क्षेत्रांत झालेले नसून ते सर्वच क्षेत्रात झालेले आहेत. इटालियन कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रात सिनॉइ वरेफा यांनी म्हटल्याप्रमाणे या बदलांचा एकत्रित विचार केला पाहिजे. त्याशिवाय विचारसूत्राला पूर्तता प्राप्त होणार नाही. ते म्हणतात–

" The cultural debate is not to be separated from others. The international problems, the economic discussions, the public control—all impinge on each other and add up. These elements will not give us a complete image of the difficult battle in progress unless they are considered in their ensemble " ( Link, April 63 ).

समाजावर असे अंतर्बाह्य संस्कार घडत असल्यामुळे रशियातील एकंदर सर्वच वातावरणात बदल घडून आला. अर्थात हा बदल फार मोठ्या प्रमाणात स्टॅलिनच्या काळातील वृत्तींबरोबर सर्वत्र लढा देऊनच घडून आला आहे. या सर्वांचा समग्र परिणाम म्हणजे रशियन माणूस मोकळेपणाने बोलू लागला. आपल्या गुणदोषांची चर्चा उघडपणे करू लागला. त्याला आपल्या क्रुश्चेव्ह या पुढाऱ्याविषयी अंत:करणापासून आपलेपणा वाटू लागला. जनतेमध्ये मिसळणारा, तिच्या सुखदु:खांची चर्चा तिच्याशी समरस होऊन करणारा नेता रशियन जनतेला लेनिननंतर प्रथमच लाभला आहे. क्रुश्चेव्हच्या नेतृत्वाविषयी ब्रिटनमधील एडवर्ड क्रँक शॉ लिहितात–

The first true politician, as the word is understood in the west, to be produced in Soviet Union. " ( News week, April 63 ).

या गोष्टीचा इथे उल्लेख करण्याचे प्रयोजन इतकेच की, क्रुश्चेव्हच्या धोरणांचे परिणाम रशियाच्या सांस्कृतिक जीवनावर झालेले आहेत. एवढेच नव्हे तर भावी रशियन साहित्याची जडणघडण क्रुश्चेव्हने सुरू केलेल्या धोरणाच्या विजयानेच उजळून निघणार आहे. या धोरणाचे परिणाम रशियन वाङ्मयावर काय झाले हे तपासून पाहताना रशियामध्ये पक्ष आणि सरकार (Party & State) हे कुठलेही धोरण अमलात आणावयाच्या बाबतीत एक हत्यार आहे हे बुद्धिवादी वर्गाने ओळखले आहे. अर्थातच हे हत्यार दुधारी आहे हेही विसरता कामा नये. स्टॅलिनच्या कारकीर्दीत ज्यांचे उच्चारस्वातंत्र्य हिरावून घेतले होते तो वर्ग मुख्यत: लेखक आणि कलाकार आज नव्या धोरणाला मनापासून पाठिंबा देत आहे.

मात्र नव्याने लाभलेल्या या स्वातंत्र्याच्या मर्यादा ध्यानात न घेता काहींनी अतिरेकाला जाऊन मांडवलशाहीमध्ये जगणाऱ्या आणि वाहणाऱ्या व कलेसारख्या (Modern Arts) कला प्रकारांचे स्तोम माजविण्यास सुरुवात केली. संगीताच्या अर्थहीन प्रकारांचे कौतुक सुरू झाले. अर्थात रशियन जनतेने त्यांना योग्य उत्तर दिले. त्याची शहानिशा करावयाची झाल्यास मास्कोमध्ये भरलेल्या मॉडर्न आर्ट प्रदर्शनाबद्दल रशियन जनतेने तेथील ' मतप्रदर्शन पुस्तिकेत व्यक्त केलेली मते तपासून पाहता येतील. क्रुश्चेव्हने तर तेथल्या तेथेच या प्रवृत्तींना विरोध करण्याचा निश्चय जाहीर केला. (Gentleman, we are declaring war on you ! ) कु. पेट्रिका ब्लॅकसारख्या या ' नव्याचा ' उदोउदो करणाऱ्या ' लाईफ 'च्या प्रतिनिधीने व्यक्त केलेले विचारही लक्षात घेण्यासारखे आहेत. त्या लिहितात–

" Unfortunately, modern music and painting have proved less accessible (in every sense) to the general public, as these new works are very rarely performed or exhibited, public taste has not developed much beyond Rimsky-Korskov and Repin. " (Encounter, April 63).

# रशियन साहित्यातील

## नव्या कलाकृतींचा परिचय

आता रशियात प्रत्यक्षात प्रसिद्ध झालेल्या काही नवीन वाङ्मयाचा परामर्श या पार्श्वभूमीवर घेणे वावगे होणार नाही. ऑगस्ट-जेकबसनच्या Old Oak या १९५६साली प्रसिद्ध झालेल्या नाटकाचे थोडक्यात कथानक असे आहे. या नाटकाचा नायक एक वृद्ध शास्त्रज्ञ आहे. आपल्या क्षेत्रात गाजलेला हा शास्त्रज्ञ नव्या तरुण शास्त्रज्ञाने लावलेले शोध हे खुल्या दिलाने स्वीकारू शकत नाही. तेव्हा त्याची पत्नी, मुले आणि मित्र त्याला त्याने एके काळी लावलेले शोध हे शास्त्रीय प्रगतीच्या दृष्टीने क्रांतिकारक असल्याचे परंतु आता शास्त्र अधिक प्रगत झाल्यामुळे नव्यांचा स्वीकार करणे आवश्यक झाले आहे हे पटवून सांगण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्याला हे पटत नाही. त्याचे अभिमानी मन नव्या परिस्थितीमधील आपले स्थान स्वीकारू शकत नाही. तो जीवनापासून अलग पडतो. एके काळी आपण एवढे मोठे कर्तृत्व गाजवले असताना आयुष्याच्या उत्तरार्धात 'तरुण पिढी' पुढे माघार घेणे त्याला मानवत नाही. आपल्या गर्वाच्या भाराखाली खचत जाऊन हा शास्त्रज्ञ एकलकोंडेपणाने जगणारे जीवन एके दिवशी

सोडून 'राम' म्हणतो. तेव्हा त्याची पत्नी आपल्या मुलीला असहायपणे म्हणते -- बाळ ... हीच अखेर ... हा विशाल जीर्ण वटवृक्ष शेवटी आपल्याच भाराने उन्मळून पडला ... "

या नाटकामध्ये स्टॅलिनच्या वृत्तीचे शास्त्रज्ञाच्या पात्राद्वारे घडविलेले दर्शन अतिशय कलात्मक आहे आणि तेच जास्त सहानुभूतिपूर्ण व वास्तव आहे. त्याच्या कारकीर्दीतील हुकूमशाही, अधिकारीवृत्तीचेही नाटककाराने समर्थपणे चित्र रेखाटले आहे. या नाटकाचा विषय एवढा गंभीर असूनही नाटकाची गतिमानता कोठेही कमी झालेली नाही. १९५६ साली स्टॅलिनच्या स्वभावाचे हे वास्तव दर्शन स्वीकारण्याच्या मनस्थितीत रशियन राज्यकर्ते नसल्यामुळे या नाटकाकडे त्याचे दुर्लक्ष झाले असावे.

बोरीस पॅस्टरनॅक या रशियन लेखकाची ओळख आपणाला 'डॉ. झिव्हगो'ला नोबल प्राईज मिळाल्यानंतर झाली. परंतु निसर्गाशी तादात्म्य पावलेला एक कोमल हृदयाचा कवी म्हणून रशियाच्या सध्याच्या तरुण पिढीत, नव्या रक्ताच्या उदयोन्मुख कवींमध्ये त्यांचे काव्य अतिशय प्रसिद्ध आहे. या कवीच्या 'डॉ. झिव्हगो' बद्दल मतभेद असले तरी त्यांच्या काव्याबद्दल रशियात आजदेखील मोठ्या आदराने बोलले आणि लिहिले जाते. रशियात सध्या गाजत असलेले ॲन्ड्री वाझ्नेस्की हे कवी तर आपल्या कविता म्हणत असताना पॅस्टरनॅकच काव्यवाचन करीत असल्याचा भास होतो. अर्थात यात अनुकरणाचा भाग फारच थोडा आहे. ब्रिटिश वृत्तपत्रे ज्याचा उल्लेख Russia's angry young man of poetry (डेली मिरर) अथवा



जुन्याकडून नव्याकडे ... ऋुश्चेव्ह

# नवे पुनरुत्थान

रतनलाल भंडारी

Russia's rebel poet (संडे टाईम्स) असा करतात त्या इव्हॅन्कोवरही पॅस्टरनॅकच्या काव्याचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. रशियामध्ये आज प्रतिभेच्या विद्युत्शक्तीने भारलेली फार मोठी, समर्थ वाङमयीन पिढी प्रकाशात येऊ लागली आहे. त्यांच्याबद्दल पाश्चात्य टीकाकारांनी सोयीस्कर अशी मते बनविली, तरी आज रशियन जनतेला आपल्या कवींविषयी फार प्रेम आहे. फार आदर आहे. इव्हॅन्कोच्या पुस्तकाच्या १००००० प्रती पुस्तक प्रसिद्ध झाल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आतच खपल्या. वॉझ्नेस्कीच्या नव्या कवितेच्या पुस्तकाच्या (The Triangular Pear) प्रसिद्धीपूर्वीचीच नोंदविलेली मागणी १००००० प्रतींची आहे. हे आकडे पाहिले म्हणजे रशियन जनतेत असलेली वाङमयाची आवड आपल्या ध्यानात येते. या कवींच्या एका सम्मेलनाचे वर्णन कु. पेट्रिका ब्लॅक यांनी केले आहे. त्या लिहितात --

" This poetry reading was one of a series of six I attended in public auditorium at Moscow Polytechnic Museum. These began at S. P. M. and with brief intermissions lasted until midnight. " (Encounter, April 63.)

ही सर्व माहिती देण्याचे प्रयोजन असे की हे सर्व कवी हे सध्याच्या राजवटीला आव्हान करणारे, रुद्रावतार धारण केलेले (Angry Young Man) कवी आहेत असा पाश्चात्य टीकाकारांचा दावा आहे. त्यांच्या एखाद्यादुसऱ्या कवितेवरून तसा संभ्रम होणे शक्य असले तरी त्यांची समग्र कविता (अर्थात इंग्रजीत अनुवादरूपाने प्रसिद्ध झालेली) वाचली असता तसे वाटत नाही. आपल्या काव्यावर असा आरोप करणारांना इव्हॅन्कोने पुढील शब्दात उत्तर दिले आहे.

" For a Soviet poet, it was an unwarranted insult. " (Soviet Literature No. 1. 63).

एका प्रश्नाला उत्तर देताना वॉझ्नेस्कीने म्हटले आहे,

" The main problem of contemporary literature is to look deep into man's mind, into the interior of

his soul ... communism comes through the heart and the heart belongs to the realm of poetry." (S. L. No. 12, 1963).

या कवीनी लिहिलेल्या सर्वच कविता दोषरहित आहेत असे नाही. परंतु त्या सर्वांमध्ये पॅस्टरनॅक आदीच्या मानवतावादाचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. अर्थात त्याचे विश्लेषण करीत असताना हा मानवतावाद वॉझ्नेस्कीने म्हटल्याप्रमाणे समाजसत्तावादाचा आत्मा आहे, असा या नव्या कवीचा विश्वास आहे. त्याची जीवनविषयक वृत्ती ही 'मातृभूमी' (Mother Land) या कवितेत म्हटल्याप्रमाणे आहे. या कवितेत कवी रॉबर्ट रोझदेस्टाव्हस्कॉय म्हणतात –

"And don't dare try
To persuade us stealthily
Adopting enigamatic poses—
"It's too early for you, lads
To understand all that..."
Early ?
"Better early, than late !...
we will no longer say :
some one is thinking for us.
we've found out
what that ... ends with.

### गाजावाजा झालेली 'वन् डे'

रशियन वाङ्मयीन जीवनात क्रांती घडविणारी अशी अलेक्झांडर सेल्झेनिस्टाय यांची "One day .." (S. L. No. 2 63) ही कादंबरी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. या कादबरीच्या लेखकाने स्वत: स्टॅलिनच्या काळात आठ वर्षे तुरुंगवास भोगलेला आहे. या लेखकाची ही पहिलीच कादंबरी आहे. ती रशियात प्रसिद्ध व्हावी म्हणून स्वत: क्रुश्चेव्हला पक्षाच्या वरिष्ठ गोटात झगडावे लागले असा दावा टीकाकारांचा आहे. या कादंबरीतील अनेक भागावर पक्षश्रेष्ठींचा आक्षेप होता. परंतु स्वत: क्रुश्चेव्हने या कादंबरीचे समर्थन करून ती संपूर्णपणे छापण्यास परवानगी दिली. या कादंबरीच्या प्रकाशनावरोबर रशियात एक नवे भीतिरहित वाङ्मयीन विश्व सुरू झाले आहे असा दावा टीकाकार करतात. या कादंबरीचे सपूर्ण परीक्षण करणे यामुळेच आवश्यक आहे. तिच्या वाङ्मयीन मूल्यांची तपासणी करण्यापूर्वी या कादंबरीची कथा थोडक्यात पाहू.

इव्हान नावाच्या एका कैद्याची ही कथा आहे. हा कैदी स्टॅलिनच्या कारकीर्दीत संशयावरून 'कॅम्प' मध्ये खितपत पडलेल्या अनेक कैद्यापैकी एक आहे. दोन दिवस जर्मनाच्या ताब्यात राहिल्यामुळे सशयावरून दहा वर्षांची शिक्षा झाली आहे. त्याच्या गजाआडच्या जीवनातील हा एक दिवस आहे. त्याच्या शिक्षेची आठ वर्षे सपलेली आहेत. आपल्या कैदेची मुदत सपण्याची तो वाट पाहत आहे. अशा ह्या नायकाची सगळी दिनचर्या जवळजवळ शंभर पानाच्या कादबरीत लेखकाने रंगविली आहे. भल्या पहाटे सुरू झालेली ही दिनचर्या रात्री सामसूम झाल्यावर संपते. त्या मधल्या काळातील त्याचे निरनिराळ्या कैद्यांशी व अधिकाऱ्याशी झालेल्या बारीक सारीक बोलण्यापासून ते त्यांच्या घराकडच्या आठवणीपर्यंतचे अनेक प्रसग मुख्यत: संवादाच्या द्वारे रेखाटण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे.

'एका दिवसा' ची अशी ही थोडक्यात कथा आहे. या कादंबरीत कुठलाही समरप्रसंग नाही. फक्त जेव्हा हा इव्हान कामावरून परत येताना करवतीचा तुकडा चोरून आणतो तेव्हाच वाचकाची उत्कठा वाढीला लागते. तो प्रसंगही लेखकाने महत्त्वाचा म्हणून रंगविला आहे – असे नाही. त्याची तपासणी होते. कैद्यांच्या तपासणीत तपासनीस त्यांच्या जवळ आला असतानाच आधीच आंवलेले अधिकारी कैद्याना लवकर आत घेण्याची सूचना करतात आणि या कादंबरीचा नायक 'कोठडीत' जाण्यापासून बचावतो. या कादंबरीत सर्वच वर्णने अतिशय बारकाईने केलेली आढळतात. कैद्याचे सांकेतिक शब्द, त्यानी अधिकाऱ्याना ठेवलेली टोपण नावे व त्यांच्यातील आपसातील एकमेकांना वाचविण्याच्या प्रसगांची वर्णने लेखकाने 'पाहिले तसे लिहावे' या पद्धतीने केलेली आहेत. कॅमेऱ्याने एखाद्या तुरुगातील जीवनाचा वार्तापट काढावा तसा हा इव्हानच्या जीवनातील 'एका दिवसा' चा दु:खद वार्तापट आहे. त्यात नुसत्याच घटना घडतात आणि वाचकाच्या मनावर कुठलाही ठसा न उमटविता विरून जातात. कोठेही कादबरीला गतिमानता प्राप्त होत नाही. बारीक सारीक तपशील देण्याच्या प्रयत्नात कादबरीला कोठेच 'आशय' प्राप्त होत नाही. अभावानेच आढळणारी एकदोन स्थळे सोडली तर सवादलेखनातही कुठे लेखकाची चमक दिसत नाही. ते साधे असले तरी शैलीदार नाही. तुरुंगातील जीवनही जगातल्या कुठल्याही देशात आढळणाऱ्या बंदिस्त जीवनापेक्षा निराळे आहे असे वाटत नाही. या कादंबरीत कलात्मदृष्ट्या काही वैशिष्ट्य आहे असा दावा वाङ्मयीन टीकाकाराला करता येणे अवघड आहे.

या कादंबरीच्या रशियन टीकाकारांचे काही विचार आपण तपासून पाहू. या कादबरीविषयी अलेक्सी कोण्डाराव्हिच म्हणतात–

"The secret of One Day is that while the story reveals the hard camp life, it is full of optimism." (सोविएट लिटरेचर नं. ४, ६३)

वरील परीक्षणकर्त्याला या कादंबरीत आढळलेला हा आशावाद मला मात्र कुठेच दिसला नाही. उलट एक प्रकारच्या अलिप्त पद्धतीने कादबरीची रचना करण्यात आली आहे. इरेनवर्गच्या ज्या निराशावादावर क्रुश्चेव्हने कोरडे ओढले आहेत तोच इथेही आढळून येतो. दहा वर्षांच्या शिक्षेच्या पूर्ततेनंतर आपल्या बायकोसमवेत नवे जीवन समर्थपणे जगण्याची नायकाला इच्छा नाही. आपल्या भावी आयुष्याविषयी तो उदास आहे. त्याचे वर्णन खुद्द लेखकानेच पुढीलप्रमाणे केले आहे –

"Now he didn't know himself whether he wanted freedom or not. At first he'd longed for it. Every night he'd counted how many days of his stretch had passed, how many were left. And then he grew bored with counting." (पृ. ९३)

लेखकाच्या कुठल्याही पात्रामध्ये आपल्यावर हुकूमशहाच्या अन्यायाविरुद्ध चीड नाही. परिस्थिती वदलण्याची स्पृहा नाही. सगळे कैदी बेडकाच्या गोष्टीतल्या करकोचाच्या अंमलाखालील प्रजेसारखे वागत असतात. त्यांच्या मनात जळत असलेल्या त्वेषाला लेखकाने कुठेच आकार प्राप्त करून दिला नाही. त्या सर्वांच्या वृत्ती या

'ठेविले अनंते तैसेचि राहावे' अशा भाराच्या आहेत. फक्त एके ठिकाणी सिझर नावाचा, चित्रपट पडद्यावर येण्यापूर्वीच पकडला गेलेला दिग्दर्शक म्हणतो, तेही चर्चेच्या ओघात–

"Geniuses don't adjust their interpretation to suit the taste of tyrants."

या कादंबरीच्या प्रकाशनासाठी झटणारे व कदाचित् त्यामुळेच स्वतःच्या संपादकत्वाला मुकणारे 'नवे जग' (Nory mir) या रशियन मासिकाचे संपादक आलेक्झांडर ताव्होडास्काय म्हणतात–

"It is an undoubted achievement of the author that this grief and pain have nothing in common with feeling of hopeless depression." (या कादंबरीच्या प्रथम प्रसिद्धीवेळी त्यांनी लिहिलेली प्रस्तावना.)

अशा पद्धतीने या कादंबरीचे रशियात आणि जगात सर्वत्र वाजवी कौतुक होत असले तरी ती श्रेष्ठ दर्जाची कलाकृती आहे असे म्हणता येणार नाही. टीकाकारांनी जरी उदार दृष्टिकोन स्वीकारला तरी तिला 'एक बऱ्यापैकी कादंबरी' या पलीकडे अधिक नावाजण्यासारखे काही नाही. या कादंबरीतील वर्णने रेखीव आहेत. निरीक्षणामध्ये बारकावा आहे. अधूनमधून विनोदाची झाकही आहे. हे सगळे कबूल. पण समाजवादी वास्तववादाचा स्थायीभाव जो आशावाद, त्याचा मात्र यात पत्ता नाही.

वरील परीक्षणात रशियन टीकाकारांच्या मतांचा मी मुद्दाम उल्लेख केला आहे. पाश्चात्य टीकाकाराना, राजकीय दृष्टचा काही निराळे इतके उघडपणे लिहिले गेल्याचे आणि प्रसिद्ध झाल्याचे पाहून या कादंबरीचा 'उदो उदो' करणे भागच होते. या कादंबरीविषयी प्रसिद्ध टीकाकार वर्स्टन रुबीन म्हणतात–

"Never before, however, have the Soviet people been told these things in point and for this the publication of 'One Day...' was received as an event of literary and political significance; both inside and of the Soviet Union." (सर्व्हे, एप्रिल ६३)

कदाचित् या कादंबरीवर उधळल्या जाणाऱ्या स्तुतिसुमनांची गोम यातच असेल. तरीसुद्धा एक गोष्ट मात्र निश्चित, या कादंबरीच्या प्रकाशनामुळे सरकारी कोडकौतुकामुळे इव्हान्कोसारख्या लेखकाला निदान यापुढे तरी स्टॅलिनचे भूत जागृत होण्याची भीती बाळगण्याचे कारण नाही. तो म्हणतो–

"Double and triple the guard at his grave so that Stalin will not rise, and with Stalin—the past."

इव्हेंन्कोची ही भीती आता नष्ट होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. रशियन वाङ्मयीन विश्वात सुरू असलेल्या या नव्या 'पुनरुत्थाना'मुळे एखादा नवा टॉलस्टॉय, चेकॉफ अथवा गॉर्की या नव्या क्रांतीच्या गर्भात वाढत असेल अशी अपेक्षा बाळगण्यास हरकत नाही.

### स्टॅलिनविरोधाचा अतिरेक

वरील वाङमयीन कलाकृतींची ओझरती ओळख करून घेऊन आपण रशियांतील उल्लेखिलेल्या पुनरुत्थानाचे स्वरूप पाहू या. रशियातील वाङमयीन 'पुनरुत्थान' असे म्हणत असताना या पुनरुत्थानाचा स्टॅलिनच्या काळातील वाङमयाचाच संबंध आहे असे नव्हे तर क्रांतिपूर्व काळातील रशियन वाङमयातील सुवर्णयुगाशी त्याचा संबंध आहे. क्रांतिपूर्व काळातील चेकॉफ, टॉलस्टॉय डॉस्टाव्हस्की, पुष्कीन, गोगल आणि गॉर्कीसुद्धा सर्व रशियन लेखकांच्या वाङमयाचा मानवतावाद हा स्थायीभाव आहे. तसे बारकाईने पाहू गेल्यास समाजसत्तावादाचे तत्त्वज्ञान हे मानवतावादावरच आधारलेले नाही काय? समाजवादी वास्तवतावादाचा मानवतावाद हा एक मूलभूत महत्त्वाचा भाग आहे. नव्याने निर्माण होत असलेल्या वाङमयाची ही मानवतावाद हीच निष्ठा आहे. या मानवतावादाच्या

**जेव्हा क्रांतिकाल संपतो आणि शांतिकाल सुरू होतो – तेव्हा विलासही वाढतात ......**





Mother Russia has a new type of son, fashion designer Vadishlvv Michaelovitch, 24, who say his dresses are "design to show the riehness of our national costumes." Is there a touch of Western influence in his styles ? Well, Vadishav's nickname in the French press "le Saint-Laurent Rouge."



पायावरच नवा रशियन लेखक आपल्या वाङमयीन जीवनाची इमारत उभारू लागला आहे आणि म्हणूनच या मानवतावादाचे रशियन वाङमयात पुनरुत्थान सुरू झाले आहे असे म्हणणे वावगे होणार नाही या ठिकाणी मानवतावाद हा शब्द जास्त पारखून घेतला पाहिजे. रॉयिस्टाच्या ' मानवतावादा 'शी त्याचा काडीचाही संबंध नाही.

स्टॅलिनच्या काळात घडलेल्या घटनांचे स्वरूप असे होते की त्याच्या काळातील अन्यायामुळे प्रगल्भ प्रतिभेला ते आव्हानच ठरणे स्वाभाविकच होते. हुकूमशहाने महाकाव्याचेसुद्धा वैशिष्ट्य आहे. प्राचीन काळापासून जगातील सर्वच देशातील लेखकाना हे कथासूत्र सदैव मोहवीत आले आहे. अर्थात या विषयाचे आव्हान स्वीकारणारी प्रतिमाही दुर्मिळ चीज आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. विशेषत: त्या हुकूमशहाच्या काळात जन्माला येणारे वाङमय अनेक वेळा भावनाप्रधान होऊन त्या काळाविषयी त्या व्यक्तीविषयी व तिच्या कार्याविषयी वस्तुनिष्ठ दृष्टिकोन (objective) राखणे लेखकाला शक्य होत नाही. रशियन लेखकांना हे कथासूत्र या नव्या पुनरुत्थानात समर्थपणे हाताळता आले नाही. गेल्या दशकात निर्माण झालेल्या सर्वच वाङमयाचे ओझरते परीक्षण केले असताना रशियन लेखकांची प्रतिमा या आव्हानाला प्रतिसाद देऊ शकली नाही; ही गोष्ट जाणवल्याशिवाय राहत नाही. या कथासूत्रावरील कादंबऱ्या चढत्या क्रमाने निव्वळ चित्रणपद्धतीने (Photographically) हाताळल्या आहेत. इरेनबर्गची 'Thaw' दुदनेत्सावची Not By Bread Alone किंवा आपण वर परीक्षिलेली One Day ही कादंबरी याच प्रकारात मोडते.

हल्ली सुरू असलेल्या वादाचे मूळ हे स्टॅलिनच्या कर्तृत्वाचे योग्य मूल्यमापन न झाल्यामुळे अतिशय धारदार झाले आहे. हे मूल्यमापन न केल्यामुळे अनेक अपप्रवृत्ती समाजांत फोफावण्यास सुरुवात झाली नाही तरच नवल ! म्हणून ते मूल्यमापन करताना वस्तुनिष्ठतेच्या काटेकोर मर्यादा पाळणे आवश्यक होते. स्टॅलिनच्या प्रेतयात्रेच्या प्रसंगी ज्यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले ते पक्षाचे पुढारी 'नाटक' करीत होते का ? स्टॅलिनने रशियन राष्ट्राची आणि जागतिक समाजसत्तावादाची काहीच सेवा केली नाही का ? त्याची सर्वच कारकीर्द इतकी भयानक होती का ? या सर्व प्रश्नाची समर्पक उत्तरे देण्याचा प्रयत्न क्रुश्चेव्हने, पक्ष, सरकार आणि लेखक–कलाकाराच्या मेळाव्यांत केलेल्या भाषणांत केला आहे. तो म्हणतो–

"At Stalin's funeral many, including myself had tears in their eyes. These were sincere tears. Although we knew about some of Stalin's personal shortcomings, we loved him." (सोविएट लिटरेचर २, १९६३ पुरवणी)

स्टॅलिनच्या काळातील घटनाचे वर्णन करतांना तो म्हणतो–

"I can tell from my own experience, as a participent in the events in these years, which are some times painted in gloomy colours and dull shades, that those were bright happy years, years of struggle and victories of the trimph of communist ideas." (वरील अंकातील पुरवणी)

ही भूमिका वस्तुतः वास्तववादी आहे. परंतु स्टॅलिनच्या काळातील वृत्ती या रशियन समाजातील व पक्षातील उच्चपदस्थांच्या हाडीमाशी खिळलेल्या असल्यामुळे त्यांच्यावर निर्घृण हल्ला चढविणे क्रमप्राप्तच होते. त्यामुळे स्टॅलिनच्या काळातील यशस्वी गोष्टीवरही ( Achievments ) टीका सुरू झाली. कित्येकदा त्या घटना, यश अथवा गौरवशाली इतिहासाची पाने ही काळ्याकुट्ट रंगात रंगविली जाऊ लागली. स्टॅलिनग्राडच्या वैभवशाली रणसग्रामाचा ' वोल्गाचा लढा ' झाला. हा एकागी अभिनिवेश स्वत: क्रुश्चेव्ह आणि त्याच्या पक्षातील सहकारी या सर्वांमध्ये होता. त्याच्या कारकीर्दीतील गोष्टीवर चिखलफेक करणे हाच वादातील महत्त्वाचा भाग होऊन बसला. आता मात्र या टोकापासून परत फिरून वर निर्देशिल्याप्रमाणे हे नेते आणि जनता हळूहळू योग्य त्या दृष्टीने या काळाकडे पाहू लागली आहे.

**समाजवादी वास्तवतेची बैठक**

समाजवादी वास्तवतावाद ही रशियन कलेची मूलभूत निष्ठा आहे. या समाजवादी वास्तवता वादाच्या वर्तुळाच्या कक्षा या लवचीक असल्या तरी त्या लवचिकतेच्या मर्यादाही ठरलेल्या आहेत. रशियात सुरू असलेल्या या क्रांतिपर्वाचे अधिष्ठान हे या समाजवादी वास्तवतावादाच्या कक्षेच्या बाहेर नाही. हे या क्रांतीचे प्रणेते, इरेनबर्गसारखे लेखकही कबूल करतात. नवविचारांचे वादळ सुरू झाले तरीही बैठक बदललेली नाही आणि माझ्या मते ती बदलण्याचीही आवश्यकता नाही. कारण ती जर बदलली तर निराशावादाचेच नव्हे तर अलिप्तवादाचे भूत जन्माला येणार आहे. त्याचे उदाहरण अलेक्झाडर वोल्पीन या नव्या कवीच्या न्यूयॉर्कमध्ये प्रसिद्ध झालेल्या 'वसतपुष्पा 'सारख्या (Spring Leef) कवितासंग्रहात पाहावयास मिळते. कवी म्हणतो–

"I don't know why I live
And what I want from the beasts.
In vicious Moscow caged."

परंतु या प्रवृत्ती मोठया प्रमाणावर वाढू लागल्या. इरेनबर्गसारखे गाजलेले लेखकही कलेच्या क्षेत्रात ' सहजीवना'ची भाषा बोलू लागले. एका जुन्या लेखकाने म्हटल्याप्रमाणे हे नवे बुद्धिवादी जरुरीपेक्षा अधिक दोन पावले पुढे गेले आहेत. आता त्यानी एक पाऊल मागे येणे आवश्यक झाले आहे. त्यामुळेच रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या पुढाऱ्यानी व क्रुश्चेव्हने या प्रवृत्तीवर उघड हल्ला चढविला. कलेच्या क्षेत्रात 'सहजीवना'ची तत्त्वे अंगीकारण्याची ' विनंती ' करणाराना त्याने सांगितले,

Art belongs to the sphere of ideology ..The peaceful co-existence in the field of ideology is treason to Marxism –Leninism, betrayal of cause of workers and peasents."

नवचित्रकाराच्या कलाकृती पाहून त्याने उद्‌गार काढले;

"Such 'art' is alien to our people, they reject it... It is hard to say whether they have been drawn by hand of man or painted by donky's tail."

नव्या सगीताविषयी तो म्हणाला–

"Music without melody gives rise to nothing but irritation."

याच त्याच्या खळबळजनक भाषणात या ' नव ' कलाप्रकारांचा भ्रूणकला (Stillborn art) म्हणून निषेध केला आहे. त्याने

वास्तुशास्त्र व चित्रपट व्यवसायातील या प्रवृत्तीवर कोरडे ओढले आहेत. काही ठिकाणी ग्राम्य भाषेत टिंगलही केली आहे. रशियन सरकार कलाकारावर व त्याच्या कलाकृतीवर लाखो रुपये खर्च करीत असते. तेव्हा असल्या 'नव' चाळ्याना रशियात उत्तेजन मिळणार नाही हे क्रुश्चेव्हने स्पष्ट शब्दात सागितले आहे. अर्थात क्रुश्चेव्हच्या या ठाम धोरणामुळे रशियातील बुद्धिवादी विश्वात खळबळ माजणे स्वाभाविक होते. अनेक कलाकारानी त्याच्या धोरणावरील आपली बरीवाईट मते स्पष्टपणे क्रुश्चेव्हला कळविण्यात मागे-पुढे पाहिले नाही. त्यात इरेनबर्गसारखे गाजलेले लेखक, सोस्टाव्हिच सारखे संगीततज्ज्ञ आणि रोमासारखे दिग्दर्शकही आहेत. त्यानी स्पष्ट शब्दात कळविले की,

"Unless a variety of artistic trends can exist, art is doomed. We ask you to stop this return to past melody." (Encounter, April 1963)

या क्रुश्चेव्हच्या भाषणामुळे जगात सर्वत्र वैचारिक वादळ उठणे स्वाभाविक होते. रशियातील कलाचा विकास कोणत्या प्रकारे होणार हे या धोरणाने ठरणार आहे. याचाच अर्थ जागतिक कम्युनिस्ट चळवळीतील कलाकारांच्या कलाकृतीवरही त्याचा परिणाम होणार आहे म्हणूनच इटलीच्या कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. नोगलायात्ती यांनी क्रुश्चेव्हला बजावले की,

"No one may impose directions for the artist. Nobody, no matter how capable and shrewd he may be, should attempt to tell an artist how to write a poem." (News week, 29 April 1963)

वरील सर्व चर्चेचा विचार केला असताना, रशियातील नव्या ऊर्मीचा सहानुभूतीने विचार केला असतानासुद्धा, रशियातील घडामोडीचा एक निरीक्षक म्हणून तात्त्विक दृष्ट्या क्रुश्चेव्हची भूमिका (त्यातला ग्राम्यपणा वगळून) विशेषत: नवकलेविषयीची – चुकीची आहे असे मला वाटत नाही. कारण हल्ली चालू असलेले प्रत्येक कलाकृतीचे मूल्यमापन हे कलाकृतीच्या कलामूल्याच्या कसोटीवर चालू नसून सध्याच्या राजकीय परिस्थितीच्या सान्निध्यात केले जात आहे. हल्ली निर्माण होत असलेल्या कलाकृतीवर स्टॅलिनच्या काळाची गडद छाया पडलेली आहे. अर्थात एवढे मोठे बदल जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत होत असतांना हें स्वाभाविकही आहे. परतु आज अशा अनेक कलाकृती रशियन लेखक आणि कलाकार निर्माण करीत आहेत की त्याचे कलाकृती म्हणून मूल्यमापन केले असता त्याचे श्रेष्ठत्व, त्यामधील नावीन्य नजरेत भरल्याशिवाय राहत नाही ('माणूस'च्या जून अकांतील रशियन लेखकाची कथा अवश्य पाहावी.)

सध्याच्या पाश्चिम टीकाकाराच्या नजरेतून या कलाकृती त्यांना राजकीय मूल्य नसल्यामुळे वगळल्या जात आहेत. किंवहुना मुद्दामच या कलाकृतीकडे दुर्लक्ष केले जात आहे; असे म्हणणे वावगे होणार नाही. शेवटी एका रशियन कवीच्या भाषेत सागावयाचे म्हणजे –

"When the fog lifts
How brilliant it is
How rare!"

—Andry Vornescsky

• • •

## एक खटका....एक फटका

रशियन साहित्यिक व कलाकार आणि पक्षाचे–सरकारचे नेते यांच्या मेळाव्यात बोलत असताना प्रसिद्ध रशियन कवी इव्हॅन्को म्हणाले, "नेझ्वेस्टीने हे जेव्हा युद्धावरून परत आले तेव्हा त्यांच्या शरिरावर बदुकीच्या गोळ्यांच्या चौदा खुणा होत्या. मी आशा करतो, की ते अनेक वर्षे जिवंत राहतील. आणि आपल्या प्रगत शिल्पशास्त्राच्या कलेची सेवा करतील. (नेझ्वेस्टीने हे प्रगत नवशिल्पशास्त्राचे एक प्रणेते मानले जातात.) आणि हा कुबडा कलाकार भावी आयुष्यांत आपल्या कलातेजाने उजळून निघेल."

"कुबडा......कविमहाराज, कुबड्याला आपल्या थडग्यातच "सरळ" जीवन जगता येते." –क्रुश्चेव्ह म्हणाले.

"महाशय, माणसाला सरळ करण्यासाठी थडग्याचा उपयोग करण्याचे दिवस निघून गेले आहेत असे मी मानतो. तो भूतकाळ होता, भविष्य काळ तसा निश्चितच असणार नाही." –इव्हॅन्को.

# राजतरंगिणीची वाटणी

कल्हणाचा राजतरंगिणी हा संस्कृत ग्रंथ इतिहासप्रसिद्ध आहे. हा मूळ ग्रंथ एकत्र अवस्थेत केशवराम नावाच्या काश्मिरी पंडिताजवळ होता. केशवरामला तीन मुलगे होते. केशवरामच्या मृत्यूनंतर त्याच्या संपत्तीची वाटणी झाली, तशीच या ग्रंथाची झाली. प्रत्येक मुलाने एक एक भाग उचलला. (नशीब, केशवरामची बायको अल्हपुत्रा नव्हती.)

एका म्हणजे फक्त तिसऱ्या भागाचा शोध काश्मिरांत एका इंग्रज माणसाला योगायोगाने लागला. त्यावरून इतर दोन्ही भागांचे संशोधन सुरू झाले व मग हा ग्रंथ पुन: एकत्र झाला.

# समीक्षा

## एक जमलेली मैफल

चतुरंगरेखा हे श्री. गोपाळ कृष्ण भोबे यांचे पहिले पुस्तक. साहित्याच्या दरबारात या चतुरंग माणसाने सुरवातीलाच असा जबरदस्त " सा " लावला की, रसिकांना हा कलाकार मैफल रंगविणार याची खात्री वाटली. आणि त्यांच्या " आलापाने " तर त्याच्यावर आत्मविश्वासाने शिक्कामोर्तब केले.

संगीत आणि संगीतकार यावर मराठीत रसिकतेने आणि अधिकाराने लिहिणारे लेखक एका हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढेच आहेत. श्री. ना. सी. फडके, प्रा. मंगळूरकर, पु. ल. देशपांडे, केशवराव भोळे ही त्यातील मोठी नावे. चतुरंगरेखा वाचल्यानंतर या मातबरांच्या पंक्तीत मी श्री. भोबे यांची गणना करू लागलो होतो आणि आता त्यांचे आलाप पुस्तक वाचल्यावर त्याविषयी माझ्या मनात मुळीच शंका राहिलेली नाही.

श्री. भोबे हे स्वतःच एक बहुगुणी आणि बहुरंगी व्यक्तिमत्त्वाचे असामी आहेत. गायन, चित्रकला, साहित्य, यांचें रसग्रहण आणि निर्मिती ते सहजतेने करतातच. शिवाय ते उत्तम स्वयंपाकतज्ज्ञही असल्याचे आलाप पुस्तकाच्या प्रस्तावनालेखातून कळून आले. आणखी काय काय गोष्टींवर त्यांचे प्रभुत्व आहे देव जाणे. जीवनातील सर्वांगांना डोळस रसिकतेने स्पर्श करण्याची सिद्धी हजारांत एखाद्यालाच साधते. अशा बहुरंगी माणसांबद्दल मनात एक अनाम कुतूहल जागते. श्री. भोबे हेही एक त्यांपैकीच !

श्री. भोबे यांनी ज्या व्यक्तिरेखा चितारल्या आहेत ( दोन्ही अर्थांनी शब्दरेखा, चित्ररेखा ) त्या व्यक्तींशी श्री. भोबे यांचा घनिष्ट संबंध आलेला आहे. " आलाप " च्या प्रत्येक पानातून हे जाणवते. सायास आणि अभ्यास यांच्या जोरावर ज्यांनी असाध्य ते साध्य करून नाव कमावले, अशांची व्यक्तिचित्रे श्री. भोब्यांनी अत्यंत आत्मीयतेने आणि तितक्याच संयमाने रंगविली आहेत. व्यक्तिचित्रांचा विषय झालेल्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वात ते भिजून अगदी चिंब झालेले आहेत. ओल्या वस्त्रासारखी त्यांच्या भावरतीने त्या त्या व्यक्तींच्या जीवनसर्वांगाला घट्ट मिठी मारली आहे आणि म्हणूनच ही व्यक्तिचित्रे तितकीच आर्द्र आणि रसाळ झाली आहेत.

आलापमधे एकूण सोळा व्यक्तिरेखा आहेत. त्यांतील दहा प्रसिद्ध संगीतकारांच्या आहेत. दोन गीतकारांच्या आहेत, दोन चित्रकारांच्या आहेत. एक मुद्रकाची आहे आणि एक साहित्यिकाची आहे. मौजचे श्री. विष्णुपंत भागवत आणि चित्रकार केतकर वगळल्यास बाकीच्या व्यक्ती थोड्या अधिक संगीताशी संबंधित आहेत.

भोबे हे बहुगुणी असले, ललितकलांतील जवळजवळ सर्वांनाच स्पर्शणारे असले तरीही संगीतावर त्यांचा विशेष जीव आहे. त्याखालोखाल चित्रकला, साहित्य आणि नंतर इतर असाच त्यांचा क्रम लावावा लागेल. तरीही हे त्यांचे डावे उजवे आईच्या दिलाचे आहे हे तितकेच निर्विवाद! संगीतावर लिहिताना अगदी बारीकसारीक तपशील ते देतात आणि संगीतातील परिभाषा अशी रसाळ करून वापरतात की एखाद्या पदार्थाची माहिती नसावी पण चवीने जिवाला चटका लावावा अशा तऱ्हेने. एखाद्या विषयांतील परिभाषा अनभिज्ञाला रसास्वाद घेतांना क्लिष्ट आणि कष्टप्रद होते पण भोब्यांची शैली त्या प्रमेयालाही रुचीस आणते. पं. रविशंकर यांच्यावरील लेखात ते म्हणतात --

" त्यांच्या सतारीच्या तारेवरील प्रत्येक आघातात जबरदस्त पिळदारपणा आहे, खर्जाच्या टणत्कारात ओतप्रोत आत्मविश्वास आहे. ते जेव्हा मंद्रसप्तकात स्वरविलास करतात तेव्हा एकेक स्वर गोलाकार होऊन बाहेर पडतो. आलापी पाकळी पाकळीने फुलत जाते. जोड त्याचे गुच्छ तयार करतो आणि द्रुत गतीत ते गुच्छ भराभर श्रोत्यांच्या अंगावर फेकले जातात. "

" सूरसिंगार, रबाब, सुरबहार, ह्या वाद्यांतला सौंदर्याचा थोडा थोडा अर्क म्हणजे ही सतार. आलापी आम्ही ध्रुपद अंगाने करतो. आलापी झाली की त्या पाठून विलंबतजोड, नंतर मध्यजोड त्यानंतर द्रुतजोड, अतिद्रुतजोड, लडी, लड-लपेटा, लडीझाला, साधाझाला, ठोकझाला, इत्यादी बारा अंगांनी आलापी पूर्ण झाल्याशिवाय तिला आलापी असे म्हणताच येत नाही. राहता राहिली साठमारी; काही शिष्ट श्रोते सोडले तर सामान्य रसिकाला ही साठमारीच विशेष आवडते. इतर कायद्यांच्या कक्षेत त्यांचे मन रमत नाही. अतिद्रुतलयींत आम्ही शिरलो की त्यात फक्त गंमत एवढाच भाग असतो. शास्त्राची सर्व बंधने ओलांडून आम्ही ही कक्षा गाठतो. "

अशा तऱ्हेच्या वर्णनातून परिभाषा जरी समजत नसली तरी आंतरमनाला आशय काय तो कळतो, गती जाणवते.

" गांधार धैवताचे प्रत्येक आंदोलन श्रोत्यांच्या काळजाचे पाणी करून टाकील. मंद्रसप्तकाच्या खर्जाशी हे दोघे जेव्हा खेळू लागतात तेव्हा तो नाद ऐकताना भरदार देहाचे दोन दशग्रंथी ब्राह्मण खर्जात ऋचा म्हणत असल्याचा भास होतो. "

पं. रविशंकर आणि अलिअकबर यांच्या जुगलबंदीचे वर्णन भोबे अशा समर्थ शब्दात करतात. भोब्यांच्या लिखाणातील अशी अनेक अवतरणे देता येतील की, जेथे माधुर्याला मधुरता प्राप्त झाली आहे, शृंगाराला सुरेखता आली आहे आणि तीही रूढी आणि औचित्य यांचा विनयभंग न करता.

भोबे हे मूळचे गोव्याचे. इतर अनेकांप्रमाणे नशीब अजमावण्यासाठी त्यांनी घर सोडले आणि मुंबई गाठली. त्यांच्या कलासक्त मनाला कला मिळविण्यासाठी वणवणावे लागले आणि त्यांच्या सौभाग्याने अनेक नामवंत कलाकारांशी त्यांचा संबंध जडला आणि तो इतका की, ते त्यांचे त्यांचे जिवलग स्नेही झाले. ह्या स्नेहाच्या नात्यात इतर सर्व नाती विरून गेली आणि म्हणूनच अनेकांनी आपली अंतःकरणे त्यांच्याजवळ उघडी केली. या बहुगुणी माणसाने त्यांच्या

**आलाप**
गोपाल कृष्ण भोबे
कैलास प्रकाशन,
पाच रुपये

जीवनातील सुवर्णकण अचूक टिपले आणि हा असा अलंकार तयार केला. भोवे हे श्रद्धाळु आहेत, तितकेच चिकित्सक आहेत. प्राजळ आहेत पण भावडे मुळीच नाहीत. तसेच त्याचे लिखाण आहे. त्यात तंत्राचा तपशील असला तरी सर्वसामान्य वाचकाला गागरवून टाकील असा परिभाषेचा फाफट पसारा नाही. त्यांच्या लिखाणाच्या वाचकाला त्या कलेची गोडी लागेल अशी खुमासदार जादू त्यांच्या लेखणीत आहे. ज्यांच्या ज्याच्याविषयी त्यानी लिहिले आहे ते फक्त त्यांच्या मोठेपणाबद्दल. दोषांबद्दल त्यानी मौन धरले. खवचट कोपरखळ्या किंवा चिमटे काढण्याचा त्यांचा पिंडच नाही. जो मोठेपणा ज्याना लाभला, तो लाभावयास, करावयास लागलेल्या तपाच्या पर्वताखाली त्यांचे काही कलंदर जीवन असेल तर ते गाडले गेलेले आहे. ते आपणाला दिसले नाही अशीच त्याची रसिक दृष्टी आणि म्हणून त्यांची ही आलापी हितगुजासारखी गोड आहे. कलावताचे जीवनगीतातील सम त्याना अचूक सापडली आहे आणि त्यानी ती पचविली आहे. लावलेल्या स्वराशी ते प्रामाणिक राहिले आहेत आणि तालाचे भानही त्यांनी राखले आहे. म्हणूनच ही सुरेल तालबद्ध मैफल जमली.

श्रीकृष्ण पोंक्षे

*

## अभिनंदन ! हेर पंडित

श्री. व्यं. न. कुलकर्णी यांनी जर्मनीमधल्या आपल्या दहा-बारा वर्षांच्या वास्तव्यात जर्मनीतील जीवनाचे सर्व पैलू जवळून पाहिले व त्यामुळे आश्चर्याचे, हर्षाचे, विस्मयाचे जे रोमांच त्यांनी अनुभवले त्याचे दर्शन या दोनशे पानी पुस्तकात त्यांनी वाचकास घडवले आहे. काही दिवस जर्मनीला धावती भेट देऊन लिहिलेल्या प्रवासवृत्तांताचे स्वरूप या पुस्तकाला नाही. श्री. कुलकर्णी पत्रकार म्हणून त्या देशात हातावर पोट घेऊन वावरले. त्या अनुषंगाने तिथल्या कुटुंबात, समाजात मिसळले आणि यामुळे त्याच्या लेखनाला जिव्हाळा, सूक्ष्म अवलोकन, आणि रंजकता हे सर्व गुण मोठ्या प्रमाणात प्राप्त झालेले आहेत. आक्सल स्प्रिंगर या प्रकाशकाची आणि त्यांच्या साम्राज्याची माहिती श्री. कुलकर्णी यानी 'माणूस'मधून या पूर्वीच 'माणूस'च्या वाचकाना सागितली आहे. हा लेखही या पुस्तकात समाविष्ट आहेच.

**रोमांच**
व्यं. न. कुलकर्णी
रोमांच प्रकाशन, सातारा
सहा रुपये

महायुद्धात जायबंदी होऊन शरपंजरी पडलेला जर्मनी केवळ दहापंधरा वर्षांच्या अवधीत कसा उभा राहिला, त्याचे आजचे भाग्यविधाते कोण आणि मुख्यत: या पुनरुत्थानात जर्मन माणसाची उद्योगप्रियता, अपार कष्टाचा ध्यास, या गोष्टी कशा कारणीभूत झाल्या याचा ठसा हे पुस्तक वाचीत असताना वाचकाच्या मनावर उमटतो. डॉ. आडनावर आणि प्रो. एरहार्ड याचा समग्र परिचय श्री. कुलकर्णी यांनी दिला आहे. याशिवाय जर्मन लोकाचे फुलांचे वेड, पुस्तकप्रेम, लोकगीतानी त्याच्या जीवनात मिळवलेले अढळ स्थान आणि हेर हिटलरविषयी आज जर्मनीत दिसून येणारा मतप्रवाह याविषयीही लेखकाने विस्तृतपणे ऊहापोह केलेला आहे.

'कलोनची कार्निवल', हिटलरच्या आता नष्ट केलेल्या 'बर्चेसगार्डन'चे त्यानी रेखाटलेले चित्रण आणि ओबर्‌ अमरगाव येथे दर दहा वर्षांनी सात सात हजार नटाद्वारे सादर होणारे आरती नाटच (पॅशन प्ले) या सर्वांची ओळख करून देताना श्री. कुलकर्णी इतके रंगून जातात की वाचकही भान विसरतो. जर्मन लोकगीताची वा गीताची लेखकाने केलेली रूपातरे सोपी आणि अर्थवाही आहेत. छायाचित्रे विपुल प्रमाणात दिलेली असल्यामुळे पुस्तकाचे आकर्षण खूपच वाढले आहे.

श्री. कुलकर्णी हे हाडाचे पत्रकार असल्यामुळे त्यानी प्रत्येक प्रकरण खुसखुशीत लिहिलेले असून, खेळकर भाषाशैलीच्या आश्रयाने भरपूर माहिती वाचकाच्या पदरात टाकलेली आहे. ते बारीक सारीक गोष्टी सहज टिपीत जातात. — एखाद्या शाकाहारी भोजनालयात पाटी असते — "प्रत्येक घास चावून खा ! पोटाला दात नसतात ! —" लेखकाच्या नजरेतून ती निसटत नाही. जर्मनांच्या पुष्पप्रेमाची माहिती सांगताना ते लिहितात — "गमत म्हणून एक नियम लक्षात ठेवा ! लाल रंगाची गुलाबाची फुल फक्त पत्नीला किंवा प्रेयसीला अर्पावयाची असतात........ एकदा एका भारतीय विद्यार्थ्याने प्रोफेसराच्या पत्नीला लाल गुलाब देऊन मोठीच मौज केली ! " डॉ. आडनावर याना आता जवळ जवळ ८७ वे वर्ष चालू आहे. ते पंतप्रधान झाल्यावर त्याना अनेक स्त्रियाची पत्रे येऊ लागली — "मी आपली सहधर्मचारिणी होऊ इच्छिते —" चिटणीसबाईंनी डॉक्टरसाहेबाना विचारले — "या पत्राचे काय करायचे ?" डॉ. आडनावर म्हणाले — "परस्पर अनाक्रमणकराराच्या फायलीत ही पत्रे ठेवीत चला — !" अशा कितीतरी गमती निवेदनाच्या ओघात श्री. कुलकर्णी वाचकाना सुनावतात आणि सर्व वाचन काही गप्पा सपाव्या तसे सपते.

श्री. कुलकर्णी यांनी जर्मनीला शिक्षणासाठी वा नोकरीसाठी जाऊ इच्छिणाऱ्या भारतीय तरुणासाठी एक खास प्रकरणच लिहिले आहे, ते जिज्ञासूनी अवश्य वाचावेच. परंतु हे सर्वच पुस्तक त्यांनी काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे कारण लेखकाने हे पुस्तक अस्सल मराठी दृष्टिकोनातूनच लिहिलेले असल्यामुळे त्यातील निरीक्षणे व निष्कर्ष बोधप्रद आहेत. श्री. कुलकर्णी यांनी इतके उपयुक्त पुस्तक लिहिल्याबद्दल त्याचे अभिनदन करतो.

जर्मन देशाविषयी, माणसाविषयी भारतीय जनतेला विशेष प्रेम वाटते. इंग्रजी साम्राज्यावर महान् सकट आणणारी शूर जमात म्हणून पारतंत्र्यात असताना तर जर्मनाविषयी विलक्षण जिव्हाळाच वाटे. याशिवाय त्या देशांतील विद्वानाचे सस्कृतप्रेम, मॅक्समुलरचा भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास, आर्यांविषयीचा अभिमान आणि स्वस्तिक या भारतीय शुभचिन्हाशी हेर हिटलरने जोडलेले नाते या सर्व गोष्टीचे खतपाणी या प्रेमाला भरपूर झालेले आहेच. यामुळेच श्री. कुलकर्णी याच्या या पुस्तकावर उड्या पडतील यात शंका नाही.

रा. म शास्त्री

• • •

नाट्य समीक्षा

# 'रंगायन'चे नवे रसायन

- खुर्च्या
- थीफ ! पोलिस !
- अजगर आणि गंधर्व

आमच्या प्रतिनिधीकडून

मुंबईच्या 'रंगायन' या संस्थेने पुणे येथील एम् इ. एस्. कॉलेजच्या नाट्यगृहात आपल्या तीन एकांकिका दि. ३०।३।६३ ला रात्री सादर केल्या. अनेक नाट्यरसिक वार्षिक वर्गणी रु. १० भरून आता 'रगायन'चे कायमचे समासद झालेले असल्यामुळे नाट्यगृहात रसिकाची भरपूर उपस्थिती होती. किंबहुना काहीतरी नवे पाहण्यासाठी उत्सुक असलेले चोखंदळ रसिक, टीकाकार, लेखक, नाट्यप्रेमी अशीच मंडळी प्रयोगाला हजर होती. पैसे मोजले आहेत तेव्हा ते वसूल करून देण्याची संपूर्ण जबाबदारी नाटककारांवर व नटावर सोडून थोडासा अपेक्षाभग होताच हुल्लड करणाऱ्या प्रेक्षकाची भीती म्हणूनच या प्रयोगांना नव्हती.

'खुर्च्या' ही युजीन आयनेस्को या रुमानियन लेखकाची व श्री. वृन्दावन दंडवते यानी अनुवाद केलेली एकांकिका आणि त्याचबरोबर श्री. विजय तेंडुलकर याच्या 'अजगर आणि गंधर्व' व 'थीफ ! पोलीस !' या दोन स्वतंत्र एकांकिका रंगायनने सादर केल्या.

वरीलपैकी 'थीफ ! पोलीस !' ही एकांकिका यापूर्वीच भारतीय विद्याभवनाच्या कलाकेंद्राने सहा वर्षांपूर्वी मुंबईत प्रथमच रसिकापुढे ठेवलेली होती. त्या वेळी तो प्रयोग मी पाहिलेला होता. त्यात प्रामुख्याने हास्यरसच असल्यामुळे व विद्याभवनने ती अत्यत सुबकपणे सादर केलेली असल्यामुळे त्या वेळी झालेला परिणाम अजूनही ताजा होता. प्रथमच हे सांगितले पाहिजे की, रगायनच्या प्रयोगापेक्षा विद्याभवनने केलेला प्रयोग अधिक उजवा होता व अधिक परिणामकारी होता. पुणे–मुंबई मार्गावरच्या एका आगगाडीच्या डब्यात घडणारा हा प्रसंग. एक बेकार तरुण, एक कम्युनिस्ट, एक श्रीमंत गृहस्थ, एक तरुण मुलगी, एक सोसायटी लेडी आणि एक म्हातारा त्या डब्यात असतात. त्या सोसायटी लेडीचा कठा चोरीस जातो. साखळी ओढली जाते. गार्डाने सुरू केलेल्या चौकशीत सर्व उतारूंची परस्पराशी जमलेली साखळी उघडी पडते. मुख्य म्हणजे कंठा आपण घातलाच नव्हता असे सोसायटी लेडी सागते. या एकांकिकेत तसा फारसा जीव नाही. परतु केवळ जागच्याजागी बसलेल्या उतारूनी आपली शरीरे हलवून गाडीचा वेग ध्वनित करणे व वेळोवेळी गाडीत बसणारे धक्के एकसमयावच्छेदे टिपणे हे जे आंगिक अभिनयाचे नावीन्य या एकांकिकेत होते त्यामुळे हा प्रयोग प्रेक्षकाची पकड घेतो. सहा वर्षांपूर्वी या नवीन 'माइम' प्रकाराचे प्रथम निवेदन करणे हे गमतीदार वाटले तरी आता ते कंटाळवाणे व फारसे रोचक वाटत नाही. विशेषत. 'खुर्च्या' सारखा अत्याधुनिक नाट्यप्रयोग प्रथम सादर केल्यानंतर तो प्रयोग पचवून प्रेक्षागारात शिल्लक उरलेल्या प्रेक्षकांना तर सूत्रधाराच्या बडबडीशी फारसे समरस होता येत नाही. या प्रयोगात पेन्शनराचे काम करणारे श्री विनायक पै हे पेन्शनर वाटत नव्हते. (लहान मुलाने पगडी घालावी व भाषण म्हणावे असा काहीतरी चमत्कारिक अभिनय ते करीत होते.) कम्युनिस्टाचे काम करणारे जया नाडकर्णी अति उत्साही वाटत होते. बेकार मुलाचे काम करणारे श्री. माधव वाटवे याच्यावर झालेला 'खुर्च्या'मधील जख्खड म्हाताऱ्याचा ताण ओसरलेला नव्हता. श्री. कमलाकर सारंग व श्री. अरविंद देशपांडे यानी अनुक्रमाने सूत्रधाराचे व गार्डाचे ही दोन्ही कामे मात्र उत्तम केली.

### बाई–ठेवलेली की खिडकीतली ?

'अजगर आणि गंधर्व' ही श्री. तेंडुलकराची प्रभावी एकांकिका. या एकांकिकेत पेशाने अकौंटंट असलेला एक शेठ आपल्या कित्येक वर्षांच्या जुन्या अंगवस्त्राला निरोप देतो. पैशाची अफरातफर केल्यामुळे बहुधा त्याला शिक्षा होणार असते. तो बायकोची व्यवस्था नीट करतो आणि ठेवलेल्या बाईच्या अंगावर फक्त पाचशे रुपये फेकतो. आयुष्यभर जे देऊन फक्त उतारवय सोबतीला ठेवले त्याची किंमत फक्त इतकीच ठरली हे पाहून त्या अंगवस्त्राचा जळफळाट होतो. शेठ स्वस्थ असतो. मिळेल तेवढे खावे आणि इतर वेळी अजगरासारखे मुर्दाडपणे सुस्त पडून राहावे हे त्याचे सूत्र असते. ही एकांकिका प्रयोगातही सर्वांत प्रभावी ठरली. मुळात श्री. तेंडुलकरांचे संवाद अत्यत नेटके आणि त्याची सौ. विजया खोटे व अरविंद देशपांडे यानी केलेली फेक अत्यत मोहक. त्यामुळे ही एकांकिका प्रेक्षकाच्या मनाला एकदम भिडली. शिवाय त्यात प्रयोगाच्या अर्थाने नवीनपणा नव्हता. नेपथ्य, प्रकाशयोजना, यात दोष काढायला जागा नव्हती. नाटक म्हटल्यानतर जे जे पुढे यावे अशी अपेक्षा असते ती मूक या प्रयोगाने मागवली. उत्कृष्ट अभिनय होता; रसनिर्मिती होती. श्री. अरविंद देशपांडे यानी रंगविलेला शेठ जसा तेंडुलकरांना अभिप्रेत होता तशाचा तसा होता. अजगरासारखा खाऊन तृप्त झालेला आणि मुर्दाडपणे अतर राखणारा. परतु सौ. विजया खोटे यानी साकार केलेली नायकीण ही मला खटकली ! नायकीण म्हणजे


नमके काय ? कलावंतीण ? ठेवलेली बाई ? कीं खिडकीच्या चौक-टीत तोंड रंगवून बसणारी बाजारी वेश्या ? सौ. विजया खोटे यांनी उभी केली ती बाजारी वेश्या. तिचे बसणे, उठणे, पदर सारखे करणे, शब्दोच्चार सगळे जसेच्या तसे त्यांनी बटबटीतपणे दाखविले. परंतु जी बाई महिना पाचशे रुपये घेऊन स्वतःच्या फ्लॅटमध्ये एकाच माणसाची रखेली म्हणून राहते. तिच्या बाबतीत मला असे वाटते की जे दाखवले गेले ते फारसे संभवत नाही ! या एकांकिकेत खटकले ते फक्त एवढेच. आणि म्हणूनच अभिनयात श्री. अरविंद देशपांडे यांनी सौ. खोटे यांच्यावर मात केली असेच म्हणावे लागेल.

### तऱ्हेवाईक 'खुर्च्या'

श्री. युजीन आयनेस्को यांच्या Chairs या एकांकिकेचा विचार थोडा विस्ताराने करावयाचा आहे. सर्वप्रथम हीच एकांकिका सादर केली गेली आहे आणि म्हणूनच तिचा विचार शेवटी करण्याचे ठरवले Theatre Arts च्या जुलै १९५८ च्या अंकात एकांकिकेचे श्री. डोनाल्ड वॉटसन यांनी केलेले इंग्रजी रूपांतर आहे. एक म्हाताऱ्या म्हणजे नव्वदी ओलांडलेल्या जोडप्याची ही दीर्घ शोकांतिका आहे. या जोडप्याव्यतिरिक्त या एकांकिकेत अनेक 'खुर्च्या' आहेत. दर्शनी रिकाम्या परंतु नाट्यछटेतील अदृश्य पात्राप्रमाणे अनेकजण त्यांवर बसलेले आहेत. ते बसलेले आहेत या कल्पनेने म्हातारा-म्हातारी अभिनय करीत आहेत. या दाखवलेल्या 'खुर्च्या'वर बसलेली सर्व माणसे प्रत्यक्ष दिसत नाहीत. त्यांचे अस्तित्व मात्र गृहीत आहे. या शरीरातीत अस्तित्वामुळे प्रेक्षकांचे सर्व लक्ष या जोडप्याच्या बोलण्या-कडेच केंद्रित राहते. श्री. आयनेस्को याने रंगभूमीवर एक नवीन प्रयोग म्हणून केवळ अशी योजना केलेली आहे काय ? इतर पात्रांच्या हालचालीमुळे मुख्य पात्रांच्या हालचालीवरील प्रेक्षकांचे लक्ष्य उडू नये म्हणूनच केवळ हा प्रयोग त्याने केला असेल काय ? हे जोडपे अखेर आत्महत्त्याच करते काय ? दोघे दोन खिडक्यांतून पाण्यात उड्या फेकतात, असे दाखवलेले आहे. उडी मारण्यापूर्वी मूळ एकांकिकेत म्हाताऱ्याच्या तोंडी खालील ओळी आहेत–

> And yet I would
> Have found it good
> That you and I
> As one might lie
> Each bone to bone
> Beneath one stone
> Our old flesh breeding
> The same worms feeding
> Moldering together......

या ओळींवरून हे जोडपे आत्महत्त्या करते असा तर्क करता येतो. यातील म्हाताऱ्याचा जीवनसंदेश सांगण्यासाठी जो वक्ता बोलाव-लेला असतो त्याच्या तोंडून शब्द उमटत नाही. तो बोलण्याचा प्रयत्न करतो. परंतु शब्द आतल्या आत गुरफटतात. आणि फक्त चमत्कारिक आवाज बाहेर फेकले जातात. शिवाय मध्येच रंगभूमीवरचा मधला दरवाजा उघडला जाऊन सम्राट (Emperor किंवा His Majesty) त्या जोडप्याच्या दारी येतो. याचे रूपान्तर 'महाराज' असे केले आहे. हा सम्राट म्हणजे कोण ? हा वक्ता म्हणजे या आयुष्याचा



हा अव्वल इंग्रजी रंगमंच रंगायननेही उभा केला होता.

अर्थ सांगण्याचा प्रयत्न करणारा तत्त्वज्ञानी काय ? यातील कशाचेच अर्थ मूळ एकांकिका वाचूनही मला स्पष्ट झाले नाहीत. श्री. वृंदावन दंडवते यांनी निदान या नाटकाच्या परिचयपरिच्छेदात हे अर्थ सादर करावयास हवे होते, असे मला वाटते. श्री. युजीन आयनेस्को हा एक 'बंडखोर' प्रयोगशील पंथाचा प्रमुख नाटककार आहे व ही एकां-किका 'तऱ्हेवाईक' आहे या माहितीपेक्षा नाटकाचा विषय स्पष्ट करून सांगितला असता तर बरे झाले असते. या इतर गोष्टी प्रेक्ष-कांच्या आपोआप ध्यानात आल्या नसत्या का ? हे मुद्दामच केलेले नाही की श्री. दंडवते यांनाही नेमका अर्थ प्रतीत झालेला नाही ? तसे म्हणवत नाही कारण खुर्चीत बसून लिहिणारा आणि खुर्चीत बसून पाहणारा यांच्या खुर्च्या एकाच रांगेत ठेवून कशा चालतील ? या एकांकिकेचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न करावयाचा तर सुप्रसिद्ध अमेरिकन लेखक विल्यम सारोयान, युजीन आयनेस्कोसंबंधी काय म्हणतो ते प्रथम पाहू––

### सारोयान सांगतो––

"युजीन आयनेस्कोची नाटके मला विस्मयात टाकतात, आनंद देतात, मनोरंजन करतात. त्याचबरोबर मनाला टोचणी लावतात आणि स्तिमितही करतात. हे नाट्यविषय त्याला सुचलेच कसे ? इतर नाटककार लिहितात त्याच पद्धतीने याने नाटके का लिहिली नाहीत––?

आयनेस्को हळूहळू हसवतो. त्यात विक्षिप्तपणाचे दुःख, पराजय आणि नैराश्य हे सर्व जाणवते. अर्थात जर काही जाणवलेच तर ! म्हणूनच हे हास्य उकळी फुटल्याप्रमाणे बाहेर पडत नाही. स्तिमित झालेल्या प्रेक्षकाच्या तोंडावर ते प्रतीत होते; आणि त्याचा आवाज बरगड्यांतच अडकून पडतो. कधी कधी तुम्ही खुदखुदून हसतादेखील. विशेषतः नाटक प्रत्यक्ष पाहताना. पण ते हसणे खरे नसते. इतर अशा प्रसंगी तुम्ही हसला असाल त्या वेळेचे हसणे आणि हे हसणे

एकच मात्र नसते. ज्याला तुम्ही हसता ती गोष्ट काही मजेशीर असतेच असे नाही. तरीही लोक हसतातच आणि हसण्यासाठी अमूकच कारण असावे असाही नियम नाही. स्वत: आयनेस्को याला लोकांनी हसावे असेच वाटते. खुशाल तुम्ही हसा पण नाटकगृहातून बाहेर पडल्यावर जे पाहिले ते विसरून जाण्याचा प्रयत्न करून पाहा! ते शक्य होत नाही.

यालाच कला म्हणतात. नवकला ती हीच !

सारोयानचे हे विचार 'खुर्च्या' या एकांकिकेला लावून पाहिले तर सारोयानचे म्हणणे यथार्थ वाटू लागते. या एकांकिकेतील जख्खड म्हातारे जोडपे जुन्या आठवणी उगाळते. त्यात अतिवृद्धावस्थेमुळे झालेला स्थलकालाचा संभ्रम, शारीरिक दौर्बल्यामुळे आलेले मनोदौर्बल्य, आपल्याला आता फारसे कुणी विचारीत नाही याचा विषाद, तरीही मीपणाला कवटाळून बसणारी ह्याची वृत्ती आणि एकदर मानवी जीवनाची विफलता हे सर्व वरवर निर्माण होणाऱ्या हास्यरसाच्या आवरणाखाली जाणवत राहतेच. एखाद्या लहान मुलाप्रमाणे म्हातारी म्हाताऱ्याला जवळ घेते, थोपटते; त्या वेळी ते दृश्य काही हास्यरस उत्पन्न करते ही गोष्ट खरी; परंतु त्याच वेळेला त्यांच्या जीवनात अखेर अखेर निर्माण झालेली पोकळी जाणवत राहते आणि त्या हसण्याला विषादाची किनार येऊन विलगते.

सारोयान युजीनच्या लिखाणाचा हेतु सांगतो तो मुळातूनच वाचावा—

" Beckett & Ionesco are not mad. They have discovered the means by which to reveal in acceptable & deeply moving terms, that the human race is mad, & that the world has been in an uncharted and unknown dimension of hopeless lunacy—

" Do they lack something ?

They do, but that is the price they have got to pay for what they don't lack which we have got to cherish."

" All the same they are the scientists among the playrights so far. "

मानव जात ही वेडी आहे आणि जग हे एक वेडयांचे इस्पितळ आहे; हे ठसवण्याकरिता जर आयनेस्कोचे नाटयलेखन असेल तर सार्त्रच्या तत्त्वज्ञानाची ही करॉलरीच म्हटली पाहिजे. सार्त्र म्हणतो, "प्रत्येक माणूस स्वतंत्र असतो. दुसऱ्याच्या भावविश्वात त्याला मज्जाव असतो. तो एकटाच असतो. स्नेह व प्रेम खऱ्याखुऱ्या अर्थाने त्याला लाभत नाहीत. जीवनाला फारसा आशय नाही. जीवन निराशेने भरलेले आहे. "

'खुर्च्या' या एकांकिकेत जो सम्राट दाखवलेला आहे, तो माणसाच्या अहंतेचे प्रतीक असावा. प्रत्येक पुरुषाला असे वाटत असते की, आपल्याला हे जीवन समजले आहे, त्यांत आपण नेता, सेनापती कुणीही होऊ शकलो असतो. गात्रे थकत जातात तो तो ही अहंता वाढीस लागते. आपल्या जीवनाची स्मरणी ओढीत तो असे भासवीत राहतो की, जगाला काहीतरी सांगण्यासारखे आपल्यापाशी जमा झाले आहे आणि मुख्य म्हणजे लोकाना ते ऐकण्याची उत्सुकता आहे. हे सर्व अर्थात त्याच्या कल्पनाविश्वातले खेळ असतात. या एकांकिकेत जी माणसे त्या रिकाम्या खुर्च्यातून मोठया आदराने बसवली जातात ती शिळोप्याच्या गप्पांच्याच लायकीची असतात. त्यांना कुणाच्या संदेशाची आवश्यकताही नसते. जे संदेश दिले जातात ते इतक्या सवंग रीतीने दिले जातात की, त्याना फारसा अर्थ नसतो. या नाटिकेतील त्या म्हाताऱ्याच्या वतीने बोलावलेला वक्ता मरामरा संदेश देतो. आणि त्याचा फोलपणा प्रेक्षकाच्या गळी उतरवतो. नुसते शब्द–शब्द. परंतु अंत:करणापासून काही सांगावे असे त्याच्याजवळ काहीही नसते.

इथेच हे प्रकरण संपत नाही. माणसाजवळ सांगण्यासारखे फारसे काही जमा होत नाही हे तर खरेच. परंतु त्याची बायको त्याच्याशी तडजोड करून घेते. पन्नास पन्नास वर्षे तीच गोष्ट पुन: पुन: ऐकते. त्याला धीर देते. पुन: उभा करते. वेळप्रसंगी आई होते. थोपटते. आणि ही जीवने अखेर फक्त सोबतच शोधतात. चिरंतन सोबत. फक्त सोबत आणि दुसरे काही नाही.

**मागच्या 'खुर्च्यां'तील जांभया !**

श्री. वृंदावन दडवते यानी रूपांतरात कितपत यश मिळवले हे सांगणे कठीण आहे, कारण त्या म्हाताऱ्या जोडप्याच्या संवादातील एक दशांश सवांदसुद्धा निम्म्याहून अधिक प्रेक्षकांना ऐकू येत नव्हते. एकतर दूरध्वनिक्षेपकाची रचना सदोष होती व दोन तरुण कलाकारानी वृद्धाची कामे केलेली असल्यामुळे त्यानी वृद्धत्वाचा आभास निर्माण करण्याकरिता काढलेले दंतविहीन उच्चार हे ही एक कारण होते. परंतु काही ऐकू येत नसूनही माफक टाळया वाजवून नापसती दर्शवण्यापलीकडे कुणी गडबड केली नाही. परिणाम इतकाच झाला की, पुढच्या काही 'खुर्च्या' प्रयोगात रंगून गेल्या असल्या तरी निम्म्याहून अधिक खुर्च्या 'आता पुरे बुवा' या विचाररसात बुडाला होता. सौ. विजया खोटे व माधव वाटवे या तरुण कलाकारांनी जख्खड म्हाताऱ्याची उभी केलेली नक्कल मात्र अस्सल होती. त्यांचे कौतुक करावे तितके थोडे होईल.

प्रयोग जवळजवळ ९॥ ला सुरू झाला व दोन मध्यंतरे मिळून जवळजवळ चाळीस मिनिटे विश्रांति जमेस धरून एकदर अडीच तासात संपला. अर्थात 'रंगायना'च्या या एकांकिकांनी प्रेक्षक फारसा खुलला नाही. फक्त काही नवीन पाहिल्याचे समाधान त्याला लाभले 'रंगायन'चीही तेवढीच अपेक्षा असावी !

• • •


# पांढरे डाग

पांढऱ्या कोडाचे अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसे व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवू. नकली वैद्यांपासून सावध राहावे.

**वैद्य बी. आर. बोरकर, आयुर्वेद भवन,**

मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)

# आदर्श व्यायाम कोणता ?

पु. ना. ओक

शुद्ध हवा, फळे, दूध, निद्रा, भोजन ही उत्तम प्रकृतीस म्हणजेच कायाकल्प व दीर्घायुष्यास जितकी महत्त्वाची आहेत तितकीच व्यायाम ही महत्त्वाची बाब आहे.

व्यायाम हा जीवनास अत्यंत आवश्यक असूनसुद्धा त्याबद्दल सामान्य लोकांच्या कल्पना अगदी चूक असलेल्या आढळून येतात. ह्याचे कारण असे की, व्यायामाची व्याख्या काय, त्याच्यापासून आपणास मुख्यत्वे काय साधायचे असते ह्यासंबंधी कोणीच त्यांना स्पष्ट कल्पना दिलेली नसते.

जन्मभर व्यायामाचा व्यवसाय करणाऱ्यांनासुद्धा व्यायामाची व्याख्या करण्यास सांगितले तर ते गोंधळून जातील. व्यायामाची *व्याख्या व उद्देश निश्चित केल्याशिवाय कोणता व्यायाम उत्तम व* तो उत्तम का हे सांगणे अशक्य होते.

## काही चुकीच्या समजुती

उत्तम व्यायामाच्या कसोट्या व उद्देश माहीत नसल्याने ज्या अनेक चुकीच्या समजुती प्रचलित आहेत त्यांपैकी एक अशी की कोणताही व्यायाम घ्यावा पण तो नियमित घ्यावा. सर्व व्यायाम सारखेच गुणकारी असल्याचे हे विधान वरवर पाहाणाऱ्यास सुद्धा तर्कशास्त्रास धरून नसल्याचे आढळून येईल. कारण सर्व व्यायाम म्हणजे धावणे, पोहणे, घोड्यावरील रपेट, सूर्यनमस्कार, जोरबैठका, डबलबार्स आदि सारखेच गुणकारी असणे शक्य नाही. तसे असते तर भाकरी, दूध, द्राक्षे ह्या सर्व वस्तू सारख्याच गुणधर्माच्या होत असे म्हणावे लागेल. शिवाय व्यायाम म्हणजे काय हा प्रश्न उरतोच.

पुरेसा घाम आला की व्यायाम झाला असे कोणी समजतात. परंतु 'पुरेसा' ह्याला काही प्रमाण नाही. दोन थेंब घाम गळला म्हणजे व्यायाम पुरेसा होईल, की दोन वाट्या भरतील एवढा घाम यावा? बर्फमय प्रदेशात कितीही मेहनत केली तरी घाम येणारच नाही, सहारा वाळवंटात व्यायाम न करताच सतत घाम गळत असतो, लठ्ठ माणसाला थोड्या श्रमाने घाम येईल, हिवताप झालेल्याला व्यायामाशिवायच घाम येतो म्हणून घाम ही व्यायामाची कसोटी मुळीच मानता येणार नाही.

इतर काही लोक म्हणतात की शरीराला थकवा आला की व्यायाम झाला असे समजावे. ह्यातही किती थकवा आला पाहिजे ह्याला काही प्रमाण नाही. आजारी माणसाला नुसते. उठून बसले तरी थकवा येतो. लठ्ठ माणूस लवकर थकतो. एक हात उच करून ठेवला तर अल्प वेळातच थकतो पण त्याने व्यायाम झाला असे म्हणता येणार नाही. म्हणजे थकवा हीसुद्धा व्यायामाची कसोटी नव्हे.

प्रत्येक अवयवाला स्वतंत्रपणे व्यायाम मिळाला पाहिजे असे काही जण अट्टाहासाने सागतात. पण व्यायाम म्हणजे काय ? हालवणे, हिसके देणे, की चोळणे हे त्यांना नेमकें माहीत नसते ह्यातच प्रथम त्याच्या प्रतिपादनातील मूल प्रमाद दिसतो. बाहू जोमदार करण्यास वजन उचलणे किंवा डबल बार्स, रोमन रिंग्ज इ., छाती रुंद करण्यासाठी चेस्ट एक्स्पांडर, पोटच्या मजबूत करण्यासाठी सायक्लिंग ही विचारसरणी बरोबर असली तर कानाने नीट ऐकू येण्यासाठी कान पिरगळणे, दृष्टी तीक्ष्ण करण्यासाठी डोळे चोळणे, नाक कार्यक्षम राहण्यासाठी नाक ओढणे असले प्रकार करावे लागतील.

आणि एक अवयव नेमका कोठे संपून दुसरा कोठे सुरू होतो *याला काही प्रमाण नाही.* उदाहरणार्थ बोटाचे एक एक पेर हा अवयव की बोट हा एक अवयव, की तळहात, की कोपरापर्यंतचा हात की खांद्यापर्यंतचा हात ? हाताला (बाहूला) निराळा व्यायाम पाहिजे म्हटले तर प्रत्येक बोटाला का नको ? ह्या सर्व अडचणीमुळे प्रत्येक अवयवाला निराळा व्यायाम हवा ही गोष्ट पटण्यासारखी नाही व शक्यही नाही. त्यातून इतर अडचणी उद्भवतील. कसा व्यायाम द्यावा, किती द्यावा, व्यायाम म्हणजे काय इ.

## आदर्श व्यायामाची व्याख्या

उत्तम व्यायाम कोणता हे ठरविण्यासाठी आपण प्रथम व्यायामाची व्याख्या करू. व्यायाम म्हणजे अन्नपचन घडवून आणण्यासाठी अंगीकारलेली शारीरिक हालचाल. हे ठरल्यावर मग उत्तम व्यायाम त्यालाच म्हणता येईल ज्याच्या योगे शरीरास कमीत कमी श्रम होऊन कमीत कमी वेळात जास्तीत जास्त अन्नपचन होईल. व्यायामाची ही व्याख्या कोणत्याही व्यक्तीला, पृथ्वीवरील कोठल्याही देशात, वाटेल त्या परिस्थितीत लागू पडण्यासारखी आहे. आता प्रश्न एवढाच उरतो की व्यायाम पुरेसा झाला असे केव्हा समजावे ? जेवढ्या व्यायामाने दररोज प्रातःकाळी उठताच घाई लागून पिवळसर ओशट मोठ्या लेंडक्यांच्या स्वरूपात मलविसर्जन होत राहील तेवढा व्यायाम घ्यावा. ह्यात अर्थातच हे गृहीत धरलेले आहे की आपला आहार, विहार, निद्रा इ. योग्य आणि आदर्श दर्जाचे आहे. एखाद्याला वरील आदर्श प्रकारचे मलविसर्जन होत नसेल तर त्याचा आहार, व्यायाम, निद्रा, दुग्धसेवन ह्यात कोठे चुकते आहे ते इतरत्र त्या त्या संबंधात केलेल्या विवेचनावरून तपासले पाहिजे.

झाडाचे जसे मूळ तसेच मानवाचे पोट. वृक्षाच्या शाखांना फळे, फुले येतात म्हणून कोणी माळी जर शाखांना पाणी व खत देऊ लागला तर फुले, फळे येण्याचे बाजूलाच राहून झाड मरून जाईल.

# लेखमाला व शास्त्रीय दृष्टी

श्री. पु ना. ओक यांची लेखमाला मध्यंतरीच्या उलटसुलट व साधकबाधक चर्चेच्या निमित्ताने स्थगित ठेवली होती हे वाचकाच्या ध्यानात असेलच. या व पुढील अंकांत लेखमालेचा राहिलेला भाग देऊन ती पूर्ण करण्याचे योजिले आहे.

अनेक चिकित्सक वाचकानी समक्ष भेटून किंवा पत्रद्वारे ही लेखमाला 'अशास्त्रीय' असल्याने 'माणूस'मधून प्रसिद्ध करण्यात येऊ नये अशी सूचना केली. या आत्मीय भावाने केलेल्या सूचनेबद्दल जरी आम्ही कृतज्ञ असलो तरी ती स्वीकारता येत नाही हेही नम्रपणे सांगणे अगत्याचे आहे.

आज जे जे पाश्चात्य ते ते 'शास्त्रीय' ही एक भ्रांत समजूत आपल्याकडे रूढ आहे. भारतातही शास्त्रीय ज्ञानाची एक परंपरा होती ही एक ऐतिहासिक वस्तुस्थिती आम्ही ध्यानातच घेत नाही. ही परंपरा पुढे खंडित झाली. अंधश्रद्धेचे साम्राज्य पसरले हेही खरेच आहे. पण ही अंधश्रद्धा नाहीशी करून भारतीय माणसाला पुन्हा शास्त्रीय ज्ञानदृष्टी प्राप्त करून देणे म्हणजे पाश्चात्य विद्येची केवळ पोपटपंची करणे नव्हे; तर त्याला त्याच्याजवळ असलेला पूर्वपरंपरेचा वारसा प्रथम दाखवणे, त्याचा आत्मविश्वास जागा करणे व नंतर हा वारसा अद्ययावत् उपपत्तीनी व साधनसामग्रींनी वृद्धिंगत करण्याची स्वतंत्र प्रेरणा त्याच्या ठायी निर्माण करणे, ही विज्ञानविकासाची – किंबहुना सर्वच विकासाची – प्रक्रिया आहे.

युरोपात चौदाव्या शतकात विज्ञानाचे युग सुरू झाले ते कसे ? युरोपचा जो प्राचीन ठेवा, युरोपचा जो बौद्धिक आत्मा– ग्रीकविद्या – तिच्या पुनरुज्जीवनामुळे युरोपात विज्ञानाचे नवे युग संचरले.

श्री. ओक यांच्या लेखमालेतील काही विधानांशी अनेकाचे मतभेद आहेत, आमचेही आहेत. पण आरोग्यासारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाची त्यानी जी प्राचीन भारतीय दृष्टिकोनातून मांडणी केली ती सध्याच्या अनुकरणाच्या जमान्यात वाचकांसमोर यावी या उद्देशाने ही लेखमाला 'माणूस'ने प्रसिद्ध केली. तिच्यातील प्रतिपादन आंधळपणाने कोणी स्वीकारावे असा 'माणूस'चा दृष्टिकोन नाही. त्यातील जो भाग शास्त्रीयतेच्या आधुनिक कसोट्यांवर टिकेल तेवढाच स्वीकारावा, जुने म्हणून टाकून देण्याची उथळ सुधारकी दृष्टी नको एवढाच 'माणूस'चा आग्रह आहे.

*या चर्चेत ज्यानी भाग घेतला त्या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो.*

संपादक

तसेच पोटातील अन्न पचविण्याच्या उद्देशाने व्यायाम न करता दंड व पोटऱ्याना बळकटी आणण्यासाठी घेतला तर शरीरास काही लाभ न होता आपायच होईल. झाडाचे अन्न, पाणी, हवा इ. मुळ्याकरवी व पानाकरवी शोषले जाते ते सर्व शाखाना योग्य प्रमाणात मिळते. तसेच मानवी पोटात अन्नपचन नीट होत राहण्याची आपण हमी घेतली तर सर्व अवयवाचे योग्य पोषण होत राहील. डबेल्स्, रोमन रिंग्ज् आदि पाश्चात्य व्यायामात पोट हे शरीराचे मूळ आहे हे विसरून अन्य अवयवावर फाजील ताण दिल्याने शरीरास कायमचा अपाय होतो.

योग्य व पुरेशा व्यायामाची वर दिलेली मलविसर्जनाची दैनंदिन कसोटी ही कोणत्याही आबालवृद्धास लागू पडेल. उदा. एरवी आदर्श प्रकृती असणारा माणूस आजारी पडला तर त्याचे मलविसर्जनाचे तंत्र हटकून बिघडते. त्याला मोठ्या पिवळसर ओशट लेंडक्यांच्या स्वरूपात घाई लागून शौचास होत नाही. म्हणून वरील व्यायामाची व्याख्या व कसोटी ही सार्व दृष्ट्या बिनचूक ठरतात.

शरीरास कमीत कमी (कष्ट) श्रम घडवून ज्या शारीरिक हालचालींनी पोटातील अन्न जास्तीत जास्त प्रमाणात व कमीत कमी वेळात पचेल तो व्यायाम उत्तम असे ठरवल्यावर प्रचलित व्यायाम पद्धतीपैकी कोणती ह्या कसोटीला उतरते ते पाहू. थोडक्या म्हणजे काही एका युक्तीने जर फक्त पोटाचीच घडी पाडणे व उलगडणे एवढेच करता आले तर तो सर्वात उत्तम व्यायाम ठरेल. कारण त्याने शरीराच्या इतर भागास श्रम न होता अन्न (हवा, पाणी) पचनद्वारा रक्त, मांस व इतर रसाचे पोषण मिळत राहील.

परंतु पोट हलवण्यास शरीराचे इतर भाग काही प्रमाणात तरी हालवणे भाग पडते म्हणून पोटाशिवाय अन्य अवयवाची आदर्श व्यायामात होणारी हालचाल ही (necessary evil) अटळ व निरुपयोगी बाब मानली पाहिजे. सूर्यनमस्कारांत हातापायांवर कमीत कमी भार व ताण पडून सुरवातीस व अखेर (प्रत्येक सूर्यनमस्कारात) अशी दोनदा पोटाची पूर्ण घडी व उकल ही क्रिया होत असल्याने पोटातील अन्न दाबाने घोटले जाऊन आत तयार झालेले रस आतड्या-आतड्यातून झिरपण्यास मदत होते.

मेंदूपासून कमरेपर्यंत असलेला पाठीचा कणा हा शरीराचा बुधावा आधारस्तंभ मानू या. आदर्श व्यायामाने हा पाठीचा कणा लवचीक राखावयाची काळजी घेतली तर शरीर लवचीक व चपल राहते. कणा वाकून, ताठरून निर्जीव होऊ देता कामा नये. सूर्यनमस्कार व मलखांब ह्यात पाठीच्या कण्याची आत व बाहेर (म्हणजे Concave of cnnvex) अशी कमान अनेक वेळा प्रमाणशीर व कमाल कमान होत असल्यानेही सूर्यनमस्कार व पाठीच्या कण्याचा लवचीकपणा राखण्याच्या दृष्टीने मलखांबाचा व्यायामही उत्तम ठरतो.

जोर (दंड) काढताना पोटाची आतल्या बाजूस (concave) थोडीशी कमान झालेली असते. जमिनीच्या सपाटीवर माणूस आला की पोट ताठ होते व वर पाहिले की ते मागे ताणले जाते (म्हणजे पाठीची कमान होते). सूर्यनमस्कारांत गुडघे न वाकवता गुडघ्यांना कपाळ लावल्याने आतल्या बाजूस (concave) पोटाची जी पूर्ण (दुमड) घडी होते ती जोर काढण्यात कधीच होत नाही. आणखी शिवाय मांड्या, पोटऱ्या आणि बाहू यांच्यावर शरीराचा भार लवकर लवकर व वारवार पडल्याने शरीर शिणते. म्हणजेच

शरिराची झीज जास्त व पचनाने भरपाईची व्यवस्था कमी असे व्यस्त प्रमाण पडते. बैठका काढण्याने पोटाची दुमड घडी न होता अर्धवट वसकी घडी होते म्हणून अन्नपचन नीट होत नाही व मांड्यांस श्रम फार पडल्याने शरिराची झीज जास्त होते. ह्यामुळे जोर-बैठका हा सूर्यनमस्काराहून फारच निकृष्ट व्यायाम होय. ह्याचे प्रत्यंतरही आयुष्यात आपणास दिसते ते असे की – शास्त्रोक्त सूर्यनमस्कार घालण्याऱ्या व्यक्तीचे पोट खपाटी, कांती सतेज व शरीर चपळ असते. दंडबैठकांचा व्यायाम घेणारी व्यक्ती बहुधा सुस्त, आळशी, लठ्ठ पोटाची, बोजड शरिराची व हातपाय कंसासारखे अमळ वाकलेले, कान फुगलेली अशी दिसते.

पाश्चात्य व्यायाम म्हणजे चेस्ट एक्स्पांडर्स्, डबलबार, सिंगलबार, रोमन रिंग्ज्, डंबेल्स् हे तर फार घातुक होत. कारण त्यात पोटातील अन्नपचनाकडे पूर्ण दुर्लक्ष करून स्नायू व नाड्या ताणताणून शरीर शिणवण्याशिवाय काहीच साध्य होत नाही. जिवंत शरीरातील नाड्या व स्नायू लवचीक राहतील तरच दुर्घायुष्य साध्य होते. कारण नाड्यांतून परिस्थितीप्रमाणे कमीअधिक रक्त वाहते व स्नायू कार्यव्यग्रतेने वरखाली होण्यासाठी लवचीक राखले पाहिजेत. एखादा रबराचा तुकडा नेहमी ताणत गेले तर त्याचा लवचिकपणा नष्ट होतो. तसेच शरिरातील नाड्या व स्नायू पाश्चात्य व्यायामांनी ताणताणून ताठर बनतात. ताबुताच्या कामटया जश्या ताठर असतात किंवा पाणी वाहून आणणारा लोखंडी नळ जसा निर्जीव असतो तद्वत् शरिरातील नाड्या व स्नायू ताठर व निर्जीव केल्याने वरून धाटदार वाटणारे शरीर आतून कुचकामी होते.

धावणे, पोहणे, फिरणे, घोड्यावरील रपेट, परेड, ड्रिल, पी. टी. व सर्व प्रकारचे पाश्चात्त्य व पूर्वीय खेळ ह्यांना मनोरंजनाची व वेळ घालवण्याची साधने म्हणून वाटल्यास महत्त्व द्यावे. पण आदर्श व्यायामाच्या कसोटीच्या दृष्टीने ती अगदी निकृष्ट प्रतीच्या व्यायामाच्या कक्षेत येतील.

शारीर स्वास्थ्य, शक्ती, उत्साह, तेज, अंगकांती, सुदृढता, कायाकल्प व दीर्घायुष्य ह्यांचा भरभक्कम पाया तयार करण्यासाठी घरी रोज प्रात:काळी पाऊण तास–एक तास सूर्यनमस्कार अवश्य घालावेत.

### श्रम आणि व्यायाम

व्यायाम म्हणजे श्रम नव्हेत. उलट व्यायाम म्हणजे विश्रांती म्हटल्याने विशेष वावगे होणार नाही. उठणे, चालणे, बसणे, बोलणे, ऊन, वारा, पाऊस इत्यादींनी शरिराची सतत झीज होत असते. ती झीज भरून काढण्याऐवजी व्यायामाबद्दल गैरसमजूत करून घेऊन व्यायामाच्या निमित्ताने शरिरास आणखी श्रमवणे म्हणजे शरिराचा ऱ्हास घडवणे होय. म्हणूनच आठ तास खाणीत किंवा बागेत श्रमणारे मजूर किंवा माळी हे घामट, राकट, काळे दिसतात. त्यांची प्रकृती उत्तम नसते. दिवसभर काबाडकष्ट करून श्रम करणाऱ्या व्यक्तीस फार व्यायाम होतो म्हणून त्यांनी निराळा व्यायाम घेण्याची जरुरी नाही असे सामान्य जन समजतात. ही त्यांची दिशाभूल होय. व्यायाम म्हणजे श्रम नव्हे याचे स्पष्ट आकलन त्यांना झालेले नसते. उत्तम व्यायाम घेणारा व म्हणून उत्तम प्रकृतीचा माणूस नेहमी चपळ, उजळ, नितळ त्वचेचा, चलाख, तेज:पुंज असाच दिसला पाहिजे. आपले शिपाई, सैनिक, माळी, मजूर हे सुस्त, अचपळ, थकलेले, काळे असे दिसतात. म्हणून दिवसभर शारीरिक श्रमाचे काम असो किंवा दुकानावर बसण्याचे काम असो प्रत्येकाने पहाटे पाऊण-एक तास सूर्यनमस्काराचा व्यायाम घेतलाच पाहिजे तरच योग्य मलविसर्जनाद्वारे शरिरातील घाणीचा निचरा होत जाऊन आत मल न साठल्याने शारीरयंत्र उत्तम चालेल. योग्य व्यायाम घेतल्याने अन्नपचन होत राहून शरिराची झीज भरून निघत राहील.

माळी, मजूर, शिपाई, सैनिक ह्यांना लोणी, फळे अशा पौष्टिक आहाराच्या अभावी तजेलदार व चपळ होणे आवश्यक आहे असे कोणी म्हणतील. ते सत्य आहे यात संशय नाही. परंतु नुसता पौष्टिक आहार घेत राहिले व तो योग्य व्यायामाच्या अभावी पचला नाही तरी व्यक्ती निर्बल व निरुत्साहीच दिसेल. श्रीमंत माणसांना भरपूर उत्तम आहार व पुष्कळ विश्रांती मिळूनही ते लठ्ठपोटे, आळशी व अल्पायुषी नाही का होत ?

### व्यायामाची वेळ

चोवीस तास शरीर कार्यक्षम राहावे म्हणून दिवसभराकरिता घ्यायचा तो सगळा व्यायाम पहाटेच घ्यावा. सायंकाळी किंवा अन्य वेळी खेळणे, फिरणे, पोहणे, इत्यादींस व्यायाम न समजता केवळ मनोरंजन म्हणून महत्त्व द्यावे.

पहाट हीच व्यायामास वेळ योग्य का ? असा प्रश्न उद्भवतो. पहाटे प्रातर्विधी व स्नानानंतर शरीर स्वच्छ, मोकळे व हलके झालेले असते. पहाटे थंडावा असतो. पृथ्वीवरील प्राण्यांस जीवपोषक प्रकाश देणारा सूर्य उगवत असतो. अशा वेळीच व्यायाम करणे योग्य.




अहो, मला बसायला जागा द्या ना !

घास तोंडात शिरताच अन्नपचनाच्या क्रियेस सुरवात होते. प्रथम चर्वणाने त्यात तोंडातील लाळ मिसळते. नंतर पोटात अन्न शिरले म्हणजे त्यात जठरातील पाचक रस मिसळतात व नंतर अन्नाचे पृथक्करण होऊ लागते. म्हणून ह्या सर्व क्रियांसाठी पोट रिक्त असतानाच पहाटे स्नायूंना व्यायाम देऊन अन्नगृहणासाठी सिद्ध करणे बरे. दुपारच्या भोजनाचे पचन तत्क्षणीच सुरू झालेले असल्याने दुपारचे अन्न सायंकाळच्या व्यायामाने पचवू पाहणे चूक होय. किंबहुना पोटात अन्न गेल्यावर व्यायाम न करणे बरे. म्हणून दिवसाचा सर्व व्यायाम पहाटेच घ्यावा.

व्यायाम किती घ्यावा ह्याची दैनंदिन कसोटी वर दिली आहे. ज्यायोगे शौचास पिवळसर ओशट मोठी लेंडकी घाई लागून होतील तेवढा व्यायाम घ्यावा. म्हणून प्रत्यक्ष किती सूर्यनमस्कार आपल्या प्रकृतीस योग्य होत हे प्रत्येकाचा आहार, शरीरधर्म (म्हणजे लठ्ठपणा, बारीकपणा, पचनशक्ती) इत्यादींवर अवलंबून राहील. सामान्यपणे असे म्हणता येईल की प्रकृतिमानाप्रमाणे अर्धा ते एक तास पहाटे सूर्यनमस्कार घालणे पुरेसे होईल.

व्यायामापूर्वी स्नान न करण्याची प्रथा अशास्त्रीय व घातुक होय. नाक जसे श्वासोच्छ्वास करते तसेच शरिराची कोट्यवधी छिद्रेही श्वासोच्छ्वास करीत असतात. रात्रीचा घाम किंवा शरिरातील अन्य रस व वायु ( Gas ), पांघरुणे, कपडे इत्यादींनी ती छिद्रे बुजल्यासारखी झालेली असतात. सकाळी शौचमुखमार्जनानंतर स्नान केल्याने शरीर स्वच्छ होऊन शरिरातील बारीक छिद्रे सूर्यप्रकाश आत घेण्यास व शरिरात नको असणारी द्रव्ये बाहेर सोडण्यास मोकळी होतात. म्हणून व्यायमापूर्वी स्नान अवश्य करावे. नाहीतर व्यायामापासून शरिरास पूर्ण लाभ होत नाही. व्यायामानंतर घाम आल्यास पुसून टाकावा किंवा थोडे थांबून मग पुन्हा स्नान करावे. परंतू मागून स्नान करावे लागेल म्हणून आधी न करणे म्हणजे भोजनोत्तर हात धुवायचेच असतात मग आधी कशाला धुवा असे म्हणण्यासारखे होय.

**व्यायामाचे खोटे समाधान**

शास्त्रोक्त सूर्यनमस्कार घालण्यानेच फायदा होतो. केवळ लोळून १२ किंवा अधिक सूर्यनमस्कार घालून काही लाभ न वाटल्याने लोक सूर्यनमस्काराच्या बाबतीत उदासीन व निराश होतात. शास्त्रोक्त नमस्कार घालणे सोपे नाही. परंतू एकदा नीट शिकून घालता येऊ लागल्यावर ते रोज घालणे कठीण नाही.

सूर्यनमस्कार शास्त्रोक्त घालणे जेवढे महत्त्वाचे तेवढेच ते पुरेशा प्रमाणात घालणे आवश्यक आहे. दूध पिणे उत्तम असे ठरल्यावर कोणी ते रोज एकच थेंब पिऊ म्हणेल तर त्याचा लाभ काय दिसणार ? तसेच १२ नमस्कार घालून काही विशेष लाभ होतो असे खोटे समाधान कोणी मानू नये. सूर्यनमस्कार निदान १०० ते ३०० रोज पहाटे प्रत्येकाने प्रातर्विधी व स्नान आटोपून घालावेत.

अशक्त, जर्जर किंवा वृद्ध झालेल्यांना २००–३०० सूर्यनमस्कार घालण्याची शक्ती नसेल तर दुसरे काही कमी श्रमाचे परंतू सर्वसाधारणपणे सूर्यनमस्कारासारखे परिणामकारक अन्य व्यायाम करून पाहावेत. असा एक व्यायाम म्हणजे पश्चिमोत्तानासनाचा. जमिनीवर ताठ बसून दोन्ही पाय एकमेकांस चिकटवून समोर ताठ पसरावेत. दोन्ही हातांनी पायांचे तळवे धरावेत व गुडघे न उचलता गुडघ्यांना कपाळ टेकवेल तितका वेळ टेकवून पुन्हा ताठ व्हावे. सूर्यनमस्काराप्रमाणेच हे १०० ते हजार-बाराशे वेळापर्यंत वाढवीत गेल्यास पोटदुख्या इ. अनेक प्रकारचे पोटाचे रोग बरे होतात. तसेच दळणाचा व्यायामही बरा आहे. बसल्या बसल्या पोटाची घडी व उकल होत असल्याने शरीरश्रम कमी पण पोटातील अन्नपचनास भरपूर वाव देणारे असे हे दोन व्यायाम आहेत. ह्यांपैकी पहिला अधिक चांगला.

कोणाचे वय कातीही असो पुन्हा तारुण्य, जोम, उत्साह, शक्ती ह्यांची प्राप्ती करून घ्यायची असल्यास, पांढरे केस झालेल्या व अन्य प्रकारांनी वृद्ध झालेल्या व्यक्तींनीही आहार, विहार, निद्रा, व्यायाम यांच्या बाबतीत वर सांगितलेले आदर्श आचरण अंगीकारावे. त्यांच्या शरीरयंत्रांतील एकही घटक कमी झालेला नसतो. वर्षानुवर्षांच्या हेळसांडीमुळे ते जीर्ण झालेले असते म्हणून ते उपवास, निःशेष मलविसर्जन, लोणी व फळांचा हलका, पाचक व शुद्ध आहार, कागदी लिंबू, योग्य निद्रा आणि सूर्यनमस्कारांचा भरपूर व्यायाम ह्यांनी घासून, पुसून, स्वच्छ करून, पुन्हा कार्यक्षम व तरुण करावे लागेल.

● ● ●


**न येथ शब्दांचे अवडंबर ।**
**अल्पमूल्ये मुक्तद्वार ।।**
**परि स्पर्धेमाजि स्पर्धा सुंदर ।**
**'प्रतिभा - विलास' ।।**

**प्रतिभा - विलास स्पर्धा, ९८९ सदाशिव, पुणे २**




फिल्म भारती कृत
नितीन बोस यांचा नाचरा बोस !

# नर्तकी

★



★

नंदा

★

: समीक्षक :
श्रीकांत रानडे
तुकाराम कोकजे

समाजकारण, राजकारण इत्यादी क्षेत्रांप्रमाणेच चित्रपटांच्या क्षेत्रातही काही विशिष्ट व्यक्तींच्या नावाबरोबर एक विशिष्ट कालखंड डोळ्यांसमोर येत असतो. याला अनुसरून 'नितीन बोस' यांचे नाव घेतले की, भारतीय चित्रपटांचे सुवर्णयुग आठवते [ १९३५ ते ४० ]. न्यू थिएटर्सची प्रभावी दीप्ती आणि प्रभातची तुतारी यांचे युग ! उच्च कोटीच्या दिग्दर्शकांनी एकमेकांवर मात करू पाहणारे चित्रपट तयार केले ते याच काळात. आणि याच काळात नितीन बोस यांची प्रतिभा व व्यक्तिमत्त्व बहराला आलेले होते.

नितीनबाबूंची प्रतिभा त्यापुढेही १९४८ पर्यंत बहरातच होती. 'चंडीदास' पासून, 'प्रेसिडेंट' ते 'मीलन' पर्यंत ते यशोमंदिराच्या पायऱ्या चढत गेले. पण 'मीलन' हाच त्यांचा शेवटचा पहिल्या दर्जाचा चित्रपट. तेथून ते पुन्हा खाली उतरू लागले. 'दीदार', 'वारीस' व 'गंगाजमना' या पायऱ्या उतरत उतरत आणखी एका खालच्या पायरीवर ते सध्या उतरलेले दिसतात. ही पायरी म्हणजे त्यांचा नवा चित्रपट 'नर्तकी'! याच्या खाली एखादी पायरी असण्याचा संभव आहे. परमेश्वरा यांना संभाळ !

'नर्तकी' चित्रपटाचा एक विशेष म्हणजे हा चित्रपट पाहताना आपण 'मराठी' चित्रपट पाहतो असे वाटते. म्हणजे निश्चित कोणता विषय लेखक हाताळू इच्छितो याचाही निश्चित पत्ता लागत नाही. निर्मल हा एक एका कॉलेजांतला प्राध्यापक. त्याला संगीताचीही आवड असते. तो बासरी वाजवतो. त्यासाठी तो लहान मुलांसाठी एक शाळा काढतो. ती पण शाळा कोणती ? तर 'गमभन' शिकविणारी प्राथमिक शाळा. एका कॉलेजातील एक प्राध्यापक एका गलिच्छ वस्तीत राहावयास जातो व फावल्या वेळात, एक प्राथमिक शाळा चालवतो व त्यात स्वतः 'अ आ इ ई' ही मुळाक्षरे शिकवतो ही कल्पना कशी वाटते ? या कल्पनेला म्हणतात ध्येयवाद. यावरून ही एका प्राध्यापकाच्या अर्थात तरुण–ध्येयवादावरील कथा आहे असे वाटले ना ? आता हे प्राध्यापकाचे काम रमेश देव करीत नाही कारण हा हिंदी चित्रपट आहे. बाकी मामला मराठी ध्येयवादाचा वाटतो की नाही ?

### २५ वर्षांपूर्वीचा 'माणूस'

चित्रपटाच्या विषयात काहीच नावीन्य नाही. नृत्य-गायनाने लोकांचे मनोरंजन करण्याचा पेशा असलेल्या एका तरुणीला इतर स्त्रियांसारखे राहावेसे वाटते. आणि समाज तसे करू देत नाही वगैरे...आता खरे म्हणजे स्त्रियांसारखे होण्यात काही मौज आहे का ? पण तिला आपले तसे वाटते. या विषयावरचा पहिला चित्रपट म्हणजे प्रभातचा 'माणूस.' व्ही. शांताराम यांच्या कारकीर्दीतला हा सर्वोत्कृष्ट चित्रपट. आता चित्रपटांची व अलीकडच्या 'साधना', 'नर्तकी' या चित्रपटांची तुलना केली तर काय आढळते ? 'माणूस' हा ६३ सालांतला आणि नंतरचे दोन्ही २५ वर्षांपूर्वीचे असावेत असे वाटते. कारण काय ? त्या विषयाच्या हाताळणीत दिग्दर्शकानी केलेली पुच्छप्रगती.

कथानक असे आहे – वर सांगितलेला बासरीवाला प्रोफेसर (सुनील दत्त) असतो. हा प्रोफेसर अलीकडच्या कॉलेजांतील 'प्रा.' सारखा निरुत्साही आणि चश्मा लावणारा नसून अति उत्साही आणि समाजोद्धाराच्या कल्पनेने ठासून भरलेला असतो. तो ज्या कॉलेजात असतो ते कॉलेज शेठ जमनादास (ओम प्रकाश) या कंजूष व धंदेवाईक धनिकाच्या आश्रयावर चालत असते. शेठ जमनादासला एक मुलगी (प्रीतिबाला) असते नि ती प्रोफेसरच्या एकतर्फी प्रेमात पडते. लक्ष्मी (नंदा) नावाची एक नर्तकी असते–तिला आपला धंदा सोडून शिकण्याची हौस असते. तिची आई तिला शिकू देत नसते. हे प्रोफेसरला कळते. आता प्रोफेसर

नाचणारणी राहतात तिथे का राहतो ? पण तो केव्हातरी बासरी वाजवतो तेव्हा त्याचे सूर प्रेमाच्या वेव्हलेंग्थवर सुटायचे म्हणजे... समजून घ्या झाले ! तो इतर पोरासोरांना शिकविण्याचे 'ध्येयवादी' काम अगोदर-पासून करीत असतोच. त्यात भर म्हणून 'लक्ष्मी' ची खास शिकवणी पत्करतो. शिकवणी करता करता लक्ष्मी व प्रोफेसर त्यांना स्वतःला व प्रेक्षकानाही नकळत प्रेमात पडतात. (प्रेक्षकांना हे आज ना उद्या प्रेमात पडणार याची पूर्वानुभवावरून खात्री असल्याने अपेक्षाभंग वगैरे काही होत नाही.) मग 'समाजके ठेकेदार' त्यांना विरोध करतात. शेठ जमनादास त्याला कॉलेजातून घालवून देऊ पाहतो. प्रोफेसर कुणाच्याही विरोधाला न जुमानता लक्ष्मीशी लग्न करायचे ठरवतो. शेवटी कॉलेजच्या मॅनेजिंग कमिटीच्या बैठकीत एक लेक्चर झोडतो नि त्याचा शेठ जमनादासवर अद्भुत परिणाम होऊन त्याचे हृदयपरिवर्तन होते. तेवढ्यात इकडे लक्ष्मीची आई येऊन लक्ष्मीला लग्नानंतर तिचे व प्रोफेसरचे जीवन असह्य होईल असे सांगते. आपल्यामुळे प्रोफेसरला त्रास होईल म्हणून ती आत्महत्त्या करायला जाते. पण ऐन वेळी प्रोफेसर तिला वाचवतो व शेवटी सर्वजण सुखी होतात. संपली गोष्ट काय म्हणता ? विस्कळीत आहे कथा ? त्याला आम्ही काय करणार ? आहे तशी सांगितली.

### मूठभर मिया हातभर दाढी

कथेच्या या मूठभर मियाँला हातभर दाढी लावली आहे. ही दाढी त्या मियाँला नीट न चिकटवल्यामुळे किंचित् धक्क्यानेही ती एकदम प्रेक्षकांच्या हातातच येते. त्यामुळे शेठ जमनादासचे विदूषकी चालणे काय— त्याच्या मुलीचे प्रोफेसरच्या प्रेमात पडणे काय—एका परीक्षेत दोन वेळा नापास होणारा म्हातारा दिसणारा विद्यार्थी काय-अनाकलनीय व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक प्रोफेसर वर्मा काय—सगळाच आनंद आहे. प्रेक्षकांच्या नशिबाने येता जाता 'कन्हैया' समोर बसून सुतकी चेहऱ्याने भजने म्हणणारी प्रोफेसरची एखादी मा नाही हे त्यातल्या त्यात सुदैव ! पण बाकीचा सारा भोंगळपणा पाहता या पात्राची भर असायला हवी होती. हा पैलू कसा काय सुटला याचे किंचित् आश्चर्यच वाटते.

नितीन बोस हे नाव उच्चारायला जितके नाजूक वाटते तितकेच नाजूक चित्रण ते आपल्या चित्रपटात पूर्वी करीत असत. बंगालच्या भावपूर्ण वातावरणात आणि न्यू थिएटर्सच्या परंपरेत ते तयार झालेले असल्याने त्यांचे पडद्यांवरचे विश्व हे पंजाबी 'भांगडा' नसून बंगाली 'भावविश्व' असे. पण अलीकडे आपला अगदीच 'बिमल रॉय' होऊ न देण्याच्या प्रयत्नात त्यांनी सगळाच खाक्या बदललेला दिसतोय. पण तिथही प्रमाण चुकल्याने 'गंगाजमना' केवळ एक सनसनाटी चित्रपट ठरला आणि 'नर्तकी' तर ओबडधोबडच झाला आहे. कुठल्याही प्रसंगावर त्यांची पकड बसलेली दिसत नाही. एका प्रसंगाचा दुसऱ्याशी संबंध तर नाहीच नाही. नितीन बोस स्वतः उत्कृष्ट छायाचित्रकार असल्यामुळे त्यांच्या शॉट्स घेण्याच्या पद्धतीमध्ये काहीतरी नवीन पाहायला मिळावे ही अपेक्षा पार फोल ठरविली आहे. छायाचित्रकार—दिग्दर्शक हा खरे तर अधिकच 'चित्रपटीय' वृत्तीचा असतो; कारण त्याला जगाकडे कॅमेऱ्याच्या भिंगातून पाहण्याची सवय झालेली असते. पण इथे उलटाच प्रकार दिसतो. छायाचित्रण हे या बोलपटाचे खास आकर्षण म्हटले पाहिजे. नाना पोंक्षे यांचे नाव बऱ्याच कालावधीनंतर छायाचित्रकार म्हणून झळकत आहे. ज्या काळात विद्युत्दीपांचा झगझगाट नव्हता त्या काळात त्यांनी उत्तम चित्रकार म्हणून नाव कमावले होते. नव्या तंत्रातही ते तितक्याच दर्जाने चमकत आहेत. कलादिग्दर्शकाने मात्र त्यांना साथ देण्याऐवजी त्यांच्या हालात थोडी मरच टाकली आहे.

### संकलनातला इनोद

बिमल रॉय यांनी संकलन म्हणजे तुकडे जोडणे एवढ्याच अर्थाने केल्यासारखे वाटते. या बाबतीतली गंमत सांगायची झाली तर नावेत बसून म्हटलेल्या दोन गाण्यांचे उदाहरण देता येईल. दोन्ही वेळा लाँग शॉट्समध्ये नाव नदीच्या पात्रातून जाताना दाखविली आहे व मिड्शॉट व क्लोजअप्मधील चित्रण 'बॅक प्रोजेक्शन' वापरून केले आहे. असे नेहमीच केले जाते. पण इथे मात्र एक विनोद केला आहे. त्यांनी केले काय की, नदीतून नाव चालल्याचा एकच १०० फुटांचा लाँग शॉटचा तुकडा घेऊन ठेवलाय आणि प्रथम त्यातले १०–१५ फूट, मग एक कडवे, मग मागच्याच्या पुढचे लाँग शॉटचे १०–१५ फूट, असे ४–५ वेळा जोडले आहे. त्यामुळे होते काय की, मधले कडवे होईपर्यंत नाव आपली होती तिथेच आहे ! कागदी होडीसारखी ! नायक तर वल्हेही मारीत असतो. मग नाव तिथेच कशी ! हे काही चित्रपटाचे फार मोठे वैगुण्य नव्हे, पण एक गंमत म्हणून सांगितले.

### भूमिका ठीक

सुनील दत्तांनी प्रोफेसरचे काम नेहमीप्रमाणे



पण मी खेळता खेळता केरच काढतो आहे न !

ओठ मुडपून बोलत आणि भूमिकेच्या आणि आपल्या अभिनयाच्या मर्यादेतच केले आहे. त्यांच्या कुवतीच्या मर्यादा पुन: एकदा स्पष्ट होतात. ताडमाड उंचीच्या सुनील दत्तांपुढे नंदा 'बेबी' वाटते. त्यांच्यापाशी नृत्यकौशल्य हौशी कलावंतासारखे असल्यामुळे त्या नर्तिकेच्या भूमिकेत 'फिट्' होत नाहीत. त्यामुळेच मद्रासचे विख्यात नृत्यदिग्दर्शक सोहनलाल वा दिग्दर्शक नितीन बोस नृत्यप्रसंगात प्राण भरू शकलेले नाहीत. अभिनय त्यांनी आपल्यापरीने केला आहे, पण भूमिकेच्या आडातच नाही तर पोहऱ्यात काय येणार ? दोष नंदाचा नाहीच. मनाची घालमेल तिच्या चेहऱ्यावर चांगली साकार होते.

मधुबालेसारखा चेहरा असणाऱ्या प्रीतिबाला या नवतारकेने (म्हणजे अगदीच 'नव' नाही. त्यांनी पूर्वी चिल्ड्रेन्स फिल्म सोसायटीच्या एकदोन चित्रपटांत काम केले आहे.) आशा निर्माण करण्याइतपत काम केले आहे. म्हणजे या तारकेला 'भविष्य' आहे. ते घडवणारा किंवा बरबाद करणारा कुणीतरी त्यांना भेटेलच. आगा आणि नाना पळशीकर यांच्यापैकी आगा यांची भूमिका केवळ विनोदीच आणि पळशीकरांची भूमिका मूळची गंभीर पण दिग्दर्शकाच्या हाताळणीने कॉमिक वाटणारी ! दोघांनीही आपापली कामे केली आहेत, म्हणजे 'केली आहेत' एवढेच. विशेष काही कशातच काही नाही. ओम्प्रकाश यांचा शेठ जमनादास डझन वर्षांपूर्वीच्या चित्रपटांतला 'खानदानी रईस' वाटतो. हे पात्र आजच्या चित्रपटात शोभणार नाही. त्याला काही पैलू पाडायला हवे होते.

रवि यांचे संगीत पुन्हा एकदा निराशा करते. दिग्दर्शकांनी गाणी घातली आहेत तीही प्रसंगाचा विचार न करता दर १२ मिनिटांना एक गाणे या हिशोबाने. त्यामुळे त्यातले उरलेसुरले स्वारस्यही निघून जाते. आता गाण्याचे एखादे उदाहरण द्यायचे झाले तरीही चित्रपटातल्या एकाही गाण्याच्या ओळी आठवत नाहीत यातच त्यांची यशस्विता वा अयशस्विता काय असेल ती दिसत नाही काय ? पार्श्वसंगीताच्या बाबतीत रवि अजून खूपच मागे आहेत. पार्श्वसंगीत देणे, गाणी देण्याहून कठीण असते हे त्यांनी समजून घ्यायला हवे आणि ते पडद्यावर दिसणाऱ्या प्रत्येक फ्रेमला मोजून मापून–सेकंदांचा हिशोब करून द्यायला हवे.

शेवटी...शेवटी सांगण्यासारखे आता आहे काय ? पण एक विचार...थोडा 'जनरल'च मनात डोकावतो. इतके दिवस आम्ही निर्माते–दिग्दर्शकांना मारे जोरात–'ध्येयवादी चित्रपट काढा' असा उपदेश करीत होतो. पण त्यांनी अलीकडे 'ध्येयवादाचे' धरण फोडून प्रेक्षकांचे पानशेत केले आहे. आमची स्थिति 'भीक नको पण कुत्रा आवर' अशी झाली आहे. आमचे पूर्वीचे शब्द आम्ही मागे घेतो !

• • •


एका नर्तकीला समाजात
मानाचे स्थान
मिळवून देणाऱ्या
धिरोदात्त प्रोफेसरची कथा


प्रमुख भूमिका :

* सुनिल दत्त
* नंदा
* नाना पळशीकर
* प्रीतिबाला
* आगा व
* ओम प्रकाश

पॅरेमाउंट पुणे

७ वा आठवडा

(लक्ष्मी चित्र प्रकाशन)



फिल्म भारती
कृत

न
र्त
की

दिग्दर्शक
* नितीन बोस

संगीत
* रवि

# तू सुखी राहा

'तू सुखी राहा' हा चित्रपट समीक्षकाला पेचात टाकणारा आहे. 'मानिनी' सारखा वरच्या दर्जाचा चित्रपट काढणाऱ्या निर्मात्याची नवी कलाकृती आणि रामचंद्र हिंगणे यांच्यासारख्या नव्या दम्याच्या लेखकाची कथा म्हणून चित्रपटाला जाण्यापूर्वी अपार कौतुक नि औत्सुक्य वाटत होते. पण दुर्दैवाने (आता हे नेहमीचेच झाले आहे म्हणा!) अपेक्षाभंगच पदरी आला.

चागल्या लघुकथेवरून चांगला चित्रपट तयार होऊ शकतो हे खरे आहे. ('मानिनी' या चित्रपटाने याच निर्मात्यांनी ते सिद्धही केले आहे) पण म्हणून प्रत्येक बऱ्या लघुकथेवर चित्रपट करता येईल असे जर कुणी सागू लागले तर त्याला 'तू सुखी राहा' दाखवावा म्हणजे त्यातला फोलपणा त्याला कळून येईल. लघुकथेवरून जसा चित्रपट होईलच असे नाही तसा कादंबरीवरूनही होईलच असेही नाही. कारण चित्रपटकथा हा प्रकार काही वेगळाच आहे. त्यामुळे लघुकथेवरून चित्रपटाची पटकथा तयार करतांना पटकथाकाराचे कसे हाल होतात व त्यामुळे कथेतला असेल नसेल तोही रस कसा निघून जातो ते या चित्रपटात पाहायला सापडते. मूळ लघुकथेत अनुभव असला तरी नावीन्य किती आहे ते सांगणे कठीणच. फारसे नाहीच. हे लघुकथेत चालले तरी चित्रपटात ते 'चाललेले' नाही.

### कथानक

खरे कथानक आहे थोडेच. एक बहीण (सुलोचना) असते. या वहिणीने आपल्या धाकटया भावाला बबनला (सूर्यकातला) लहानपणी आईवडील वारल्यापासून वाढवलेले असते. आपल्या संसारातल्या अडचणी सोसून क्वचित् दागिने विकून त्याचे शिक्षण केलेले असते. पुढे त्याचे लग्न होते. शहरातील एका कारखान्याच्या मालकिणीच्या मुलीशी लग्न होऊन बबन 'घरजावई' होतो. त्याची सासू त्याला आपल्या पंजात ठेवते व त्याच्या वहिणीपासून व मेहुण्यापासून त्याला तोडू पाहाते. इकडे वहिणीचे हाल होतात. लग्नात कर्ज काढताना जमीन गहाण टाकलेली असते. ते पैसे पिकातून फेडायचे असतात. पण टोळधाड येऊन पीक फस्त करते. बहीण बबनला भेटायला जाते. पण बबनची सासू तिचा अपमान करते. ती बबनपाशी काहीच न मागता परत येते. बहिणीचा नवरा दमेकरी असतो. तो हमाली करताना अति श्रमाने मृत्यू पावतो. जमीन जाणार या व पोराबाळाचे काय होणार या काळजीने बहीणही आजारी पडते. बबनला ही बातमी शेजारचे मामा सांगतात. बबनला खरा प्रकार कळून तो धावत येतो. पण बहीण त्याला सोडून गेलली असते. लेखकाने कथानक शोधलेले नाही. सहज हाती आलेले आहे.

अशा प्रकारची कथानके आजवर अनेकदा पडद्यावर आपला प्रकाश पाडून गेलेली आहेत. पण पूर्वीच्या सगळ्या कथानकातून 'प्रेमळ वहिनी'ने 'अजाण दिरा'ला वाढलेले होते. आणि मग सगळा अश्रुपात त्या वहिनीद्वारे व्हायचा. त्या वहिनीऐवजी इथे 'बहीण' आहे इतकाच काय तो म्हणण्यासारखा फरक. बाकी तोही जाणवत नाही, कारण बहिणीचे काम वहिनीफेम सुलोचनाबाईच करतात! फ्लॅशबॅक तंत्राने सांगायची लघुकथा ही! पण तिची चित्रकथा करताना झालेले हाल मात्र चर्चा करण्यासारखे आहेत.

वेळ काढण्यासाठी जितक्या 'अनावश्यक' गोष्टी घालता येतील तितक्या घालण्याची आणि त्या अनावश्यक नाहीत असे दाखवण्याची पराकाष्ठा पटकथालेखकाने केली आहे. पण त्याचा फोलपणा तेव्हाच उघडा पडतो. सर्वात ठळक उदाहरण म्हणजे बबनची थोरली भाची. म्हणजेच त्याच्या बहिणीची थोरली मुलगी. या मुलीचे प्रेमप्रकरणहि असते. (म्हणजे भानगड नाही. आपले साधेच) त्या निमित्ताने एका गाण्यात अर्धा तास वेळ खर्ची पडला आहे. कशाकरिता ते विचारावयाचे नाही. कारण खरा उपयोग वेळ काढण्यापुरताच. पण या पात्राला अगदीच वाऱ्यावर सोडले असे होऊ नये म्हणून पुढे कुटुंबाची वाताहात झाल्यावर शेजारचा मामा तिच्या आईला तिचे लग्न एका म्हाताऱ्याशी करून द्यायचे सुचवितो. मग आई एक प्रभावी भाषण करते. मुलगी त्यागाची तयारी दाखवते वगैरे. एका दगडात दोन पक्षी मारण्याचा प्रयत्न केला आहे. पण एकही पक्षी मरत नाहीच– जखमीसुद्धा होत नाही, हे मात्र खरे.

खरे पाहिले तर या मुलीऐवजी त्या शेजारच्या मामाला (वसंत शिंदे) अधिक महत्त्व देऊन त्यातून एक प्रभावी व्यक्तिरेखा निर्माण करता आली असती. त्याचे कार्य सध्या फक्त बबनचे लग्न जुळवणारा मध्यस्थ एवढेच आहे. त्यापेक्षा तो खूपच अधिक काही तरी करू शकला असता. मधूनमधून तो काहीतरी करीलसे वाटते. पण पटकथालेखक त्याला 'नाकावर वोट' ठेवतो.

### कृत्रिम भावनाप्रधानता

बबनची बहीण बबनच्या घरी जाते तेव्हा त्याची सासू तिला कपडे धुवायला लावते. झाडलोट करायला लावते. हा प्रकार 'हा माझा मार्ग एकला' मधील सावत्र आईने केलेल्या प्रकाराला शोभण्याइतका नाही हे खरे. परंतु अति भावनाप्रधान प्रेक्षकांच्या अश्रूंना अशा प्रकारे आवाहन करण्यात आता फारसे स्वारस्य उरलेले नाही. या निमित्ताने थोडे विषयांतर करूनही सागावेसे वाटते की, प्रेक्षकाचे डोळे खरे पाणावतात ते असल्या कृत्रिम संकटानी किंवा दुःखांनी नाही, तर माणसाच्या भावनेच्या खऱ्या भव्यतेने वा उदात्तपणाचे दर्शन घडते तेव्हा! पण...!

हे व्यंकटेशस्तोत्र दत्ता माने यांनी तितक्याच सरळपणाने चित्रित केले आहे. शेवटी बहीण वारल्यावर बबन परत येतो व आपल्या भाचेभाचीची जबाबदारी आपण घेतल्याचे जाहीर करतो तेव्हा सारवलेल्या जमिनीवर ठेवलेल्या पणतीच्या ज्योतीतून बहिणीचा समाधानाने हसत असलेला चेहरा दिसतो व 'तू सुखी राहा' अशी अक्षरे पडद्यावर येतात. ही अक्षरे या पार्श्वभूमीवर टाकायला नको होती असे वाटते. त्याच्या टेकिंगमध्ये निराळेपणा भासतो. पण त्याचे श्रेय त्यांच्याइतकेच छायाचित्रकार व्ही. बारगीर यानाच द्यायला हवे. बारगीर यांच्या सुरेख छायाचित्रणानेच चित्रपटाचे काही यश टिकवले आहे. त्याबद्दल त्यांना सर्व गुण द्यायला हरकत नाही. चित्रपटात सुलोचना आहे आणि छायाचित्रातही सुलोचनता आहे.

## चित्रदर्शन

वसंत पवारांनी 'मानिनी' इतकी नाही तरी बरीच चांगली गाणी दिली आहेत. काव्यरचना प्रभावी नसली तरी त्यांच्या चाली नव्या व गोड वाटतात. विशेषत: 'दिवा लाविते दिवा' हे गीत मधुरतेच्या दृष्टीने व 'काळ्या काळ्या शेतामंदी' हे मराठीत अलीकडे क्वचित् आढळणारे म्हणून उल्लेख करण्यासारखी आहेत. लहानमुलाचे आगगाडीचे गाणे जमलेले नाही. मराठी चित्र पटांत हा प्रयोग नवीन असला तरी या गाण्याचा उपयोग कथानकांतला प्रसंग मध्येच तोडण्यापलीकडे नि ओघ खडित करण्यापलीकडे जास्त होत नाही. पार्श्वसंगीताबद्दल मुद्दाम लिहावे असे पार्श्वसगीत मराठीत नसतेच. तेव्हा प्रश्नच मिटला.

ध्वनिमुद्रणाची रड नेहमीचीच आहे. संकलन 'ठीक' आहे. मात्र सकलनाची कात्री अधिक धारदार असायला हवी होती. कलादिग्दर्शन खूपच चागले वाटते.

### सुलोचनाबाईंचा अभिनय

सुलोचनाबाईंच्या अभिनयावर तर साऱ्या चित्रपटाचा डोलारा उभा आहे. (बाकी इतर कुणाला महत्त्वच नाही) आणि त्यांनी तो सावरण्याची आपल्याकडून पराकाष्ठा केली आहे. चद्रकात गोखल्याचा 'मेहुणा' कधी कधी बरा नि कधी कधी अतिरिक्त वाटतो. सूर्यकात यांनी बबनचे काम केले आहे.

वसंत शिंदे याच्यासारखा गुणी कापडविक्या मामाच्या भूमिकेत तर झक्कपैकी फुकट घालवलाय. त्यामुळे त्याचे काम काही विशेष बरे नाही असे म्हणताना त्याच्यावर अन्याय होतोय की काय असे वाटू लागते. नवतारका आरती व नवा नट दीपक यांना पुढे यायचे असेल तर खूपच तपस्या करायला पाहिजे. इंदिराबाई चिटणीस याही सुलोचनाबाईंच्या इतक्यात्र सराईत आणि कामही तितक्याच सराइतपणाचे.

निर्माते ई. महंमद व डी. जे. नायक यांच्यामध्ये नवे प्रयोग करायची जिद्द– ईर्ष्या आहे नि परिश्रम करायची तयारीही आहे असे जाणवते. श्री. दत्ता माने यांच्याजवळ कथेशी इमान राखण्याचा दिलदारपणा आहे. तिघांनी सर्व बाबतीत अधिक चिकित्सकपणे विचार केला तर मानिनीचे यश टिकवणे अशक्य नाही! ● ● ●

( तू सुखी राहा – पृ. १५ वरून चालू )

गेलो. मनासारखी जुळणी होत आहे हे पाहिल्यानतर दोघांनाहि हुरूप आला! कथानक पसंत केले जाईल अशी खात्री दत्ता माने यांना वाटू लागली. कथानकाला भयंकर गती आली. चारचार तासांच्या चर्चेतून चागल्या गोष्टी निघू लागल्या. मीच "तू सुखी राहा" मय होऊन गेलो. जेवतानादेखील मनात येई 'भावाचे शिक्षण किती करावे? त्याला एखादा कोर्स द्यावा की वकील करावे? खेडूत स्त्री आपल्या भावाला वकील करू शकेल काय?'

तीन आठवड्यांच्या 'तू सुखी राहा' मय जीवनात माझे दिवस कसे गेले ते मला समजले नाही. त्या दिवसात मी किती लिहिले ते मला आठवत नाही. शेवटी हवी तशी गोष्ट लिहून झाल्यानंतर दत्ता माने गोष्ट घेऊन गेले, पुण्याला असलेले डी. जे. नायक व ई. महंमद हेहि कुठे गडप झाले. पुढे महिना निघूनही गेला. कथेच्या साऱ्या गोष्टी मी विसरून गेलो. सिनेमाधंद्याची बरीच माहिती असल्यामुळे अर्थात् मी शांत होतो. तीन जून १९६२ रोजी पहाटे ५॥ वाजता दत्ता मान्यांच्या धाकट्या भावाने माझे दार ठोठावले. "दादांनी तुम्हाला बोलावल आहे!"

मी तसाच गेलो. भल्या पहाटे चहाने माझे तोंड गोड करून माने म्हणाले, "तुमची कथा पसंत पडली आहे. कला चित्राचे निर्माते लवकरच तुमच्याशी करार करतील!"

### पडद्यावरील बदल

कोल्हापुराहून आलेले दत्ता माने लगेच मुंबईला निघून गेले! आता सिनेमातील समीकरण—माझ्या छातीच्या दुखण्याचे रूपांतर शंकर अण्णांच्या दम्यात झाले. माझ्या मृत्यूच्या भयाने शंकर अण्णाचा मृत्यू घडला. माझ्या सासऱ्याने आपल्या मेहुण्यावर केलेले जिद्दीचे प्रेम शंकर अण्णांनी आपल्या मेहुण्यावर करावे असे ठरले.

माझ्या सासूची नि ह्यांच्या भावाची अवीट माया काशी—बबनच्या मायेने साकार झाली. बहिणीला मोलकरिणीचे काम करण्याचे कसब माझ्या सल्ल्या बहिणीला मोलकरीण म्हणून म्हटल्यामुळे घडले. सावत्र जावयाचा त्रास आणि माझ्या मुलांची हेळसांड यांतून कोयनाबाई आपोआपच निर्माण झाल्या. शेतकरी कुटुंब आपल्या माणसाला जास्तीतजास्त काय करू शकेल? फायनल नाहीतर मॅट्रिक. तेवढे करून बबनला टर्नरचा कोर्स दिला आणि भाषातून निर्माण झालेल्या प्रसगातून प्रसगाची बाधणी झाली. काशीबाई, शंकरअण्णा आणि बबन ही पात्रे मात्र बळकट होती. त्याचे आसन आम्ही बदलले नाही.

माझ्या मनात अनेक प्रसगांच्या उभ्या आडव्या फक्त रेषा होत्या. त्या कुठे आणि कश्या माडाव्यात हे साधारण मला समजत होते. पण त्या अमुक ठिकाणी मांडल्या तर चित्र चांगले होईल, हे दत्ता मान्यांनी मला सांगितले. कोणती रेषा पुसली पाहिजे कोणती जास्त ठळक केली पाहिजे हे दत्तामान्यानी सांगितले. व्यंकटेश माडगूळकरानी आपले सारे कसब पणाला लावून ते चित्र बोलके केले. कुणी जास्त बोलावे, कुणी कमी बोलावे, कुणी बोलूच नये, कोणत्या क्रमाने बोलावे आणि काय बोलावे, हे त्यानी सागितले. जे माझ्या मनात होते; पण मला सांगता येत नव्हते, ते त्यांनी नेमके हेरले. त्याचे सारे कसब. दत्ता मान्यानी माझ्या साऱ्या कल्पना मूर्त स्वरूपात साकार केल्या. खरेखुरे खेडे त्यांनी लोकांच्या पुढे उभे केले. डी. जे. नायक आणि ई. महमद याची चिकाटी और. प्रसग पडला तर हेलिकॉप्टर पण पूरवू असे ते मान्यांना म्हणाले. आणि शेवटपर्यंत कसलीही कमतरता-उणीव त्यानी दिग्दर्शकाला भासू दिली नाही. माझ्या मनात असलेल्या बहिणीपेक्षा हजार पटीने खरी सुखी शेतकरी बहीण सुलोचनाबाईंनी मला दाखवली. मी प्रत्यक्ष शेतकरी पाहातो त्यात आणि चंद्रकांत गोखल्यांच्या शेतकऱ्यात एका तसूचाही फरक नाही इतके उत्तम काम चंद्रकांत गोखल्यांनी केले.

मी विख्यात लेखक नाही. निव्वळ परिचयाचा फायदा मिळाला म्हणून माझी कथा पडद्यावर आली. नाहीतर...! लाखो प्रसंग जगात घडत आहेत. दिग्दर्शक-निर्मात्यांपर्यंत ते पोहोचू शकत नाहीत हेच दुर्भाग्य.

● ● ●

# माणूस १९६३


## दिवाळी अंकातील साहित्यिक – कथाकार – कवि



| | |
|---|---|
| ब. मो. पुरंदरे | श्रीपाद काळे |
| दि. बा. मोकाशी | आनंद यादव |
| जी. ए. कुलकर्णी | भीमराव कुलकर्णी |
| डॉ. रंगनाथ देशपांडे | स्नेहलता दसनूरकर |
| श्री. ज. जोशी | मधुकर परांजपे |
| मधु मंगेश कर्णिक | सुरेश भट |
| शिरीष पै | मनमोहन नातू |
| शं. ना. नवरे | वि. ग. कानिटकर |

नामावली संपली नाही
आणखीही काही मातब्बर मंडळी बाकी आहेत
उल्लेखच करायचा तर–

ना. सी. फडके, वि. स. खांडेकर हे साहित्यिक,
अप्पा पेंडसे, दिनकर द. पाटील हे चित्रपटविषयक अधिकारी लेखक,
नंदा, मीनाक्षी, दामुअण्णा मालवणकर, सुमति गुप्ते
इत्यादी रजतपटकलाकार
'माणूस' दिवाळी अंकासाठी
एक विशेष शिल्प उभे करण्यासाठी झटत आहेत.
जसे दोन वर्षांपूर्वी 'प्रभात फिल्म कंपनी'चे
शब्द-चित्र-शिल्प 'माणूस'ने वाचकांना सादर केले
तसेच यंदाहि एका शिल्पाची सिद्धता चालू आहे.
या शिल्पाचे नाव !



त्यासाठी
येत्या सप्टेंबर अंकाच्या मुखपृष्ठाकडेच
वाचकांचे लक्ष आम्ही वेधू इच्छितो–



## अधिक झाडे लावा

मातोश्री जिजामातेची पुण्यतिथी ता. १७ जून ते
महात्मा गांधींचा जन्मदिन ता. २ ऑक्टोबर
१९६३ पर्यंत, चार कोटी झाडे लावण्याचा
महाराष्ट्राचा संकल्प पुरा करा
झाडांची जोपासना करून उत्तम वनराजी
वाढीस लावल्याने राष्ट्राच्या संपत्तीत
भर पडते



प्रत्येकाने एक तरी झाड लावावे व त्याची जोपासना करावी

**अधिक धान्य पिकवू, अधिक गवत उगवू,**
**अधिक भाजीपाला पिकवू हाच आमचा निर्धार**

प्रसिद्धि संचालक महाराष्ट्र शासन मुंबई

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगांवकर यांनी, संगम प्रेस प्रायव्हेट लि., ३८३ नारायण पेठ, पुणे, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **संपादक श्री. ग. माजगांवकर**